नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक १९४ * * अकोला * शुक्रवार, दिनांक १६ जानेवारी २०२६ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## रस्ता अपघातात पाच जणांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, भोपाळ, दि. १५ :
भोपाळमध्ये भीषण मध्य प्रदेशच्या राजधानी भोपाळमधील बेरासिया परिसरात एक भीषण रस्ता अपघात झाला, ज्यात ट्रॅक्टर-ट्रॉली आणि पिकअप ट्रक समोरासमोर धडकले. या भीषण अपघातात एकाच कुटुंबातील तीन जणांसह पाच जणांचा मृत्यू झाला, तर दहा जण जखमी झाले आहेत.

बेरासिया तहसीलच्या बाहेरील भागात नर्मदा नदीत मकर संक्रांतीच्या निमित्ताने स्नान करून परतणाऱ्या भाविकांना घेऊन जाणाऱ्या ट्रॅक्टर-ट्रॉलीला नर्मदापुरमकडे जाणाऱ्या पिकअप ट्रकने जोरदार धडक दिली. पिकअप ट्रकमध्ये प्रवास करणारे मुकेश अहिरवार, बाबरी बाई, दीपक, लक्ष्मी बाई आणि हरी बाई जागीच मृत्युमुखी पडले.

## महाराष्ट्र नंबर वन




लोकांनी आमचे ऐकले असते तर २९ महानगर पालिकांमध्ये इमानदारी मतदान केले असते. मग तर आम्हाला गगनभेदी आनंद झाला असता परंतु तसा आनंद आम्हाला मिळूच नये असा जणू कटच महाराष्ट्रातील मते न देणाऱ्या आणि मतदान टाळणाऱ्या निष्ठावंत महनीय व्यक्तींनी आम्हास मिळू दिला नाही. अशा प्रकारच्या महान व्यक्तींना आम्हाला आज आठवताही आले नसते. मात्र आज दुपारपर्यंतची जी आकडेवारी आमच्या हाती आली आहे, ती अवघी ४१.८% एवढीच आहे. त्यावरून २९ महानगर पालिकांसाठी ज्या ज्या मतदारांनी नाईलाजाने मतदान केलेले आहे, त्यांची अवस्था एखाद्या वाट चुकलेल्या वासरासारखी आहे. मतदार यादीत नाव असून मतदान न करणाऱ्या अनेकाना आगळावेगळा नमस्कार करण्याची आमची जबरदस्त भावना आहे. मतदान करणे म्हणजे आपला वेळ अकारण व्यर्थ दवडणे आहे, अशी ज्यांची समजूत आहे. अशा महाराष्ट्रातील महान नागरिकांना साक्षात दंडवत घालून ढोपरापासून नमस्कार करण्याची आमची तीव्र भावना जागृत झालेली आहे. कारण अशा मंडळींना साष्टांग दंडवत घालणे हे आमचे राष्ट्रकर्तव्य आहे असे आम्ही समजतो. ज्या शहाण्या नागरिकांनी चार ते पाच दिवस दौरा केला ते आता आपल्या प्रवासाच्या रसभरीत आठवणी सांगून मतदान करणाऱ्यांचे मनोरंजन करतील यात अजिबात शंका नाही. अशा प्रकारचे बरेच लोक आपल्या सहकाऱ्यांबरोबर बाहेर गेल्यामुळे त्यांना जो काही सृष्टीसौंदर्य दर्शनाचा आनंद झाला आहे किंवा ईश्वर दर्शनाने अत्याधिक संतोष मिळालेला आहे त्यांचेही मनःपूर्वक चरण स्पर्श करण्याची आमची इच्छा आहे. महाराष्ट्र राज्य प्रत्येक बाबतीत आघाडीवर आहे असे म्हणतात. ते तसेच आघाडीवर राहावे. अशा या महाराष्ट्राची महती कायम राखण्यासाठी ज्या ज्या महाभागांनी मतदानाला अनुपस्थित राहण्याची टोलेजंग कामगिरी पार पाडलेली आहे, त्यांनाही एखादे पदक दिलेच गेले पाहिजे. महाराष्ट्रात ठिकठिकाणी चांगले चांगले कार्यक्रम घेऊन पदके प्रदान करणारे अनेक पदकदान करणारे पदकसम्राट आजही हयात आहेत. ही मंडळी फक्त खर्चा पुरतेच पैसे घेऊन पदके देण्यास सदैव तत्पर असतात. ज्यांनी ज्यांनी मतदान केलेच नाही त्यांनी शुक्रवारचा रजेचा अर्ज टाकून चार दिवस जीवाची मुंबई केलेली आहे. हे भाग्य मुंबई बाहेर निघून गेलेले असतील त्यांनाच लाभलेले आहे. जे मुंबईत राहतात त्यांच्या जीवातच मुंबई आहे म्हणून त्यांना जीवाची मुंबई करायची गरज वाटत नाही. आज दिवसा अखेर मतदानाची टक्केवारी ५२ टक्के आहे.

ही आजची मतदानाची टक्केवारी पाहून आमचा जीव आणि उर अभिमानाने भरून आलेला आहे. मतदानाला आपला अमूल्य वेळ खर्च करण्यापेक्षा या वेळेचा सदुपयोग करून स्वतःचे पर्यटनीय ज्ञानवर्धन करणाऱ्या भावंडांना आमचे शब्द लोटांगण! त्यामुळेच 'महाराष्ट्र नंबर वन' वर आहे. एकूणच आपला महाराष्ट्र पुढारलेला आहे तर!

mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

### मशीन बंद, नाव गायब, राज्यभर गोंधळ : महापालिका निवडणुकीत मतदानाऐवजी मनस्ताप

# मतदानाच्या टक्केवारीत घसरण

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर / मुंबई, दि. १५ :
राज्यातील सर्वच महानगरपालिकांसाठी आज सकाळी साडेसात वाजता मतदानाला सुरुवात झाली असली, तरी पहिल्याच तासात निवडणूक आयोगाच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

दरम्यान, आज मतदारांनी मतदानाकडे पाठ फिरविल्याचे दिसून आले. राज्यातील सर्व २९ महानगरपालिकांमध्ये दुपारी २ वाजेपर्यंत सरासरी २८ टक्के मतदान झाल्याची आकडेवारी आली होती. दुपारनंतर मतदानाला वेग येईल, अशी अपेक्षा होती. मात्र, सायंकाळपर्यंत मतदारांचा प्रतिसाद दिसून आला नाही.

मतदानाची अंतिम आकडेवारी हाती आली नसली तरी नागपूर ५१.२३ टक्के, मुंबई ५१.०८%, नवी मुंबई ५४%, उल्हासनगर ४४ %, भिवंडी ४८%, मीरा भाईंदर ४८%, वसई विरार ५५%, पनवेल ५४%, नाशिक ४९%, मालेगाव ५६%, धुळे ४६%, जळगाव ४४%, अहिल्यानगर ५६%, पुणे ४६%, पिंपरी चिंचवड ५०%, सोलापूर ५०%, कोल्हापूर ५८%, सांगली मिरज ५१%, छ. संभाजीनगर ५३%, नांदेड ५२%, लातूर ५३%, परभणी ५७%, अमरावती ५१%, अकोला ५३%, चंद्रपूर ४८%, इचलकरंजी ५६%,, जालना ५५, ठाणे ५३ आणि कल्याण डोंबिवली ४८ टक्के असे मतदान झाल्याची माहिती आहे.

दरम्यान, आयोगाने यापूर्वी घेतलेल्या एकामागून एक निर्णयांमुळे संशयाचे वातावरण निर्माण झाले असतानाच, प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशीच मोठ्या प्रमाणावर गैरव्यवस्थेचे चित्र समोर आले. अनेक ठिकाणी मतदार यादीतील नावांचा गोंधळ, ईव्हीएम मशीन बंद पडणे, बटणे काम न करणे अशा तांत्रिक आणि प्रशासकीय त्रुटींमुळे मतदारांची मोठी हेळसांड झाली.

निवडणूक आयोगाच्या या ढिसाळ कारभाराचा पहिला फटका वनमंत्री गणेश नाईक यांनाच बसला. नवी मुंबईत सकाळी मतदानासाठी बाहेर पडलेल्या गणेश नाईक आणि त्यांच्या कुटुंबाला एक तास मतदान केंद्रांवर फिरावे लागले.

दोन वेगवेगळ्या मतदान केंद्रांवर नाव न सापडल्याने संभ्रम निर्माण झाला. अखेर कोपरखैरणे येथील सेंट मेरी हायस्कूलच्या मतदान केंद्रावर गणेश नाईक, संजीव नाईक आणि सून कल्पना नाईक यांची नावे यादीत आढळली. मात्र, माजी महापौर सागर नाईक आणि त्यांच्या पत्नीचे नाव वेगळ्याच ठिकाणी असल्याचे समोर आले. नेहमी एकाच ठिकाणी मतदान करणाऱ्या नाईक कुटुंबाला वेगवेगळ्या मतदान केंद्रांवर जावे लागले.

▶▶ पान ८ वर



### राजकीय पक्षांच्या पेंडॉलमध्ये ईव्हीएम मशीनचे डेमो

नागपूर महानगरपालिका प्रभाग क्रमांक २३, गरोबा मैदान, नालंदा चौक या ठिकाणी राजकीय पक्षांच्या पेंडॉलमध्ये ईव्हीएम मशीनचे डेमो लपवून ठेवले होते. हा प्रकार लक्षात येताच संबंधित कर्मचाऱ्यांनी डेमो मशीन जप्त केल्या. याप्रकरणी अपक्ष उमेदवार मुकेश मधुकर मेश्राम यांनी निवडणूक अधिकारी यांना लेखी तक्रार दिली.

भाजपाचे आमदार मोहन मते यांच्या दक्षिण नागपूर मतदार संघात जवळपास १५० मतदारांची नावे गहाळ झाल्याचा आरोप करण्यात आला. मतदार वणवण भटकत होते. विधान सभा मतदार संघ निहाय नावे शोधा, असे येथील पदाधिकारी सांगत होते.

### नागपुरच्या महिलेला औरंगाबादचे मतदान केंद्र

मनपा निवडणुकीतील गोंधळाचे अजब किस्से नागपुरातही पाहायला मिळाले. नितेश किसनराव कांबळे यांचे कुटूंब प्लॉट, नं. ४२ जोगीनगर, नागपूर, येथील रहिवासी असून, हा भाग प्रभाग क्र. ३५ मध्ये समाविष्ट आहे. तथापि, नितेश, त्यांच्या पत्नी, आई आणि वडील यांना वेगवेगळे मतदान केंद्र देण्यात आले. किसनराव कांबळे यांचा समावेश प्रभाग क्र. ३४ मध्ये करण्यात आला. यापेक्षा मोठा गोंधळ म्हणजे नितेशच्या आई रत्नमाला किसनराव कांबले यांना थेट औरंगाबाद येथील मतदान केंद्र देण्यात आले.

### अडीच तास मतदारांची पायपीट

क्रमांक ३६ वार्ड असलेल्या एका मतदाराला १३ क्रमाकांच्या वार्डात दाखवण्यात आले. सदर मतदार प्रथम कैम्पस यूनिव्हर्सिटीच्या बुथवर गेला असता तेथे नाव नव्हते. तेथून एलआयटीत गेले, तेथेही नाव नाही. पुन्हा कैम्पस, नंतर अभ्यंकर नगर, नंतर पुन्हा कैम्पस. २.२५ तास फिरल्यानंतर एका मुलीने नाव शोधून कैम्पसला मतदान करवून दिले.






Voter Information

| | |
|---|---|
| प्रथम नाम/First Name | Ratnamala Kisanrao रत्नमाला किसनराव |
| उपनाम/Last Name | Kamble कांबळे |
| रिश्तेदार का प्रथम नाम/Relative's First Name | Kisanrao किसनराव |
| रिश्तेदार का उपनाम/Relative's Last Name | Kamble कांबळे |
| उम्र/Age | 56 |
| लिंग/Gender | Female |
| ईपीआईसी संख्या/EPIC No | BKG2321321 |
| राज्य/State | Maharashtra |
| संसदीय निर्वाचन क्षेत्र संख्या - संसदीय निर्वाचन क्षेत्र/Parliamentary Constituency Number-Parliamentary Constituency Name | 19-Aurangabad |
| विधान सभा निर्वाचन क्षेत्र संख्या - विधान सभा निर्वाचन क्षेत्र/Assembly Constituency Number-Assembly Constituency Name | 109-Aurangbad (East) |
| मतदान केंद्र/Polling Station | Om Vidyamandir, , South Side Room No. 1, Cidco N-6, |
| भाग संख्या-भाग का नाम/Part Number-Part Name | 256-Cidco N-6 |
| भाग मतदाता क्रमांक/Part Serial Number | 957 |
| मतदान की तारीख/Polling Date | No elections scheduled currently |

## शाई पुसण्यावरून गदारोळ

### निवडणूक आयोगाचा खुलासा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १५ :
मनपा निवडणुकीसाठी मतदान करताना बोटाला लावलेली शाई पुसली जाण्यावरून विरोधी पक्षांनी आज रान उठवले. विरोधी पक्षांनी थेट सत्ताधारी पक्ष आणि निवडणूक आयोगावर आरोपांची झोड उठवली.

मतदारांच्या बोटांवरील शाई सहजपणे पुसली जात असल्याचा आरोप विरोधी पक्षांकडून करण्यात आलो. उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत व्हिडीओ दाखवत शाई नव्हे तर लोकशाही पुसली जात आहे, आयोग सत्ताधाऱ्यांना मदत करत असल्याचा गंभीर आरोप केला होता. मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्यासह काँग्रेसच्या अनेक नेत्यांनी शाई पुसण्याच्या प्रकारावरून सत्ताधाऱ्यांसह निवडणूक आयोगाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले.

तथापि, निवडणूक आयोगाने विरोधकांचे सर्व आरोप फेटाळून लावलेत. या आरोप-प्रत्यारोपांच्या रणधुमाळीत मतदान सुरू असतानाच राज्य निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेतली, हा प्रकार राज्याच्या निवडणूक इतिहासात पहिल्यांदाच घडल्याने त्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी पत्रकार परिषदेत समोर येत आरोपांवर थेट आणि ठाम भूमिका मांडली.

आरोपांवर बोलताना आयुक्त वाघमारे यांनी स्पष्ट शब्दांत पलटवार केला. मतदारांच्या बोटांवर लावण्यात येणारी शाई आणि पेन २०११ पासून वापरात आहेत. केंद्रीय निवडणूक आयोगाकडूनही याच प्रकारची शाई वापरली जाते. ही शाई एकाच कंपनीची असून १० ते १२ सेकंदांत सुकते. शाई सुकल्यानंतर ती निघत नाही, असे त्यांनी सांगितले. आयोगाचे सचिव आणि कर्मचारी यांनी स्वतः मतदान केले असून त्यांच्या बोटांवरील शाई पुसली गेली नसल्याचेही त्यांनी नमूद केले.

शाई पुसली जात असल्याचे व्हिडीओ कुठून आले, याची चौकशी केली जाईल, असे स्पष्ट करत मतदारांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न झाला असल्यास संबंधितांवर गुन्हा दाखल केला जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

बोगस मतदानाबाबत आतापर्यंत एकच अधिकृत तक्रार प्राप्त झाली असून संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी तत्काळ कारवाई केल्याचे त्यांनी सांगितले. सोशल मीडियावरून समोर आलेल्या व्हिडीओंच्या आधारेही चौकशी व कारवाईचे आदेश देण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

दरम्यान, मतदारयादीत नाव नसणे किंवा मतदान केंद्र बदलल्याच्या तक्रारींवर बोलताना आयुक्त वाघमारे यांनी मतदारांची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची असल्याचे स्पष्ट केले. मंत्री गणेश नाईक चुकीच्या मतदान केंद्रावर गेल्याने त्यांना मतदान करता आले नाही, हे सांगत मतदारांनी केंद्राची खात्री करणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले. मतदानाच्या दिवशीच घेतलेली ही पत्रकार परिषद, त्यातील स्पष्टोक्ती आणि ठाम भूमिका यामुळे राजकीय वातावरण आणखी तापले आहे.

## भाजपशाही जुलमी, फसवी आणि भ्रष्ट

### उद्धव ठाकरेंची जोरदार टीका

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५ :
शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुंबईसह राज्यभरातील मतदारांना जुलमी, फसवी आणि भ्रष्ट भाजपशाही उलथवून टाकण्याचे आवाहन केले आहे.

मुंबईसह महाराष्ट्रात जिथे कुठे मतदान होत आहे तेथील मतदारांनी मतदान करून ही जुलमी, फसवी व भ्रष्ट भाजपशाही हुकूमशाही उलथवून टाकावी. अमराठी व्यक्तींनीही आपल्या

▶▶ पान ८ वर



## हा विकास आहे का?

### राज ठाकरेंचा खडा सवाल



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १५ :
मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी व्हीव्हीपॅट अभावी महानगर पालिका निवडणुकीत दिलेले मतदान कुणाला जात आहे कळायला कोणताही मार्ग नसल्याची चिंता व्यक्त केली आहे.

हे सरकार ऐनकेन प्रकारे निवडणुका जिंकण्यासाठी वाट्टेल ते करत आहे. प्रशासनही सत्तेसाठीच काम करत आहे. त्यातच निवडणूक प्रक्रियेत व्हीव्हीपॅट नसल्यामुळे दिलेले मतदान कुणाला जातंय हे कळायला कोणताही मार्ग उरला नाही, मतदान करा, बाहेर या, शाई पुसा व पुन्हा आत जाऊन मतदान करा हा विकास आहे का? असे ते म्हणाले.

राज ठाकरे यांनी आज आपल्या कुटुंबासह मतदान केले. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी हे सरकार व प्रशासन निवडणूक जिंकण्यासाठी वाट्टेल ते करत असल्याचे मत व्यक्त केले. राज ठाकरे म्हणाले, हे सरकार ऐनकेन प्रकारे निवडणुका जिंकायच्या आणि त्यासाठी जे काही वाट्टेल ते करता येईल त्या सर्व गोष्टी सरकार व प्रशासन करत आहे.

राज ठाकरे म्हणाले, आता व्हीव्हीपॅटचा विषय आला. व्हीव्हीपॅट नसल्यामुळे आम्ही दिलेले मतदान कुणाला जात आहे हे कळायचा मार्ग उरला नाही. हे सर्व झाल्यानंतर आता त्यांनी पाडू नामक यंत्र आणले आहे. हे यंत्र मतमोजणीच्या वेळी वापरले जाणार आहे. म्हणजे विरोधी पक्ष नावाची गोष्ट ठेवायचीच नाही, दुसऱ्या पक्षाने निवडणुका लढायच्याच नाहीत. सरकारने ठरवायचे की, कशा प्रकारे निवडणुका जिंकायच्या, जे त्यांनी विधानसभेला केले. ते आताही तेच करत आहेत.

## मुख्यमंत्र्याच्या मित्रावर हल्ला



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :
मनपा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील राजकीय वातावरण तापले असतानाच भाजप उमेदवार भूषण शिंगणे यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्याने खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी शिंगणे यांच्या घरी जाऊन भेट घेतली आणि हल्लेखोरांना इशारा दिला.

नागपुरात प्रभाग ११ मधील भाजपचे उमेदवार व माजी नगरसेवक भूषण शिंगणे यांच्यावर बुधवारी रात्री काही जणांनी जीवघेणा हल्ला केला. यात त्यांच्या हाताला, तोंडाला गंभीर जखम झाली असून त्यांना खाजगी रुग्णालयात दाखल केले आहे. भाजप शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनी काँग्रेस उमेदवार चाचेरकर व काही काँग्रेस

▶▶ पान ८ वर

नवभारत विद्यालय कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय तथा एच.एस.सी. (व्होके) मूल जि. चंद्रपूर कडून
मा. ॲड. अनिलराव वैरागडे
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!





शुभेच्छूक
मा. ॲड. अनिलराव वैरागडे
अध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळ मूल
श्री.ए.एच.झाडे
प्राचार्य
कु.व्ही.एस.भांडरकर पर्यवेक्षिका, तथा सर्व प्राध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद

## नामदेव ढसाळांच्या पत्नीची प्रकृती खालावली : मुख्यमंत्र्यांकडे दुःख व्यक्त

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५ :
सुप्रसिद्ध कवी, लेखक, दलित चळवळीतील कार्यकर्ते स्व.पद्मश्री नामदेव ढसाळ यांच्या पत्नी आणि संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील अग्रणी नाव शाहीर अमर शेख यांच्या कन्या मल्लिका नामदेव ढसाळ या सध्या आजारी आहेत. पण त्यांच्याकडे लक्ष द्यायला कुणालाच वेळ नाही, नानाजी देशमुख प्रतिष्ठानतर्फे त्यांना मदत केली जात आहे.

आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्याशी व्हीडिओ कॉलवर संवाद साधला आहे. विशेष म्हणजे गुरूवार १५ ला नामदेव ढसाळ यांची पुण्यतिथी देखील होती.

यावेळी बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी तब्येतीची विचारपूस केली असता मल्लिका ढसाळ म्हणाल्या, प्रकृती काही बरी नाही. नामदेवच्याच मार्गाने जाणार असे वाटते. त्यावर फडणवीस म्हणाले, नाही नाही तुम्हाला काही होऊ देणार नाही. आम्ही सगळे आहोत, तुम्ही बिलकुल काळजी करू नका आणि आम्ही सगळे तुमची नीट काळजी घेऊ. तुम्ही कशाचीही चिंता करू नका. नामदेवरावांचे अजून खूप काम बाकी आहे, ते तुम्हाला पुढे न्यायचे आहे.

यावर पुढे बोलताना मल्लिका ढसाळ म्हणाल्या, दुःख एवढेच आहे की ज्यांनी नामदेव सारखा झंजावात जन्माला घातला, त्याच्या नावावर इतके लोक दुकान थाटून बसले आहेत आणि त्याचे फायदे घेतात. पण नामदेव ढसाळांचे कुटुंब कसे राहते, ते जगत आहेत की मरतायत, याचे कोणालाही देणे पडले नाही, याची खंत वाटते. त्याने जे केले ते त्याचे कर्तव्य होते. आम्ही असे म्हणत नाही की त्याने जे केले त्याचे आम्हाला रिटर्न्स पाहिजेत, पण माणुसकी म्हणून तरी त्यांनी बघायला पाहिजे आम्हाला, असे दुःख मल्लिका ढसाळ यांनी व्यक्त केले.

फडणवीस म्हणाले, तुम्ही याचे अजिबात दुःख वाटून घेऊ नका. मी स्वतः लक्ष देणार आहे. आम्ही सगळे तुमच्या मागे आहोत. मी स्वतः पर्सनली लक्ष घालत आहे. तुम्ही बिलकुल काळजी करण्याचे कारण नाही.



नवभारत कर्मचारी सहकारी पतपेढी संस्था मर्या.
मूल ता. मूल, जि. चंद्रपूर रजि.नं. १५१/७६ कडून
मा. ॲड. अनिलराव वैरागडे
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!



मा. ॲड. अनिलराव वैरागडे
अध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळ मूल
श्री.किसन ज.वासाडे
अध्यक्ष
श्री.दिनेश जिड्डीवार
उपाध्यक्ष
श्री.धिरज न.नौकरकर
सचिव
संचालक मंडळ : श्री.जी.आर.चौधरी, श्री.डी.एम.बनकर, श्री. एन.एस.शेंडे, श्री.एम.टी.रामटेके, श्री. व्ही.डी.मोडक, श्री.डी.डी. मशाखेत्री, श्री.आर. आर.उईके, श्री.के.आर. नंदूरकर, डॉ.कु.यु.टी.कापगते, कु.व्ही.आर. बनकर
कर्मचारी : श्री.ए.पी.शिवणकर, श्रीमती एम.के.बोरकुटे, श्री.आर.एल.शेंडे

## शाई पुसणाऱ्यांवर गुन्हा दाखल करा



■ **मुंबई :** महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापलेले असतानाच आरोप-प्रत्यारोपांची धार अधिकच तीव्र झाली आहे. निवडणूक आयोगावर शाई आणि मतदान प्रक्रियेबाबत आक्षेप घेणाऱ्या ठाकरे बंधूंवर भाजप नेते आशिष शेलार यांनी जोरदार पलटवार केला आहे. ठाकरे बंधूंचे सल्लागार सडके आणि ते रडके आहेत, अशा शब्दांत शेलार यांनी थेट टीका करत विरोधकांच्या आरोपांना फेटाळून लावले. निवडणूक आयोगावर संशय व्यक्त करणाऱ्यांनी प्रत्यक्ष आयोगाकडे तक्रार केली का? असा थेट सवाल उपस्थित करत त्यांनी ठाकरे गटाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उभं केलं आहे. शेलार यांनी शाई पुसण्याच्या प्रकरणावर बोलताना अधिक आक्रमक भूमिका घेतली. शाई पुसणारे लोक बोगस मतदान करून पाहत होते, असा आरोप त्यांनी केला. त्यामुळे अशा व्यक्तींवर गुन्हा दाखल झाला पाहिजे आणि त्यांची सखोल चौकशी झाली पाहिजे, अशी ठाम मागणी त्यांनी केली. निवडणूक प्रक्रियेची पवित्रता राखण्यासाठी कठोर कारवाई आवश्यक असल्याचं सांगत, शाई पुसली जाते म्हणून गोंधळ घालणाऱ्यांचा खरा हेतू काय होता, हे तपासण्याची गरज असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. शाई पुसण्याचा मुद्दा उपस्थित करणाऱ्यांनी कायदेशीर मार्ग स्वीकारण्याऐवजी राजकीय गोंधळ निर्माण करण्याचा प्रयत्न केला, असा आरोपही शेलार यांनी केला.

## भाजपला पोसणाऱ्यांनी मराठी अस्मिता गिळली : संजय राऊत



■ **मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी गुरुवारी पुन्हा एकदा ठाकरे बंधूंमुळे मुंबईतील मराठी माणूस खडबडून जागा झाल्याचा दावा केला. भाजप व त्यांना पोसणाऱ्या उद्योगपतीरुपी राक्षसांना मुंबई व मराठी माणसांची अस्मिता गिळायची आहे. एकदा मुंबई गिळली की आम्हाला पुढळ्या युद्धासाठी सज्ज रहावे लागेल. असे ते म्हणालेत. राज्यात आज मुंबईसह 29 महापालिकांसाठी शांततेत मतदान सुरू आहे. मुंबईत ठाकरे बंधू विरुद्ध भाजप - शिंदे गट महायुती यांच्यात कडवी टक्कर आहे. या पार्श्वभूमीवर संजय राऊत यांनी सकाळी पत्रकारांशी संवाद साधताना भाजप व त्यांच्या पाठिराख्यांवर निशाणा साधला आहे. ते म्हणाले, मुंबईच्या घाटकोपरमध्ये एक होर्डिंग कोसळून 40 जण ठार झाले. फार दुर्दैवी घटना होती. मी काल तिथे पाहिले. त्या भूखंडावरही अदानींचा बोर्ड लागला आहे. तुम्हीही पाहा. 40 जण त्या खाली गाडले गेलेत. ही राक्षसी भूक भाजप व त्यांना पोसणाऱ्या उद्योगपतींची आहे. या राक्षसांना मुंबई व मराठी माणसांची अस्मिताही गिळायची आहे. एकदा मुंबई गिळली, वेगळी केली किंवा मराठी माणसांचे हृदय तोडले की, आम्हाला पुढल्या युद्धासाठी सज्ज रहावे लागेल.

## मतदान अधिकाऱ्यांच्या मोबाईलमध्ये भाजपचे ॲप



■ **मुंबई :** मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत मतदान सुरू असतानाच निवडणूक प्रक्रियेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी आज माध्यमांशी बोलताना निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर तीव्र टीका केली. मतदान अधिकाऱ्यांच्या मोबाईल फोनमध्ये भाजपचे मेसेजेस आणि ॲप्स असल्याचा आरोप करत त्यांनी निवडणूक आयोगाच्या निष्पक्षतेवरच सवाल उपस्थित केला. आदित्य ठाकरे यांनी सांगितले की, त्यांच्या पक्षाच्या अंतर्गत तपासणीनुसार तब्बल १ लाख ८० हजार मतदारांची नावे मतदारयादीतून काढण्यात आल्याची नोंद आढळली आहे. मतदानाच्या नावाखाली नागरिकांना वेठीस धरले जात आहे. संविधानाने दिलेला मतदानाचा अधिकारच हिरावून घेतला जात असेल, तर अशा संस्था घटनात्मक कशा म्हणायच्या? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. मुंबईतील काही मतदान केंद्रांवर निवडणूक अधिकारीच भाजपचा प्रचार करत असल्याचे प्रकार समोर आल्याचा आरोप आदित्य ठाकरे यांनी केला. आमचे उमेदवार सचिन पाटील यांनी काही मतदान अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष पकडले आहे. त्यांच्या मोबाईल फोनवर भाजपचे मेसेजेस येत होते. मतदान अधिकारी जर सत्ताधारी पक्षासाठी काम करत असतील, तर निवडणूक प्रक्रिया कितपत निष्पक्ष राहते? असा सवाल त्यांनी केला. निवडणूक आयोगाच्या कारभारावर टीका करताना आदित्य ठाकरे यांनी मंत्री गणेश नाईक यांचे उदाहरण दिले. वर्षानुवर्षे ज्या मतदान केंद्रावर गणेश नाईक मतदान करत होते, त्या केंद्रावर त्यांचे नाव नसल्याने त्यांना जवळपास एक तास भटकंती करावी लागली आणि अखेरीस वाशीला जावे लागले.

## निवडणूक आयोग म्हणजे दात काढलेला वाघ



■ **मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी राज्य निवडणूक आयोग हा दात काढलेल्या वाघासारखा असल्याची टीका केली आहे. या प्रकरणी त्यांनी एक व्यंगचित्र पोस्ट केले आहे. त्यात भाजपने निवडणूक आयोगरुपी वाघाचे दात काढल्याचे दिसून येत आहे. निवडणूक आयोगाने मतदान प्रक्रियेत सुरू असलेल्या अनागोंदीची गंभीर दखल घ्यावी. अन्यथा आज मतदानाची शाई पुसली जात आहे, तशी उद्या लोकशाहीही पुसली जाईल, असे ते म्हणालेत. राज्यात सध्या मुंबईसह 29 महापालिका निवडणुकांचा फड रंगला आहे. त्यात अनेक ठिकाणी मतदारांच्या बोटावरील शाई पुसली जाण्याचे प्रकार घडले आहेत. काही ठिकाणी बोगस मतदारही आढळून आलेत. आमदार रोहित पवार यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत राज्य निवडणूक आयोगावर टीकेची झोड उठवली आहे. तसेच एका व्यंगचित्राद्वारे त्यांनी निवडणूक आयोग दात काढलेल्या वाघासारखा असल्याचाही आरोप केला. ते म्हणाले, महापालिकेच्या मतदान प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार होत असल्याचं समोर येत आहे. आधी मतदान यंत्रणेत बिघाड, नंतर बोटाला लावली जाणारी शाई लगेच पुसली जात असल्याचा प्रकार उघडकीस आला.

### महापालिकांचे मतदान सुरू असतानाच

# अजित पवारांनी फोडला जिल्हा परिषदेचा नारळ

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १५**

राज्यात आज 29 महानगरपालिकांसाठी मतदान प्रक्रिया सुरू असतानाच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुढील राजकीय रणनिती स्पष्ट करत जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या प्रचाराचा नारळ पुणे जिल्ह्यात फोडला आहे. उद्या 16 जानेवारीला महापालिका निवडणुकांचा निकाल लागणार असतानाच, अजित पवार यांनी बारामतीतील राष्ट्रवादी भवनात कार्यकर्ता मेळावा घेऊन येत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा अजेंडा मांडला. या मेळाव्यात त्यांनी निवडणूक कार्यक्रम, आरक्षण, विकास आराखडे, उमेदवारी प्रक्रिया आणि कार्यकर्त्यांच्या भूमिकेवर सविस्तर भाष्य करत स्पष्ट शब्दांत सूचना दिल्या.

अजित पवार यांनी सांगितले की, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांसाठी 16 जानेवारीपासून नामनिर्देशन अर्ज दाखल करता येणार आहेत. कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, पुणे, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, धाराशिव आणि परभणी या 12 जिल्हा परिषदांसाठी मतदान होणार आहे. उर्वरित जिल्हा परिषदांच्या निवडणुकांसाठी 50 टक्के



आरक्षणासंदर्भात सुप्रीम कोटार्चे निर्देश असल्याने त्यानंतरच परवानगी दिली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. सुप्रीम कोटार्ने सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका 31 जानेवारी 2026 पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश दिले असून, जिल्हा परिषद निवडणुकांसाठी 15 फेब्रुवारीपर्यंत मुदत देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

निवडणूक कार्यक्रमाची सविस्तर माहिती देताना अजित पवार म्हणाले की, 16 ते 21 जानेवारीदरम्यान नामनिर्देशन अर्ज स्वीकारले जातील, 22 जानेवारीला छाननी होईल, तर 27 जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत असेल. प्रजासत्ताक दिन आणि सार्वजनिक सुट्ट्यांचा विचार करून ही तारीख निश्चित करण्यात आली आहे. 5 फेब्रुवारीला मतदान होणार असून 7 फेब्रुवारी रोजी मतमोजणी होईल. याच दिवशी बारा जिल्हा परिषद आणि संबंधित सर्व तालुका पंचायत समित्यांचे निकाल जाहीर होतील, असेही त्यांनी सांगितले. महानगरपालिका आणि नगरपालिका निवडणुकांबाबत बोलताना अजित पवार यांनी बारामती आणि माळेगावचा खास उल्लेख केला. बारामती नगरपरिषदेत 41 पैकी सुमारे 35 जागांवर राष्ट्रवादीच्या चिन्हावर निवडून आलेले उमेदवार विजयी झाले, तर सहा वेगवेगळ्या विचारांचे उमेदवार निवडून आले. त्यातील तीन अपक्ष नगरसेवकांनी बारामतीतील सर्वांगीण विकास पाहून राष्ट्रवादीला पाठिंबा दिला असल्याचे त्यांनी सांगितले. यामुळे स्वीकृत नगरसेवकांच्या चार जागा भरण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. माळेगाव नगरपंचायतीत सुहास सातपुते निवडून आल्याबद्दल त्यांनी मतदारांचे आभार मानले.

# महिलेच्या नावावर आधीच मतदान झाल्याचा प्रकार

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १५**

पुण्यात सुरू असलेल्या महानगरपालिका निवडणुकांदरम्यान मतदान प्रक्रियेबाबत गंभीर आरोपांची मालिका सुरू झाली आहे. मतदानानंतर बोटावर लावली जाणारी शाई किंवा मार्कर लिक्विडने पुसून पुन्हा मतदान केल्याचा दावा अनेक ठिकाणी केला जात असून, त्यामुळे बोगस मतदानाचा संशय अधिकच गडद झाला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी थेट निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. काही महिलांकडून जाणीवपूर्वक बोगस मतदान केले जात असल्याचा दावा त्यांनी केला असून, या प्रकरणाची तातडीने चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

चाकणकर यांनी केलेल्या तक्रारीनुसार पुण्यातील प्रभाग क्रमांक 34 मध्ये हा प्रकार मोठ्या प्रमाणात घडत असल्याचे समोर आले आहे. या प्रभागात काही महिला आणि मुले मतदानानंतर बोटावरील शाई लिक्विड किंवा इतर द्रव्याने पुसून पुन्हा मतदान करत असल्याचा आरोप आहे. या संदर्भात सविस्तर माहिती निवडणूक आयोगाकडे देण्यात आली असून, ही बाब अत्यंत गंभीर असल्याचे चाकणकर यांनी स्पष्ट केले आहे. निवडणूक प्रक्रियेचा गैरफायदा घेत काही घटक सत्ताधाऱ्यांना मदत करत असल्याचा संशयही त्यांनी व्यक्त केला आहे.

दरम्यान, या आरोपांनंतर आता पुण्यातील आणखी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. प्रभाग क्रमांक 21 मधील कटारिया हायस्कूल येथील मतदान केंद्रावर एका महिलेच्या नावावर आधीच मतदान झाल्याची नोंद आढळून आली. संबंधित महिला मतदानासाठी केंद्रावर पोहोचली असता, तिच्या नावासमोर मतदान झाले आहे अशी नोंद दिसून आली. त्यामुळे एकच गोंधळ उडाला आणि मतदान यंत्रणेतील त्रुटी पुन्हा एकदा उघड झाल्या.

या घटनेबाबत माहिती देताना संबंधित महिलेने सांगितले की, मतदानासाठी आत गेल्यानंतर तिने आपला ओळखपत्र क्रमांक दिला. अधिकाऱ्यांनी यादी तपासल्यानंतर तिला थेट सांगितले की, तिचे मतदान आधीच झाले आहे. यानंतर फाईल तपासण्यात आली असता, त्यामध्ये तिच्याच नावासमोर हुबेहूब सही करण्यात आलेली असल्याचे दिसून आले. अधिकाऱ्यांनी उलट तिलाच तुम्ही आधी मतदान करून गेलात, असे सांगितल्याने ती संतप्त झाली.

महिलेने या प्रकाराला जोरदार आक्षेप घेत बोगस मतदान झाल्याचे स्पष्टपणे सांगितले. सुरुवातीला तिला काही कागदांवर सही करण्यास सांगण्यात आले, मात्र तिने नकार दिला. नंतर अधिकाऱ्यांनी तिला समजावून सांगितले की, या प्रक्रियेमुळे आधी झालेले बोगस मतदान रद्द होईल. मोठ्या दबावानंतर अखेर तिच्याकडून पोस्टल मतदान करून घेण्यात आले. मात्र, मतदान केंद्रावरच आपल्या नावाचा गैरवापर झाल्याचा अनुभव अत्यंत धक्कादायक असल्याचे तिने सांगितले.

### नवी मुंबईत सरकारी यंत्रणेला दावणीला बांधण्याचा प्रयत्न

# शिंदे गटाच्या खासदाराचा भाजपवर आरोप

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५ :**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेचे खासदार नरेश म्हस्के यांनी भाजपवर मतदारांना धमकावल्याचा आरोप केला आहे. नवी मुंबईत सरकारी यंत्रणेला दावणीला बांधण्याचा प्रयत्न झाला आहे. पोलिस आयुक्तही कुणाच्या तरी ताटातले मांजर झाल्याचे चित्र आहेत. हा सर्व प्रकार चुकीचा आहे, अन्यथा आम्हाला सुद्धा कायदा हातात घ्यावा लागेल, असे ते म्हणालेत.

खासदार नरेश म्हस्के म्हणाले, महापालिका निवडणुका सुरू आहेत. उमेदवारांना प्रोत्साहन देण्यासाठी मी प्रत्येक बुथला भेटी देत आहे. पण पोलिसांना हाताशी धरून बाहेरून माणसे आणून या ठिकाणी दादागिरी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. मतदारांना धमकावण्यात येत आहे. त्यांच्यावर खोट्या केसेस टाकण्याचा प्रयत्न सुरू आहे. पोलिस आयुक्तांनी कुणाच्या तरी हातचे बाहुले बनू नये. महापालिका निवडणूक आम्ही वेगवेगळ्या पद्धतीने लढत असलो तरी शेवटी आम्हीही सत्तेत आहोत हे त्यांनी लक्षात घ्यावे. कारण, नवी मुंबईत सध्या दादागिरी करून मतदारांचे ओळखपत्र तपासणे, मतदारांना मारणे असे प्रकार सुरू आहेत.

ते पुढे म्हणाले, पोलिसांनी आमच्या 2 उमेदवारांना ताब्यात घेतले. काही गुंड प्रवृत्तीचे लोक आमच्या उमेदवारांच्या कार्यकर्त्यांना दमदाटी करत होते. उमेदवारांना काम करू देत नव्हते. आम्ही पोलिसांना त्याची माहिती दिली. पण शेवटी अती झाल्यामुळे आमचे उमेदवार जाब विचारण्यासाठी गेले. पण पोलिसांनी



त्यांनाच अटक केली. पोलिसांचा वापर करून उमेदवारांना मतदारांपर्यंत पोहोचण्यापासून मज्जाव करणे हा साफ चुकीचा प्रकार आहे. रस्त्याने चालणाऱ्या माणसाला मारणे, मतदानाला जाऊ नका म्हणून दादागिरी करणे, ही हुकूमशाही आहे का?

नवी मुंबईचे पोलिस आयुक्त कुणाच्या ताटातले मांजर आहेत का? सध्या जे काही सुरू आहे ते साफ चुकीचे आहे. आम्हाला कायदा हातात घ्यावा लागेल. कुणाच्या तरी दमदाटीमुळे पोलिसांचा नाईलाज झाला आहे. काही जण स्वतःला नवी मुंबईचे सम्राट समजतात. ते मंत्री निवडणूक आयोगावरही टीका करतात. हा प्रकार सरकारी यंत्रणेला दावणीला बांधण्याचा आहे, असे म्हस्के म्हणाले,

उल्लेखनीय बाब म्हणजे नरेश म्हस्के यांनी या प्रकरणी पोलिसांवर टीका करताना या प्रकरणात गृह मंत्रालयाचा कोणताही हात नसल्याचेही प्रामुख्याने अधोरेखित केले. या प्रकारात गृह मंत्रालयाचा कोणताही हात नाही. कुणी तरी स्वतःला नवी मुंबईचे सम्राट समजतात. त्यांच्याकडून जोरजबरदस्तीने असे प्रकार सुरू आहेत, असे ते म्हणाले.

## निवडणुकीत लाखोंची रोकड जप्त

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १५ :**

पुणे महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहितेचा भंग होत असल्यास कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्या अनुषंगाने मंगळवारी (दि. १३) रात्री येवलेवाडी परिसरात वेगवेगळी पथके तयार करून शोध घेत असताना खडीमशिन चौकात दोन चारचाकी वाहनांमध्ये भरारी पथकाला एक लाखाची रोकड (पाचशे रुपयांचे दोन बंडल), लिफाफे आणि वह्या असा मुद्देमाल सापडला. अपर पोलिस आयुक्त मनोज पाटील, उपायुक्त राजलक्ष्मी शिवणकर, वरिष्ठ पोलिस निरीक्षक अमर काळंगे यांच्या मार्गदर्शनाखाली भरारी पथकाने ही कारवाई केली.

# बोगस मतदान रोखण्यासाठी निवडणूक आयोग सक्षम

■ **महासागर प्रतिनिधी
ठाणे, दि. १५ :**

कोणतेही बोगस मतदान होऊ नये, प्रत्येक मतदाराला आपला हक्क बजावता यावा, यासाठी निवडणूक आयोग दक्ष आहे. त्यामुळे सर्वांनी निर्भयपणे मतदान करावे, असे आवाहन करत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोठ्या प्रमाणावर मतदान होईल, असा विश्वास व्यक्त केला. ठाण्यातील किसन नगर येथे एकनाथ शिंदे यांनी आपल्या कुटुंबासह मतदान केले.त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते बोलत होते.

ठाण्यातील वागळे इस्टेटसह संपूर्ण शहरात मतदारांमध्ये प्रचंड उत्साह दिसून येत आहे. मुंबईतही सकाळीच चांगला प्रतिसाद मिळाल्याचे त्यांनी नमूद केले. मतदान हा लोकशाहीतील सर्वात महत्त्वाचा हक्क आहे. आपल्या शहराच्या



विकासासाठी, भविष्यातील सोयी-सुविधांसाठी प्रत्येक नागरिकाने मतदान करणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले.

निवडणूक प्रक्रियेबाबत बोलताना एकनाथ शिंदे यांनी निवडणूक आयोग पारदर्शक आणि काटेकोर पद्धतीने काम करत असल्याचे सांगितले. कुठेही मतदान यंत्रात अडचण आल्यास त्याची तातडीने नोंद घेऊन मतदार वंचित राहू नयेत, यासाठी आवश्यक उपाययोजना केल्या जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

राज्यभरात आज महापालिकांच्या निवडणुकांसाठी शांततेत आणि उत्साहात मतदान सुरू आहे. ठाण्यात कुटुंबासह मतदान केल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकारांशी संवाद साधत सर्व मतदारांना मतदान करण्याचे आवाहन केले. यावेळी खासदार श्रीकांत शिंदे उपस्थित होते.

चौकट यावेळी एकनाथ शिंदे यांना मतदारांना लावण्यात येणारी शाई पुसली जात आहे, याबाबत प्रश्न विचारले असता या आधी निवडणुकीत बाटली तून शाई लावली जायची आता ती मार्कर द्वारे लावले जात आहे, त्यामुळे शाई मध्ये कोणतेही फेरफार केलेली नाही असे स्पष्टीकरण त्यांनी यावेळी दिले.

## बोटावरील निशाणी पुसली जात असल्याने आयोग अडचणीत

■ **महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १५ :**



राज्यातील 29 महानगरपालिकांसाठी आज सुरू असलेल्या मतदान प्रक्रियेदरम्यान एक अत्यंत धक्कादायक आणि गंभीर प्रकार समोर आला आहे. मतदानानंतर मतदारांच्या बोटावर लावली जाणारी शाई सहज पुसली जात असल्याचे अनुभव अनेक मतदारांनी सोशल मीडियावर मांडले आहेत. यामुळे आधीच वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या निवडणूक आयोगावर पुन्हा एकदा टीकेची झोड उठली आहे. मतदानापूर्वी पैसे वाटप, दुबार मतदार आणि बोगस मतदारांच्या आरोपांनंतर आता थेट मतदान प्रक्रियेच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

नेहमीप्रमाणे मतदानानंतर न पुसली जाणारी विशेष शाई वापरण्याऐवजी यावेळी अनेक मतदान केंद्रांवर थेट मार्कर पेनने बोटावर निशाणी केल्याचे समोर आले आहे. हा मार्कर सहजपणे पुसता येत असल्याने दुबार मतदानाचा धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे हा प्रकार केवळ काही ठिकाणी मर्यादित नसून मुंबईसह इतर शहरांमधूनही असे अनुभव समोर येत आहेत. त्यामुळे निवडणूक आयोगाच्या तयारीवर आणि नियोजनावर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. दरम्यान, मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत सकाळी 9.30 वाजेपर्यंत केवळ 6.98 टक्के मतदान झाल्याची माहिती समोर आली आहे. दादरमधील शिवाजी पार्क परिसरातील बालमोहन विद्यालय या मतदान केंद्रावर 20 मिनिटे ईव्हीएम मशीन बंद असल्याचा प्रकार घडला. या काळात एकही मतदान होऊ शकले नाही. त्यामुळे या केंद्रावरील मतदानाची वेळ वाढवण्यात आली.

### निवडणूक काळात गैरहजर राहिल्याने

## पाच पोलिसांचे निलंबन

■ **महासागर प्रतिनिधी, पिंपरी, दि. १५ :**

निवडणूक काळात गैरहजर राहिल्याने पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलातील पाच पोलिसांचे निलंबन करण्यात आले. याबाबतचे आदेश पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी दिले आहेत. पोलीस हवालदार संजय केळकर, सागर बाविस्कर, पोलीस शिपाई जगन्नाथ शिंदे, प्रतिभा गावडे, संतोष जाधव अशी निलंबित केलेल्या पोलिसांची नावे आहेत. हे सर्वजण पोलीस मुख्यालयात नेमणुकीस आहेत.

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी गुरुवारी (१५ जानेवारी) होत आहे. त्यापूर्वी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील तळेगाव, आळंदी, चाकण नगरपरिषदांची निवडणूक झाली. आता पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक सुरु असून या कालावधीत शहरात अनेक महत्वाचे नेते शहराचा दौरा करत आहेत. अशा कालावधीत मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त लावला जातो.

मनुष्यबळाअभावी आहे त्या मनुष्यबळावर पोलिसांना संपूर्ण कामकाज करावे लागते. निलंबित केलेले पोलीस अंमलदार मागील काही महिन्यांपासून रजेवर गेले आहेत. त्यांना पोलीस मुख्यालयाकडून अनेक वेळेला पत्र पाठवून कर्तव्यावर हजर होण्यास सांगण्यात आले होते. मात्र त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे कारवाईचा बडगा उगारत पोलीस आयुक्तांनी पाच जणांचे तडकाफडकी निलंबन केले आहे. कर्तव्यावर हजर न राहण्याबाबत त्यांची विभागीय चौकशी सुरु राहणार असल्याचे आदेशात नमूद आहे.

# कांदिवलीतील मतदान केंद्रावर आचारसंहितेचे उल्लंघन


### मतदारांची नावे शोधण्यासाठी भाजपच्या ॲपचा वापर

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५ :**

मुंबईच्या कांदिवली येथील एका मतदान केंद्रावर नेमलेले निवडणूक अधिकारी मतदारांची नावे शोधण्यासाठी भाजपच्या ॲप्लिकेशनचा वापर करत असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. निवडणूक प्रक्रिया पूर्णपणे निष्पक्ष व तटस्थ असणे अपेक्षित असताना, एका विशिष्ट राजकीय पक्षाच्या ॲपचा वापर होत असल्याने निवडणूक आचारसंहितेचे उल्लंघन झाल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे.

या घटनेमुळे स्थानिक मतदारांमध्ये तीव्र संतापाची भावना व्यक्त होत असून, या प्रकरणाची निवडणूक आयोगाने तात्काळ दखल घेऊन सखोल चौकशी करावी व दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी करण्यात येत आहे. यावेळी येथील शिवसेना ठाकरे गटाचे आणि मनसेच्या कार्यकर्त्यांनी या प्रकारचा तीव्र निषेध केला आहे.

यावेळी शिवसेना ठाकरे गट आणि मनसेच्या अधिकृत उमेदवाराने सांगितले की, प्रभाग क्रमांक 19 कांदिवली येथे मुंबई महापालिकेने जे अधिकारी नेमले आहेत, ज्यांचे काम मतदारांचे नाव शोधणे हे आहे आणि यासाठी महापालिकेचे



वेगळे ॲप्लिकेशन असताना सुद्धा भाजपचे ॲप वापरुन तसेच येथील स्थानिक उमेदवारांचे ॲप वापरुन मतदारांची नावे शोधून देत आहेत आणि ते भाजपला प्रमोट करत असल्याचा दावा करण्यात आला.

सरकारी अधिकारीच भाजपचा प्रचार करत आहेत. त्यामुळे या अधिकाऱ्यांवर तात्काळ गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी शिवसेना ठाकरे गट आणि मनसेच्या कार्यकर्त्यांनी केली आहे. तसेच सगळ्या प्रभागातील व मतदान केंद्रातील अधिकारी कोणते ॲप वापरत आहेत, याचा देखील तपास करण्यात यावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

# महिलांकडून बोटावरील शाई द्रवाने पुसून पुन्हा मतदान केल्याचा दावा

### महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांची आयोगाकडे तक्रार



■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १५**

राज्यभर सुरू असलेल्या महानगरपालिका निवडणुकांमध्ये मतदानानंतर बोटावर लावल्या जाणाऱ्या शाईऐवजी वापरल्या जाणाऱ्या मार्कर पेनमुळे मोठा वाद निर्माण झाला आहे. पारंपरिक न निघणाऱ्या शाईऐवजी यंदा मार्करचा वापर करण्यात आल्याने मतदान केल्यानंतर बोटावरील खूण पुसली जात असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत असून, अनेक ठिकाणी बोगस मतदान झाल्याचे आरोप होत आहेत. पुणे, मुंबई, कोल्हापूर, उल्हासनगरसह विविध शहरांतून या संदर्भातील तक्रारी, व्हिडिओ आणि प्रत्यक्ष घटना समोर आल्याने राजकीय वातावरण तापले आहे.

पुण्यात महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी थेट राज्य निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करत खळबळ उडवून दिली आहे. पुण्यातील प्रभाग क्रमांक 34 (नऱ्हे, वडगाव बुद्रुक, धायरी) येथे काही महिलांकडून बोटावरील शाई लिक्विड किंवा फिनरसारख्या द्रवाने पुसून पुन्हा मतदान केल्याचा दावा त्यांनी केला आहे. धायरी फाट्याजवळील नारायणराव सणस विद्यालयाच्या मतदान केंद्राबाहेर सकाळी साडेदहाच्या सुमारास असा प्रकार उघडकीस आल्याचे सांगण्यात येते. या ठिकाणी बोटावरील खूण पुसताना आढळलेल्या एका व्यक्तीला राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी पकडून मारहाण केल्याचीही माहिती समोर आली आहे. या घटनेनंतर बोगस मतदानाच्या आरोपांना अधिक बळ मिळाले आहे.

मुंबईतही मतदान करून परतलेल्या काही नागरिकांच्या बोटावरील शाई पुसली जात असल्याचे प्रकार उघडकीस आले. मुंबई महानगरपालिका निवडणुकीत यंदा मतदारांच्या बोटावर शाईऐवजी मार्करने खूण करण्यात येत आहे. मात्र, या मार्करची शाई विशेषतः नखावरून सहज निघत असल्याचे निदर्शनास आले आहे. मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांनीही बोटावरील नखावरची शाई पुसली जात असल्याची कबुली दिली आहे. काही व्हिडिओ समोर आल्यानंतर आयुक्तांकडे तक्रारी दाखल झाल्या असून, त्यांनी या प्रकरणी चौकशीचे आदेश दिले आहेत.

## खडकी परिसरातील मतदान केंद्रांवरील प्रशासनाची उदासीनता

**अकोला :** खडकी परिसरातील मतदान केंद्रांवर आज लोकशाहीची एक विदारक, असंवेदनशील आणि लाजिरवाणी छबी समोर आली आहे. निवडणूक प्रक्रियेचा कणा असलेल्या बी.एल.ओ. (बूथ लेव्हल ऑफिसर) आणि मतदारांसाठी साधा मंडप टाकण्याचे सौजन्यसुद्धा निवडणूक विभागाने दाखवलेले नाही. भर उन्हाच्या कडक झळांमध्ये बी.एल.ओ. आणि मतदार झाडांच्या सावलीचा आधार घेत बसलेले दिसत आहेत



ही परिस्थिती लोकशाहीच्या गौरवशाली परंपरेला शोभणारी आहे का, असा संतप्त प्रश्न उपस्थित होतो.लोकशाहीच्या मंदिरात सेवा देणारे कर्मचारी आज अक्षरशः उघड्यावर बसले आहेत. उन्हाची तीव्रता, वाढता उष्माघाताचा धोका, पाण्याची अपुरी व्यवस्था या सगळ्याच्या जोखडातही बी.एल.ओ. आपले कर्तव्य इमानदारीने, निष्ठेने बजावत आहेत. मतदारही आपला मतदानाचा हक्क बजावण्यासाठी त्रास सहन करत आहेत. पण या साऱ्या परिस्थितीकडे पाहण्याची, पूर्वतयारी करण्याची आणि किमान मानवी गरजा भागवण्याची जबाबदारी ज्यांची होती.

# अकोला महानगरपालिका निवडणूक शांततेत पार! ४६९ उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद

### उत्साहाची ऊर्मी झोपडपट्ट्यांत ! उदासीनतेची छाया उच्चभ्रू वस्त्यांत !

▪अकोला,दि.१५ (प्रतिनिधी)▪

लोकशाहीच्या उत्सवात आज अकोला शहर साक्षीदार ठरले मात्र या उत्सवाचे रंग सर्वत्र सारखे नव्हते. अकोला महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत मुस्लिम वस्त्या व झोपडपट्टी भागांमध्ये मतदारांचा उत्साह ओसंडून वाहताना दिसला, तर सुविधा-संपन्न व उच्चभ्रू वस्त्यांमध्ये मतदारांची ठळक उदासीनता प्रकर्षाने जाणवली.

सकाळपासूनच अनेक मतदान केंद्रांवर लांबच लांब रांगा लागल्या होत्या. युवकांपासून ज्येष्ठांपर्यंत, महिला-पुरुषांनी उष्णतेची पर्वा न करता मतदानाचा हक्क बजावला आणि लोकशाही प्रक्रियेला बळ दिले. दुसरीकडे, अकोला पूर्वेसह काही उच्चभ्रू वसाहतींमध्ये मतदान केंद्रांवर शुकशुकाटाचे दृश्य पाहायला मिळाले; मतदारांनी पाठ फिरवल्याचे चित्र स्पष्ट झाले.

४६९ उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद .वीस प्रभागांमध्ये एकूण ४६९ उमेदवारांचे राजकीय भवितव्य आज मतपेटीत सीलबंद झाले असून उद्या निकाल जाहीर होणार आहे. सकाळी ३.३० वाजेपर्यंत शहरातील मतदानाची टक्केवारी ४३.३५ टक्के इतकी नोंदविण्यात आली.

संपूर्ण शहरात मतदान प्रक्रिया काही किरकोळ घटना वगळता एकूण शांततेत पार पडली असली, तरी अनेक ठिकाणी

















निवडणूक आचारसंहितेचे उल्लंघन होत असल्याची दृश्ये दिसून आली. काही मतदान केंद्रांवर उमेदवारांचे प्रतिनिधी उघडपणे प्रचार करताना आढळले; मात्र याकडे शासकीय यंत्रणेचे दुर्लक्ष व सुस्ती प्रकर्षाने जाणवली.

लोकशाहीची परीक्षा , सुविधा अपुऱ्या, यंत्रणा निष्क्रिय या निवडणुकीत लोकशाहीचे विदारक रूप अनेक ठिकाणी समोर आले. निवडणूक कर्मचारी, बी.एल.ओ. आणि मतदार यांना भर उन्हात बसून आपले कर्तव्य बजावावे लागले. अनेक मतदान केंद्रांवर साधा मंडप नाही, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही.इतर सुविधा तर दूरच.अंध, अपंग, वयोवृद्ध ज्येष्ठ नागरिकांना मतदानासाठी मोठ्या प्रमाणात हेलपाटे मारावे लागले. एकाच कुटुंबातील मतदारांचे मतदान वेगवेगळ्या बूथवर ठेवण्यात आल्याने नागरिकांची धावपळ झाली.

अनेक मतदान केंद्रे घरापासून दूर असल्याने प्रक्रिया संथ झाली. काही मतदारांनी तर मतदान केंद्र न सापडल्याने मतदानच केले नाही.लोकशाहीच्या सावलीखाली उभे राहणारे बी.एल.ओ. झाडाखाली, उन्हात बसून काम करत होते आणि मतदारही उन्हात उभे राहून आपला क्रमांक येण्याची वाट पाहत होते हे दृश्य लोकशाही व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे ठरले.उत्साह कुणाचा, जबाबदारी कुणाची ?झोपडपट्टी व अल्पसंख्याक भागातील मतदारांनी दाखवलेला उत्साह लोकशाहीवरील विश्वास अधोरेखित करतो, तर उच्चभ्रू वस्त्यांमधील उदासीनता ही गंभीर आत्मपरीक्षणाची गरज निर्माण करते. मतदान ही केवळ प्रक्रिया नसून जबाबदारी आहे, याची जाणीव सर्व स्तरांत पोहोचणे आवश्यक आहे.अकोला महानगरपालिका निवडणूक शांततेत संपन्न झाली असली, तरी निवडणूक यंत्रणा, सुविधा आणि नियोजनाबाबतचे प्रश्न या निवडणुकीने पुन्हा एकदा ऐरणीवर आणले आहेत.

लोकशाही केवळ मतपेटीत नव्हे, तर व्यवस्थेतही दिसली पाहिजे.हीच या निवडणुकीतून उमटलेली ठळक अपेक्षा आहे. मतदान झाल्यामुळे सर्वच उमेदवार कोमात गेली असून उद्याच्या मतमोजणीची वाट पाहत बसले आहेत. उद्या कोण हरणार कोण जिंकणार याकडे सर्व मतदारांचे लक्ष लागलेले आहे. उद्या सकाळी दहा वाजता पासून मतमोजणीला सुरुवात होऊन दुपारपर्यंत निकाल लागण्याची शक्यता आहे यावेळी एकाच ठिकाणी मतदान मोजणी नसल्यामुळे शहरांमध्ये सहा ठिकाणी वेगळ्या ठिकाणी मतमोजणी होणार आहे . त्यामुळे परिसरात गर्दी कमी होऊन निकाल लवकर लागणार आहे.

## थोडक्यात

### वाढदिवसानिमित्त आणलेला केक सडलेला निघाला

**पातुर :** तालुका प्रतिनिधी पातूर शहरातील पातुर बाळापूर महामार्ग मा भवानी बिकानेर स्वीट अँड बर्थडे केक शॉप येथून वाढदिवसानिमित्त केक आणला असता सदर केक सडलेला आणि त्यामध्ये किडे आणि अळ्या निघाल्याने वाढदिवसाच्या मुहूर्तावर विरजण पडल्यामुळे येथील सागर सय्यदसह युवकांनी अन्न औषध प्रशासन विभाग अकोला सहाय्यक आयुक्त कार्यालय अकोला यांच्याकडे तक्रार करून महा भवानी बिकानेर स्वीट्स अँड बर्थडे केक शॉप वर कारवाई करण्याची मागणी तक्रारीतून केली आहे. तक्रारीमध्ये मा भवानी बिकानेर स्वीट्स बर्थडे केक चे मालक नागरिकांच्या जीवाशी खेळत असून खराब निकृष्ट दर्जाचे सडलेले खाद्यपदार्थ सदरच्या दुकानात मोठ्या प्रमाणात विक्री केले जात आहेत यापूर्वी दिवाळी सणाला सुद्धा भेसळ युक्त निकृष्ट दर्जाच्या पदार्थाची विक्री केल्याने नागरिकांना विविध आजाराने ग्रासले होते सदर दुकानांमध्ये बनत असलेल्या खाद्यपदार्थांची तपासणी करावी नागरिकांच्या आरोग्याला धोका पोहोचवणारे सदर दुकान दाराविरुद्ध कारवाई करावी आणि सदर दुकान कायमस्वरूपी बंद करावे अशी तक्रारीतून मागणी केली आहे. दि. १३ जानेवारी रोजी वाढदिवसानिमित्त सदर दुकानांमधून केक विकत घेतला असता सदर केक हा सडलेला होता.

### भौरद येथे आरोग्य तपासणी शिबिर

**अकोला :** संत रोहिदास महाराज सभागृह येथे भीमशक्ती सोशल ग्रुप आक्रमण युवक संघटना व सर्व ग्रामस्थ यांनी आयोजित केलेल्या मोफत आरोग्य तपासणी व भव्य रक्तदान शिबिराला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मोफत आरोग्य शिविरात बोलताना डॉ. अल्केश दीपक गुल्हाने (कॅन्सर तज्ञ) यांनी कॅन्सर विषयी जनजागृती करून मादक पदार्थांच्या सेवनामुळे मानवी आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणाम सांगितले, महिलांना होणाऱ्या कॅन्सर विषयी जनजागृती केली व डॉ. अमोल राखणकर (ऑर्थो सर्जन) डॉ. सागर भुईभार नेत्ररोग तज्ञ डॉ. देवेंद्र डोंगरे जनरल फिजिशियन यांनी गावातील सर्व महिला व पुरुष रुग्णांची तपासणी व त्यांना आरोग्य विषयी मार्गदर्शन केले. भव्य रक्तदान शिबिरात गावातील तरुणांनी सुद्धा उत्स्फूर्तपणे रक्तदान करून रक्तदान शिबिर यशस्वी केले.

## घरफोडीचा पर्दाफाश! अकोट पोलिसांची मोठी कामगिरी

### दोघे सख्खे भाऊ अटकेत, ३.१० लाखांचा मुद्देमाल जप्त

▪अकोट,दि.१५ (प्रतिनिधी)▪

तालुक्यातील कुंभारवाडी परिसरात घडलेल्या तब्बल सात लाख रुपयांच्या घरफोडी प्रकरणाचा अखेर उलगडा झाला असून, अकोट पोलिसांनी वेगवान आणि अचूक तपास करत दोघा सख्ख्या भावांना अटक केली आहे.

या कारवाईत पोलिसांनी चोरीतील एकूण ३ लाख १० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, दोन्ही आरोपी सध्या अकोला जिल्हा कारागृहात आहेत. ही घटना ३ ऑक्टोबर २०२५ रोजी घडली होती. फिर्यादी सुलोचना गंगाराम धर्मे (वय ६८), रा. कुंभारवाडी, मोठे बारगण, अकोट यांनी २८ ऑक्टोबर रोजी अकोट पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. पान विक्री व्यवसायातून आणि शेत लागवडीसाठी जमवलेले सात लाख रुपये घरातील लाकडी आलमारीत ठेवले होते. दरम्यान, त्या अंजनगाव सुर्जी येथे बहिणीकडे गेलेल्या असताना अज्ञात आरोपींनी घरफोडी करून



ही रक्कम चोरून नेली होती.तक्रारीवरून भा.न्या.संहिता २०२३ अंतर्गत गुन्हा दाखल करून तपास सुरू करण्यात आला. डि.बी. पथकाने संशयावरून प्रविण रमेश उंदरे (वय ३०) याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने आपल्या भाऊ करण उर्फ कृष्णा उंदरे याच्यासह घरफोडी केल्याची कबुली दिली. तपासादरम्यान सोन्याचे कानातले, दोन मोटारसायकली, टिनपत्रे, लोखंडी अँगल असा २.३० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.यानंतर फरार करण उंदरे यालाही अटक करून त्याच्याकडून मोबाईल, चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा आणखी ८०,५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. या प्रकरणात पोलिसांच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत असून, अकोट पोलिसांनी घरफोडी प्रकरणात ठोस कारवाई करत गुन्हेगारीवर चांगलाच अंकुश ठेवला आहे.

## महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अकोल्यात ५० लाखांची रोकड जप्त

▪अकोला,दि.१५ (प्रतिनिधी)▪

अकोला महानगरपालिकेची निवडणूक अवघ्या काही तासांवर येऊन ठेपली असताना शहरात एक मोठी घडामोड घडली आहे. मतदान प्रक्रिया सुरू होण्याच्या काही तास आधीच खदान पोलिस ठाण्याच्या हद्दीत बुधवारी रात्री करण्यात आलेल्या कारवाईत ५० लाख रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली आहे. अकोला महानगरपालिकेच्या २० प्रभागांतील ८० जागांसाठी ४६१ उमेदवार निवडणूक मैदानात आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध प्रभागांमध्ये जोरदार प्रचार सुरू असून अनेक ठिकाणी तिरंगी व चौरंगी लढती रंगल्या आहेत. अशा स्थितीत मतदारांचे पाठबळ मिळिवण्यासाठी उमेदवारांकडून मोठ्या प्रमाणावर प्रयत्न सुरू असल्याचे चित्र आहे.

निवडणूक काळात पैसे वाटपाच्या आरोपांवर नेहमीच चर्चा होत असते. याच दरम्यान, अकोला शहरातील खदान पोलिस ठाण्यांतर्गत मोठ्या प्रमाणावर रोख रक्कम बाळगली जात असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे खदान पोलिसांनी तत्काळ कारवाई करत विद्यानगर भागातून ५० लाख रुपयांची रोकड जप्त केली. ही रक्कम बाळगणाऱ्या एका व्यक्तीची पोलिसांकडून चौकशी सुरू आहे.

ही रोकड नेमकी कोणाची आहे, ती कुठल्या कारणासाठी ठेवण्यात आली होती आणि तिचा वापर महापालिका निवडणुकीसाठी होणार होता का, याचा सखोल तपास करण्यात येत आहे. या कारवाईची माहिती महापालिका निवडणूक विभाग तसेच प्राप्तिकर विभागालाही देण्यात आली आहे.

मतदानाच्या पूर्वसंध्येला घडलेल्या या घटनेमुळे शहरात चर्चेला उधाण आले असून निवडणूक प्रक्रियेवर याचा काय परिणाम होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास खदान पोलिसांकडून सुरू असून तपासानंतर अधिक माहिती देण्यात येईल, असे खदान पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक मनोज केदारे यांनी सांगितले.

## पद्मश्री पद्मजा फेणाणी यांचे हस्ते अकोल्याचे सी.ए.तुषार तल्हार यांचा सत्कार

▪अकोला,दि.१५ (प्रतिनिधी)▪

आठवणीतील कुसुमाग्रज 'या ग्रंथाच्या लिखाणात मोलाचे सहकार्य केल्याबद्दल अकोला येथील युवा सी. ए. तुषार अंबादास तल्हार यांचा स्वरचंद्रिका पद्मश्री पद्मजा फेणाणी जोगळेकर यांचे हस्ते नाशिक येथील एका शानदार समारंभात सत्कार करण्यात आला. नाशिक येथील साप्ताहिक ' कुसुमाग्रज नगर ' यांचे तर्फे आठवणीतील कुसुमाग्रज या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला होता. कविवर्य कुसुमाग्रज अर्थात वि. वा. शिरवाडकर यांच्या ११३ व्या जयंतीनिमित्त हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. हा ग्रंथ महाराष्ट्रातील ६० लेखकांनी आपल्या अनुभवातून लिहिलेल्या कुसुमाग्रजांच्या आठवणी मधून तयार करण्यात आला आहे. याकरिता अकोल्यातील युवा सी. ए. तुषार



तल्हार यांचे सुद्धा योगदान लाभले आहे. त्यांच्या या कार्याबद्दल या ग्रंथाचे संपादक राम दास नागवंशी व त्यांच्या सहकाऱ्यांनी हा सत्कार सोहळा घडवून आणला. आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या प्रख्यात गायिका स्वरचंद्रिका पद्मश्री पद्मजा फेणाणी जोगळेकर यांचे हस्ते अकोल्यातील या युवा सी. ए. चा सत्कार व्हावा ही निश्चितच अभिनंदनीय व कौतुकास्पद बाब आहे.

## नागरिकांच्या समस्यांबाबत निगडित असलेले कर्मचाऱ्यांचे कक्ष तळमजल्यावर घेण्यात यावे

### पाच नगरसेवकांची मुख्याधिकाऱ्यांकडे मागणी

▪तेल्हारा,दि.१५ (प्रतिनिधी)▪

नागरिकांच्या समस्यांशी निगडित असलेले संबंधित सर्व कर्मचाऱ्यांचे पालिके मधील कक्ष वरच्या मजल्यावर घेण्यात आल्यामुळे ज्येष्ठ व अपंग नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे तरी संबंधित कर्मचाऱ्यांचे कक्ष तळमजल्यावर घेण्यात यावे याकरिता विरोधी गटातील गटनेत्यांसह पाच नगरसेवकांनी तेल्हारा पालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदन देऊन मागणी केली आहे.नगर परिषद कार्यालयात बरेच कर्मचार्याचे कक्ष हे वरच्या मजल्या वर करण्यात आले आहे नगर परिषद कर्यालयात शहरातील नागरिकांना कोणत्या ना कोणत्या कामा निमित्य नगर परिषद कार्यालयात यावे लागते संबंधित विभागाचे जे कर्मचारी कक्ष वरच्या मजल्या वर करण्यात आले आहे त्यांचे कक्षात जाण्या साठी चढणे व उतरणे करिता जेष्ठ नागरिक,अपंग नागरिक व पायाचे दुखणे असलेल्या नागरिकांना अतोनात त्रास सहन करावा लागत आहे हि बाब स्थानिक स्वराज संस्था म्हणुन निच्छितच योग्य वाटत नाही म्हणुन नगर परिषद,तेल्हारा कार्यालयाचे सर्व कर्मचाऱ्याचे कक्ष हे तळ मजल्यावर पूर्वी प्रमाणे करण्यात यावे या बाबत शहरातील प्रतीष्ठित नागरिक तथा माझी नगर सेवक हुकूमचंद शर्मा यांच्यासह बहुसंख्य ज्येष्ठ नागरिकांची मागणी असून त्यांची हि मागणी रास्त असुन या बाबत आपण नागरिकांच्या समस्या बाबत निगळीत असलेले कर्मचाऱ्यांचे कक्ष तातळीने तळ मजल्या वर घेण्यात यावे.

### कृषी नगरमध्ये महिलेवर जीवघेणा हल्ला

▪अकोला,दि.१५ (प्रतिनिधी)▪

सिव्हिल लाईन्स पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या कृषी नगर परिसरात घरगुती वादातून एका महिलेवर प्राणघातक हल्ला झाल्याची धक्कादायक घटना घडली. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली.

घटनेची माहिती मिळताच सिव्हिल लाईन्स पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. गंभीर जखमी झालेल्या महिलेला त्वरित उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून तिच्यावर उपचार सुरू आहेत.

## दिव्यांग मतदार डॉ विशाल कोरडे यांनी केले मतदान

### मतदान केंद्रावर ब्रेल उमेदवार यादी नसल्याची खंत

▪अकोला,दि.१५ (प्रतिनिधी)▪

स्थानिक अकोला महानगरपालिकेच्या मतदान प्रक्रियेत अकोल्यातील दिव्यांग बांधवांनी आपला सहभाग नोंदवला .दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला चे संस्थापक अध्यक्ष व श्री शिवाजी महाविद्यालय अकोला चे सहयोगी प्राध्यापक डॉ .विशाल कोरडे यांनी सिद्धार्थ विद्यालय ,लहान उमरी ,अकोला येथे जाऊन आपले मतदान केले . विशेष म्हणजे दिव्यांग मतदारांना मतदान प्रक्रियेत सुलभतेने मतदान करता यावे यासाठी डॉ .विशाल कोरडे यांच्या मार्गदर्शनात दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला तर्फे विविध



उपक्रम गेल्या महिन्याभरापासून राबवल्या गेले आणि दिव्यांगांना मतदान केंद्रापर्यंत पोहोचविण्यासाठी सुद्धा संस्थेद्वारा वाहन व मदतनीस उपलब्ध करून देण्यात आले होते.डॉ .विशाल कोरडे यांनी दिव्यांग मतदार म्हणून मतदान केले यावेळी अंध मतदारांना मिळणारी ब्रेल उमेदवार यादी केंद्रावर उपलब्ध नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली . केंद्रावरील अधिकारी सुद्धा अंध किंवा दिव्यांग मतदारांना त्यांचा प्रपत्र क्रमांक ६ भरून देण्यासाठी उत्सुक नसल्याचे आढळले . डॉ.कोरडे ह्यांनी आपले मतदान मदतनीसाच्या साहाय्याने केले .दिव्यांग मतदारांसाठी सोयी सुविधा मतदान केंद्रावर असल्या पाहिजे यासाठी दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला तर्फे आव्हान करण्यात आले आहे

## प्रभाग १७ मध्ये एमआयएम व काँग्रेस उमेदवारात जुंपली

▪अकोला,दि.१५ (प्रतिनिधी)▪

प्रभाग क्रमांक १७ मध्ये मतदान सुरू असताना भांडपुरा चौकातील महापालिकेच्या दहा नंबर शाळेच्या मतदान केंद्रावर काँग्रेस एमआयएमच्या आणि उमेदवारात चांगलीच जुंपल्याचे दिसून आले. दोघेही उमेदवारांच्या समर्थक मोठ्या संख्येने जमा झाले होते. परिस्थिती नियंत्रण आणण्यासाठी उपस्थित पोलिसांनी वेळेवर हस्तक्षेप केल्याने तणाव निवळण्यास मदत झाली. पोलिसांनी मतदान केंद्रावर जमा झालेल्या कार्यकर्त्यांना पिठाळून लावले घटनेची माहिती मिळतात जिल्हा पोलीस अधीक्षक घटनास्थळी दाखल झाले होते घटनेबाबत माहिती देताना त्यांनी सांगितले की या दोन उमेदवारांमध्ये थोडी शाब्दिक बाचाबाची झाली परंतु पोलिसांनी वेळेत हस्तक्षेप केल्याने परिस्थिती नियंत्रणात आली



सध्या मतदान शांततेत सुरू असून सर्वांनी मतदान करीत आपला मतदानाचा हक्क बजावत मतदानाचा टक्का वाढवावा असे आवाहनही त्यांनी केले.

## शेतातील विद्युत मीटरची चोरी

**तेल्हारा :** पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या दहिगाव अवताडे शेत शिवारात सोमवार १२ जानेवारीच्या मध्यरात्री अज्ञात चोरट्याने विद्युत मीटर पेटीतील साहित्य चोरून नेल्याची घटना घडली आहे. फिर्यादी उमेश वसंत धरमकर रा. दहिगाव अवताडे ता. तेल्हारा जि. अकोला यांच्या मालकीच्या दहिगाव शिवारातील शेतातील विद्युत मीटर मधील ॲटोस्विच, तीन फ्यूज, पेचकस असे २ हजार रुपये नेले.

# अकोल्यात २६ तास सूर्यनमस्कार साखळीचे आयोजन

■अकोला,दि.१५ (प्रतिनिधी)■

प्रत्येक वर्षी प्रमाणे रथसप्तमी सूर्यनमस्कार दिनी २६ तासाची सूर्यनमस्कार रिले/ साखळी चे आयोजन दिनांक २७ व २८ जानेवारी २६रोजी योग, व्यायाम प्रचार व प्रसार शारीरिक मानसिक दृष्ट्या सक्षम होण्याच्या उद्देशाने अजिंक्य फिटनेस पार्क येथे आयोजन करण्यात आलेले आहे.

अजिंक्य फिटनेस पार्क निरामय एज्युकेशन अँड मेडिकल रिसर्च फाउंडेशन, शुभमकरोति फाउंडेशन, व जिजाऊ क्रीडा फाउंडेशन, जिल्हा अधिकारी कार्यालय यांच्यामार्फत आयोजन केले आहे.

सध्या परिस्थिती वैयक्तिक स्तरातून वैयक्तिक स्तरातून १७३ नागरिकांची नोंदणी व ३३ शाळेचे / संस्था प्रत्येकी १२१२ विद्यार्थी यांची नोंदणी झाली आहे. रजिस्ट्रेशन झालेल्या संस्थांची नावे विवेकानंद इंग्लिश स्कूल अकोला पतंजली योग समिती अकोला, शारदा किड्स स्कूल शिवबा इंग्लिश स्कूल, मेहेरबानु कॉलेज अकोला, बाल शिवाजी शाळा अकोला बाबासाहेब उटंगळे, पुंडलिक बाबा हायस्कूल चांदुर शासकीय मूकबधिर (मुलांची शाळा, नवचैतन्य योग वर्ग, शासकीय बालगृह, साने गुरुजी विद्यालय, जीनियस अबॅकस, थोटे फॅमिली, महाराष्ट्र

योग शिक्षक संघ, स्कूल ऑफ स्कॉलर्स कौलखेड, आयटीआय ( मुलींची) कॉलेज, खंडेलवाल ज्ञान मंदिर स्कूल, जिजाऊ कन्या विद्यालय, प्रभात किड्स स्कूल, पारस ग्रुप, अष्टांग योग प्राणायाम क्लासेस, अजिंक्य योग वर्ग, ज्ञानदीप कॉन्व्हेंट, कर्णबधिर मुलींची शाळा मलकापूर, महिला पतंजली योग समिती, जिल्हा परिषद तानखेड, चौधरी विद्यालय, जिल्हा परिषद शाळा गोपालखेड, शिवाजी कॉलेज एकविरा मल्टीपर्पज फाउंडेशन, सेल्फी एरोबिक्स योगा सेंटर खडकी, साई योगवर्ग अशी आहेत.

तसेच यावर्षी ला ५१ जोडप्यांच्या सहभाग हे एक विशेष आकर्षण राहणार आहे. त्यामध्ये सध्या सर्व श्री व सौ गजानन चोपडे व वंदना चोपडे, संजय पांडे व शुभदा पांडे, राकेश बाजोरिया व सारिका बाजोरिया, धनंजय भगत व माधुरी भगत, गोपाल खापरकर व योगिता खापरकर, आनंद फाटे व भाग्यश्री फाटे डॉ. सचिन पारस्कर व राधा पारस्कर, कल्पेश ढोरे व धनश्री ढोरे, राम जांभे व सविता जांभे, दिलीप चोपडे व सोनल चोपडे, अमोल शेरेकर व रंजना शेरेकर, अजय लगड व वैशाली लगड, अरुण खन्नाडे व भारती खन्नाडे यांचे रजिस्ट्रेशन झाले आहे. दिव्यांग जेष्ठ नागरिक, योगप्रेमी, विद्यार्थी, विद्यार्थिनी खेळाडू देखील यामध्ये सहभागी होणार आहेत.

# अकोला जि.प.आरक्षणाची ५० टक्के मर्यादा ओलांडल्यानेच स्थगिती

■अकोला,दि.१५ (प्रतिनिधी)■

जिल्हा परिषदेच्या राजकीय आरक्षणाची ५० टक्केची मर्यादा ओलांडल्याने निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होऊ शकला नाही. मंगळवारी राज्यातील १२ जि.प.ची निवडणूक जाहीर झाली असून, या जि.प.तील राजकीय आरक्षण ५० टक्के पेक्षा कमी आहेत. त्यामुळे इच्छुकांचा राजकीय जीव टांगणीलालागला असून, दुसऱ्या टप्यात निवडणुका जाहीर होणार काय, याकडे सर्वांचे लक्ष लागलेआहे. जि.प.चा कार्यकाळ १५ जानेवारी २०२५ रोजी संपुष्टात आला होता, मात्र ओबीसी आरक्षणावरून निवडणूक न झाल्यास प्रशासकीय राजवट लागू झाली. अखेर ६ मे रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला. मात्र आरक्षणाची जि.प. टक्केवारी ५८ टक्के झाली. तसेच अकोला, अकोट व मूर्तिजापूर पंचायत समितीच्या आरक्षणाची टक्केवारी ५० टक्के पेक्षा जास्त आहे. न्यायालयाने ही टक्केवारी ५० पेक्षा कमी हवी, असे यापूर्वीचसांगितले. जिल्हा परिषदेसह तीन पंचायत समितीमधील राजकीयआरक्षणाने ५० टक्क्याची मर्यादीओलांडली आहे. जि.प. तील आरक्षण तर ५८ टक्के झाले आहे. सध्या जि.प.च्या ५२ सर्कल (गट- मतदारसंघ) पैकी १२ अनुसूचित जाती, ५ अनुसूचित जमाती, १४ ओबीसींसाठी राखीव आहेत. उर्वरित जागा या सर्वसाधारणसाठी आहेत. पंचायत समिती अकोला पं. स. मध्ये एकूण २० जागांपैकी एससी- ५, एसटी- २ व ओबीसींसाठी ५ जागा राखीव आहेत. तेल्हाऱ्यात १४ पैकी ३ एससी, एसटी-१,ओबीसीसाठी ३ जागा



आरक्षित आहेत. अकोटमधील १६ जागांपैकी एससी-३, एसटी-२ व ओबीसीसाठी ३ जागा राखीव आहेत. मूर्तिजापूरमध्ये १४ जागा असून, यापैकी एससी- ५, एसटी १ आणि तीन जागा ओबीसीसाठी आरक्षित आहेत. वाशीटांकाळी पं.स.च्या एकूण १४ जागांपैकी एससी- ३. एसटी-१ व ओबीसीकरिता ३ जागा राखीव आहेत. आरक्षण ५० टक्के पेक्षा जास्त झाले असले तरी निवडणुका थांबणारनाहीत,

तसेच याबाबतच्या याचिकेवर २१ जानेवारी रोजी सुनावणी होणार आहे. त्यानंतर निवडणूक आयोग ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडलेल्या जि.प. निवडणुकीवर निर्णय घेणार आहे. गत वर्षी तांत्रिक कारणामुळे बाळापूर न.प. ची निवडणूक पुढे ढकलली होती. नंतर बाळापूरची निवडणूक पार पडून सर्वच ठिकाणची मतमोजणी एकाच वेळी झाली होती. त्यामुळे कदाचित दुसऱ्या टप्यात जि.प.ची निवडणूक होऊन मतोमजणी एकाच वेळीही होऊ शकते.

# अनोळखी रेल्वे अपघातातील जखमीची ओळख पटविणे बाबत

■अकोला,दि.१५ (प्रतिनिधी)■

वरील विषयान्वये सादर आहे की, दिनांक १५/०१/२०२६ रोजी १६/०० वाजताचे सुमारास सर्वोपचार रुणालय, अकोला येथील पोलीस चौकीवरून तोंडी माहीती प्राप्त झाली की, एक अनोळखी इसम वय अंदाजे ६५ वर्ष हे रेल्वे अपघातामुळे जखमी अवस्थेत मिळुन आल्याने त्यांना प्रतिश खंडारे रा. डाबकी रोड, अकोला यांनी उपचारा करीता सर्वोपचार रुणालय, अकोला येथे उपचारा करीता भरती केले आहे. अशा मिळालेल्या माहीतीच्या आधारे आम्ही सर्वोपचार रुणालय, अकोला येथे



जावुन विचारपुस केली असता सदर इसम बोलण्याचे स्थितीत नसल्याने त्यांचे नांव काय ? व कोठुन आले याबाबत माहीती मिळु शकली नाही. सदर जखमी व्यक्ती उपचारा करीता सर्वोपचार रुणालय, अकोला येथील वार्ड क्र. १८ येथे भरती असुन उपचार सुरू आहे. तरी वरील अनोळखी व्यक्तीचे वर्णन खालील प्रमाणे.वय अंदाज ६५ वर्ष असुन वर्ण सावळा, उंची १५५ से.मी असुन अंगात सेंदरी (ऑरेंज) रंगाचे फफुल बाहयाचे शर्ट असुन राखाळी रंगाचा जिन्सपॅन्ट डोक्याचे केस नेहमीपेक्षा खुप मोठे असुन लांब दाढी असलेल्या वर्णनाच्या इसमाची ओळख पटण्या करीता आपले वृत्तपत्रात माहीती प्रसारीत होणेस विनंती आहे.

# संविधानामुळे स्त्रीयांची सर्वच क्षेत्रामध्ये यशस्वी वाटचाल

■अकोला,दि.१५ (प्रतिनिधी)■

दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटीद्वारे संचालित श्री रा. ल. तो विज्ञान महाविद्यालयाच्या इंटरनल कम्प्लेंट कमिटी, वुमन्स सेल व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने सावित्रीबाई फुले यांच्या जन्मशताब्दी निमित्त एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची स्त्रीमुक्ती चळवळ या विषयावर सीताबाई आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमधील विभागप्रमुख डॉ. प्रसन्नजीत गवई यांनी व्याख्यान दिले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळे स्त्रीया सर्वच क्षेत्रात आत्मविश्वासने पुढे येत असल्याचे डॉ. गवई म्हणाले. कार्यशाळा संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास केंद्राच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात पार पडली. डॉ. प्रसन्नजीत गवई यांनी प्रभावी व्याख्यान दिले. त्यांनी आपल्या व्याख्यानात स्त्रिया सर्वच क्षेत्रात आत्म विश्वासने पुढे येतांना दिसत असून, यामागे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान आहे असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दि बीजीई सोसायटी, अकोलाचे अध्यक्ष ॲड. मोतीसिंहजी मोहता यांची उपस्थिती लाभली. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात स्त्रियांनी शिक्षणासाठी मोबाईलचा वापर टाळावा, मोबाईलद्वारे प्राप्त होणारी माहिती सत्यच असेलच असे सांगता येत नाही. त्यामुळे ग्रंथालयात जावून पुस्तके वाचावीत असे आवाहन केले. चंद्रकांत अहिरकर, श्रीमती ज्योती गिते यांनी महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. आर. डी. चंद्रवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली परिश्रम घेतले.

# तिवसा ग्रामपंचायतची मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत पाहणी

■बार्शिटाकळी,दि.१५ (प्रतिनिधी)■

तालुक्यातील तिवसा बु!! ग्रामपंचायत मुख्यमंत्री समृद्ध ग्रामपंचायत राज अभियान. अंतर्गत दि१५/१/२०२६ रोजी गावाची पाहणी करण्यात आली यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मुख्य कार्यकारी अधिकारी अकोला अनिता मेश्राम मॅडम हे होत्या, त्यांनी ग्राम तिवसा ग्रामपंचायत आयुष्यमान आरोग्य मंदिर' शाळा येथे भेट दिली

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान कार्यक्रमांमध्ये ग्राम तिवसा येथील ग्रामपंचायत सरपंच श्रीमती मंदाताई भारत बहादरे व ग्रामपंचायत सर्व सदस्य व सर्व ग्रामस्थ आयुष्यमान आरोग्य मंदिर विभागातील कर्मचारी शाळेतील शिक्षक वृंद यांनी सहभाग घेतला गावाचा विकास पाहणी करण्याकरिता माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम मॅडम यांनी भेट दिली

गतवर्षी २०२५ ला ग्राम तिवसा यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानामध्ये सहभाग घेऊन ग्रामपंचायतला तिसरा क्रमांक मिळाला होता व गावकऱ्याचा आनंद द्विगुणीत




झाला व आता थांबायचं नाही ही संकल्पना मनात घेऊन सरपंच श्रीमती मंदाताई भारत बहादरे यांनी पुन्हा नव्याने सुरुवात करून एकच ध्यास गावचा विकास हेच ध्येय ठेवले व गावाची एका वर्षात जणू कायापालट केली फळाफुलांनी भरलेली स्मशानभूमी गावाचे रस्ते गावाला रस्ता रुंदीकरण रस्त्याच्या कडेला झाडे शाळांमध्ये पाण्याची व्यवस्था मार्गदर्शनपर रंगरंगोटी व मुलांना परसबाग संपूर्ण गावांमध्ये सांडपाण्याची योग्य विल्हेवाट करिता शोषखड्डे पाणी अडवा पाणी जिरवा मार्गदर्शनपर रंगरंगोटी गुरांना पिण्यासाठी पाण्याची व्यवस्था अशी अनेक कामे श्रीमती मंदाताई यांनी केली.

## कुणबी समाज विकास मंडळ,अकोलाचा ऋणानूबंध परिचय पुस्तिका प्रकाशन सोहळ्याला उपस्थिती दर्शवा

■अकोला,दि.१५ (प्रतिनिधी)■

कुणबी समाज विकास मंडळ अकोला या मंडळाचा नेहमीच समाज ऊपयोगी कार्यक्रम तसेच सामाजिक बांधीलकी जोपासत ईतरही समाजीक कार्यक्रमात अग्रेसर असनारी संघटना म्हनून कुनबी विकास मंडळ अकोला जिल्ह्यात कार्यरत आहे यावर्षी सूद्धा समाजातील यूवक युवतीचे लग्ण जुळावे त्यासाठी कूनबी विकास मंडळ अकोला जिल्हाचे वतीने समाजातील ऊपवर वधुवराचा बायोडाटा जमा करुन युवक,यूवती परीचय पुस्तीकेचे ऋनानूबंध पुस्तीकेच्या माध्यमातुन समाजासाठी छापुन तयार केले आहे या यूवक यूवती 'ऋणानुबंध '-२०२६चा प्रकाशन सोहळा तसेच समाजातील नवनिर्वाचित लोकप्रतिनिधी चा तसेच गुणवंताचा सत्कार समारंभ रविवार दि. १८जानेवारी २०२६रोजी सकाळी ११वाजता स्व. किसनराव सोनोने मंगल कार्यालय, गोरक्षण रोड अकोला येथे समाजातील जेष्ठ मान्यवरांचे उपस्तितीत संपन्न होत आहे.तरी या कार्यक्रमाला समाज बांधवानी मोठया संख्येने उपस्तित राहावे असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष डॉ बाबुराव शेळके, कार्याध्यक्ष संजय बागलकर, सचिव श्रीकांत ढगेकर, कोषध्यक्ष किशोर ठाकरे यांनी केले आहे.

## पत्रकार कवी संदीप देशमुख राजामाता जिजाऊ प्रेरणा पुरस्काराने सन्मानित



■अकोला,दि.१५(प्रतिनिधी)■

तरुणाई फाऊंडेशन कुटासा चे संस्थापक अध्यक्ष तथा लोक स्वतंत्र पत्रकार महासंघाचे राष्ट्रीय सदस्य संदीप देशमुख यांना त्यांच्या विविध सामाजिक कार्याबद्दल राजमाता जिजाऊ प्रेरणा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

वासुदेव महाराज ज्ञान सागर अकोटचे अध्यक्ष ह भ प वासुदेव महल्ले महाराज यांचे हस्ते त्यांना हा पुरस्कार बहाल करण्यात आला. राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद व कृषिरत्न डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त स्थानिक मैत्री हॉटेलचे सभागृहात आज हा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. या समारोहात शेतकरी नेते प्रकाश पोहरे यांना राष्ट्रीय डॉ. पंजाबराव देशमुख कृषीरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी समाज हितासाठी निस्वार्थपणे कार्य करणाऱ्या धनंजय मिश्रा, दिवाकर गावंडे, अक्षय राऊत, प्रा. डॉ. ममता इंगोले, दत्तात्रेय निघाने वैशाली राऊत, डॉ. अर्चना देशमुख, ललिता पात्रीकर भारती पात्रीकर, शंकरराव बोर्डे, प्रदीप गावंडे,सिद्धार्थ तायडे सुरेश पात्रीकर, डॉ. चंद्रशेखर गोंधळ, बळवंतराव कडू, बाळाभाऊ पात्रीकर यांच्यासह विविध समाजसेवकांना राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जनसेवा पुरस्कार बहाल करण्यात येऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

## मनपा उर्दूशाळेच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल

■अकोला,दि.१५ (प्रतिनिधी)■

महानगरपालिकेच्या उर्दू आदर्श शाळा क्रमांक ८ च्या विद्यार्थ्यांनी अलिकडेच 'वेदनदिनी' या कृषी शैक्षणिक क्षेत्राला भेट दिली. या शैक्षणिक सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी वेदनंदिनी येथील विविध उपक्रमांचा मनमुराद अकोला आनंद घेतला. दरम्यान विद्यार्थी व शिक्षकांनी शेती आणि शेतकी व्यवस्था समजून घेतली. यावेळी वेदनंदिनीचे संचालक प्रकाश पोहरे यांची विद्यार्थ्यांनी आवर्जून भेट घेतली.

भेटी दरम्यान शाळेच्या विद्यार्थ्यांनी पोहरे यांची मुलाखत घेतली. यावेळी प्रकाश पोहरे यांनी विद्यार्थ्यांना खेळीमेळीच्या वातावरणात शिक्षण, वाचनसंस्कृती आणि आधुनिक शिक्षणपद्धती यावर मौलिक मार्गदर्शन केले.

# आकोट सहकारी जिनिंग फॅक्टरीच्या भागधारक सभासदांना भेट वस्तूंचे वितरण

■अकोट,दि.१५ (प्रतिनिधी)■

अकोट तालुका सहकारी जिनिंग अँड प्रेसिंग फॅक्टरी अकोट या संस्थेद्वाला संस्थेच्या भारकांना बत्तीसशे रुपये पर्यंतच्या किमतीच्या भेट वस्तू वितरण करण्यात आले आहे.सहकारी संस्था विशेषतः सहकारी जिनिंग संस्था तोट्यात व अवसायनात असतांना अकोट को ऑफ जिनपिंग फॅक्टरी ने संस्थेच्या नफ्यातून आपल्या भागधारक सभासदांना ३२००रु किंमतीचा पेडीस्टल फॅन व मिलटॉन वॉटर बॅग भेट देवून आपला लौकिक वाढवला आहे.गत संस्थेच्या आमसभेत संस्थेचे अध्यक्ष सुभाषराव वानखेडे व उपाध्यक्ष रामदास थारकर यांनी भागधारक सभासदांना भेट वस्तू देण्याचा संचालक मंडळाचा निर्णय जाहीर केला होता.त्यासाठी ६लाख रुपये तरतूद करण्यात आली होती मकर संक्रांतचे शुभ पर्वावर ज्येष्ठ सहकार नेते नानासाहेब हिंगणकर यांचे हस्ते भेट वस्तू वितरण करण्यात आले. कृषी उत्पन्न बाजार समिती चे सभापती प्रशांत पाचडे, संचालक निरज



हिंगणकर,संस्थाध्यक्ष सुभाषराव वानखडे संचालक राजेश पुंडकर, अभिजित अग्रवाल, संचालिका सौ रमाताई गावंडे,गजाननराव डांगे, गजाननराव गावंडे,उद्धराव टापरे, विलासराव चोरे, दिपक पाटील, व्यवस्थापक राजेश सांगोले उपस्थित होते.यावेळी संस्थेचा पारदर्शक कारभार व सभासद हीत जोपासणारा निर्णय घेतल्याबद्दल नानासाहेब हिंगणकर यांनी संस्थेचे अध्यक्ष सुभाषराव वानखडे, उपाध्यक्ष रामदास थारकर व संचालक मंडळाचे मुक्तकंठाने प्रशंसा केली.

## भाजपाच्या गटनेतेपदी अतुल विखे

**तेल्हारा :** अध्यक्षांसह २१ सदस्यांची संख्या असलेल्या तेल्हारा नगरपालिकेत सत्ताधारी भाजपाच्या गटनेतेपदी प्रशांत उर्फ अतुल विखे तर वंचित बहुजन आघाडी, शेतकरी पॅनल व तेल्हारा विकास मंच या विरोधी गटाच्या गटनेतेपदी कान्होपात्रा रामभाऊ फाटकर यांची आपापल्या गटातील पालिका सदस्यांनी निवड केली

## निधन वार्ता

### जगमोहनसिंह महेंद्रसिंह गहिलोत



**पातुर :** स्वर्गीय जगमोहनसिंह महेंद्रसिंह गहिलोत हे वयाच्या ५५ व्या वर्षी तुळसाबाई कावल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पातुर येथे कार्यरत असताना हृदयविकाराच्या झटक्याने १५ जानेवारी रोजी चार वाजता त्यांची प्राणज्योत मावळली. त्यांच्या पश्चात त्यांना एक मुलगा शुभजित सिंह जगमोहन सिंह गहिलोत हा बंगलोर येथे एमबीए शिकत आहे. आणि एक मुलगी सलोनी जगमोहन सिंह गहिलोत ही वर्ग पाचवी मध्ये शिकत आहे. अतिशय मनमिळाऊ आणि हसमुख असा चेहरा हा आपल्या मधून निघून गेलेला आहे ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

# श्री प्रल्हाद महाराज उपासना मंडळ अकोल्याच्या वतीने श्रीमदब भागवत ज्ञान यज्ञाचे आयोजन

■अकोला,दि.१५ (प्रतिनिधी)■

श्री प्रल्हाद महाराज उपासना मंडळ अकोल्याच्या वतीने सर्व भक्तांच्या कल्याणार्थ श्रीमदब भागवत ज्ञान यज्ञ (दशम स्कंध) स.भ. रामदासपंत वामनशास्त्री आचार्य यांच्या ओजस्वी वाणीतून, प. पू. श्री प्रल्हाद महाराज (रामदासी) सा. खेर्डा यांच्या जीवन चरित्रावर आधारित अनुभूती कथाकथन श्री महाराजांच्या सगुण सेवा घडलेले स.भ.च्या अनुभवातून तथा नाम जप शिबिर प. पू. समर्थ सद्गुरु श्री प्रल्हाद महाराज रामदासी यांच्या पवित्र चरण पादुकांच्या सानिध्यात माघ शुद्ध प्रतिपदा दि. १९ जाने. ते माघ शुद्ध सप्तमी दि. २५ जाने. २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. या अनुषंगाने काकड आरती, प्रवचन, उपासना इत्यादी कार्यक्रम होणार आहे. तर संहिता वाचन स.भ. कल्याणशास्त्री रामदासपंत हे करणार आहेत.सोमवार दि. १९ ते बुधवार २१ जानेवारी २०२६ पर्यंत दुपारी १ ते ५



श्रीमदब भागवत ज्ञानयज्ञ, भागवताचार्य स.भ. रामदासपंत वामनशास्त्री आचार्य, श्री महाराजांचे शिष्य व कार्यवाह श्रीराम मंदीर, आनंदवाडी, जालना, सायं. ६ ते ७ उपासना, सायं. ७ ते ८ भजन. गुरुवार दि. २२ जानेवारी २०२६ दुपारी १.०० ते ५.०० श्रीमदब भागवत ज्ञानयज्ञ, सायं. ५.०० ते ६.०० प.पू.समर्थ सद्गुरु श्री प्रल्हाद महाराज (रामदासी) सा. खेर्डा यांच्या पवित्र चरण पादुकांचे आगमन, सायं. ६ ते ७ सायं. उपासना, सायं. ७.०० ते ८.०० अनुभूती कथाकथन - स.भ. श्री रामदासपंत आचार्य, जालना, रात्री ९ ते १० पंचपदी, शेजारती. शुक्रवार दि. २३ जाने. २०२६ सकाळी ६.०० ते ७.०० काकड आरती, सकाळी ७.०० ते ८.०० 'श्री' स महाअभिषेक, सकाळी ९.०० ते १२.०० श्रीमदब भागवत ज्ञानयज्ञ, दुपारी १२.३० नैवेद्य आरती, दुपारी ३ ते ५.३० अनुभूती कथाकथन - स.भ. देविदास अमृतराव मोहरील, पूणे श्री महाराजांचे शिष्य तथा लेखक, सायं. ६ ते ७ सायं. उपासना, सायं. ७ ते ८ अनुभूती सारांश, रात्री ९ ते १० पंचपदी, शेजारती.

शनिवार दि. २४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ६.०० ते ७.०० काकड आरती, सकाळी ७.०० ते ८.०० 'श्री' अभिषेक, सकाळी ९.०० ते १०.०० प्रवचन वसू भारद्वाज, अहिल्यानगर श्री महाराजांचे शिष्य व दासबोध अभ्यासक, १० ते १२ अनुभूती कथाकथान, स.भ. कैलासजी गिंदोडिया, धूळे, श्री महाराजांचे शिष्य तथा सेवक,दुपारी १२.३० नैवेद्य आरती, दुपारी ३ ते ५.३० अनुभूती कथाकथन स.भ. विनायकराव काशिनाथराव धानोरकर, संभाजीनगर, श्री महाराजांचे शिष्य तथा लेखक,सायं. ६ ते ७ सायं. उपासना, सायं. ७ ते ८ अनुभूती सारांश, रात्री ९ ते १० पंचपदी, शेजारती.रविवार दि. २५ जाने. २०२६ सकाळी ७.०० ते ८.३० 'श्री' स अभिषेक, सकाळी ९.०० ते १०.०० प्रवचन वसू भारद्वाज, अहिल्यानगर, सकाळी १० ते ११.३० प्रवचन स.भ. वे. शा. स. डॉ. श्रीकांतशास्त्री गदाधर, दुपारी ११.३० ते १२.३० समारोप, दुपारी १२.३० वा. नैवेद्य आरती व महाप्रसाद, दु. ३ वा. श्री महाराजांचे साखरखेर्डा प्रस्थान व सांगता.

# न्यू ईरा हायस्कूल येथे दुमिळ नाणी व टपाल तिकिटांचे प्रदर्शन

■अकोला,दि.१५ (प्रतिनिधी)■

न्यू ईरा हायस्कूल, अकोला येथे दि. १७ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९ ते १२ या वेळेत दुमिळ नाणी चलनी नोटा व टपाल तिकीटांचे भव्य प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. हे प्रदर्शन शाळेचे माजी विद्यार्थी व निवृत्त न्यायालयीन कर्मचारी श्री. मकरंद उंटवाले यांच्या वैयक्तिक संग्रहावर आधारित आहे. प्रदर्शनाचे उद्घाटन प्रा. विश्वनाथ गद्रे (अध्यक्ष, प्रागतिक शिक्षण प्रसारक मंडळ, अकोला) यांच्या हस्ते व मुख्याध्यापक श्री. महेश ठोके यांच्या उपस्थितीत होणार आहे. या प्रदर्शनात प्राचीन, मध्ययुगीन, ब्रिटिश इंडिया तसेच स्वतंत्र भारतातील दुमिळ नाणी, नोटा, टपाल तिकीटे, फस्ट है कव्हर्स, जुनी पोस्टकार्ड्स व ऐतिहासिक पत्रव्यवहार पाहायला मिळणार आहे. डिजिटल युगात वाढणाऱ्या विद्यार्थ्यांना इतिहास, चलन व्यवस्था व टपाल खात्याच्या वारशाची ओळख करून देण्यासाठी हे प्रदर्शन उपयुक्त ठरणार आहे. नाणी व तिकीटे ही केवळ वस्तू नसून त्या काळातील राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक इतिहासाची मौन साक्ष देणारी साधने आहेत. इतिहास संग्रह व दुमिळ वस्तूंमध्ये रस असलेल्या सर्व नागरिकांनी या प्रदर्शनाला अवश्य भेट द्यावी. प्रवेश सर्वांसाठी निशुल्क राहणार आहे. असे आयोजकांनी कळिवले आहे.

RNI NO-46973/1986 Mahasagar Akola Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. Group Editor-in-Chief and Managing Director - Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak. Local Editor Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८ महासागर अकोला मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक स्थानिक संपादक : *पुरुषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)

# शेतकऱ्यांनो उचला 'जोडे' मारा 'त्या' व्यवस्थेला!

तुमच्या शेतकरी बापाला एखादा सरकारी अधिकारी तुमच्याच शेतात येऊन जोड्याने मारहाण करीत असेल, तर त्याची खेटराने पूजा करावी की नाही? जगाच्या पोशिंद्यालाच त्याच्याच गावात, त्याच्याच शेतात मार खायची वेळ येत असेल, तर सरकारने सत्तेत राहून उपयोग काय? शेतकऱ्यांच्या जीवावर पोट असणारेच जर शेतकऱ्यांच्या जीवावर उठत असतील तर शेतकऱ्यांनी पण रुमण्याचा उपयोग करायला नको का? मंगरूळपीरचा तालुका कृषी अधिकारी सचिन कांबळे याला सरकार शिक्षा देणार की 'पद्मश्री' देणार हे आता पहावे लागेल. वाशिमच्या मंगरूळपीर तालुक्यातील गोगरी शेत शिवारात घडलेली घटना पाहून शेतकऱ्यांच्या पोरांची डोळे उघडतील की नाही? शेतकरी ऋषिकेश पवार यांना मारहाण झाली ही संपूर्ण देशाने पाहिली. पण त्याच्या बायको मुलांनी ही मारहाण पाहिली असेल, तर त्यांच्या काळजाला नक्कीच चरे पडले असतील. वाशिमचे पालकत्व असलेल्या कृषिमंत्र्याच्या जिल्ह्यात शेतकऱ्यांना मारहाण होत असेल, तर ही गंभीर बाब नाही का? या प्रकारामुळे परिसरातच नव्हे तर संपूर्ण राज्यात खळबळ उडाली आहे. बरं या शेतकऱ्याचं चुकलं तरी काय? मनरेगा अंतर्गत चार महिन्यांपासून फळबागेची रखडलेली मजुरी मागितल्याचा राग 'त्या' तालुका कृषी अधिकाऱ्याला आला. त्या घटनेत शेतकऱ्याला शिवीगाळ करण्यात आली. त्याचा मोबाईल हिसकावून घेतला. या प्रकरणामुळे शेतकरी वर्गात तीव्र संताप व्यक्त होतच आहे. तालुका कृषी अधिकारी सचिन कांबळे म्हणतो की, गोगरी गावात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत फळबाग लागवड योजनेची तपासणी व मार्गदर्शन करत असताना शेतात दोन युवक सतत शूटिंग करत होते. शूटिंग बंद करण्यास सांगितल्यानंतर त्यांनी माज्यासोबत असलेल्या महिला कर्मचारी यांच्याशी गलिच्छ व अपमानास्पद भाषेत बोलणे सुरू ठेवले. मी त्यांना विरोध केला, मात्र ते ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हते. जाताना त्यांनी माझ्याशीही असंविधानिक व सामाजिकदृष्ट्या अयोग्य भाषेत बोलल्यामुळे माझा संयम सुटला आणि पुढील घटना घडली. पण वस्तुस्थिती मात्र वेगळीच दिसते. व्हिडिओ का काढतोस? असा जाब विचारत कृषी अधिकाऱ्याचा संयम त्याचवेळी सुटला होता. त्याने शेतकऱ्याला थेट बुटाने व मातीच्या ढेकळाने मारहाण केली. मारहाणीबरोबरच शिवीगाळही सुरू केली. पण पुढे काय? याचे उत्तर मिळत नाही. तालुका कृषी अधिकाऱ्याविरोधात प्रशासन यावर काय भूमिका घेते, याकडे आता शेतक?यांसह संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. जर संबंधित अधिकाऱ्यावर कोणतीच कारवाई झाली नाही, तर इथून पुढे शेतकऱ्यांना नेहमी देवाचा प्रसाद खाण्याऐवजी जोड्याचा प्रसादच खावा लागेल, असे गृहीत धरायला हरकत नाही.

नेत्यामागे फिरणारे कार्यकर्ते शेतकरी वर्गातील आहे. नेत्यांसाठी, पक्षासाठी वाटेल ते करत आहे, पण त्यांची कधी त्यांच्या नेत्यांना हे विचारायची हिंमत नाही झाली की, साहेब इतक्या महागाईच्या काळात हे शेतमालाचे भाव इतके कमी कसे काय? शेतमालाला कमी भावात विकू पण नेत्यांची हुजूरेगिरी काही सोडणार नाही. स्वतःच्या शेतकरी बापाला बुटाने मारले जात आहे. त्याकडे लक्ष द्यायला वेळ नाही. पण नेता नाराज नाही झाला पाहिजे. आता शेतकरी वर्ग स्वतःच्या हक्कासाठी जर लढला नाही, तर ही परिस्थिती अजून बिकट होत जाणार. कारण या नेत्यांना शेतकऱ्यांचं काहीही घेणंदेणं नाही. यांनी इतकं कमवून ठेवलं की त्यांच्या सात पिढ्या बसून खातील. आता एवढंच म्हणावं लागेल की, 'शेतकऱ्यांच्या पोरांनो नेत्यांच्या मागे फिरण्याऐवजी आता तरी सुधरा रे'!

विदर्भातील ही घटना साधीसुधी नाही. तिचे दुरगामी परिणाम या राज्यात झाल्याशिवाय राहणार नाही. कितीही कष्ट करा, वाट्याला अपमान येत असेल शेतकऱ्यांनी करावं तरी काय? एक तर संपूर्ण देशात शेतीतील अपयशामुळे शेतकरी मोठ्या प्रमाणावर आत्महत्या करतात. शेतकरी आत्महत्या का करतो? याबाबत देशभर संशोधन व्हावे, असा विचार प्रवाह पुढे येतो आहे.

विदर्भातील ही घटना ही त्याचीच एक चुणूक आहे. निसर्गाची त्याला न मिळणारी साथ व बाजारपेठेत कोसळलेले भाव या दोन घटकांनी शेतकऱ्यांना हैराण करून सोडले आहे. विशेष म्हणजे ज्या देशाची अर्थव्यवस्था शेतीवर अवलंबून आहे, त्या देशातील राज्यकर्तेच शेतकऱ्याला कायम वाऱ्यावर सोडून देतात.

आता शासकीय अधिकारी शेतकऱ्यांना जर त्याच्याच शेतात जाऊन बुटाने मारहाण करीत असेल, तर शेतकऱ्यांनी करावे तरी काय? एका बाजूला शेतमालाचे कोसळलेले भाव, नैसर्गिक हानी यामुळे कुठलाच पर्याय शिल्लक न राहिल्यामुळे तो आत्महत्येकडे वळतो. तो विचार चुकीचा आहे हे सर्वांनाच कळते. परंतु चोहोबाजूने घेरले गेल्यावर शेतकरी तरी काय करणार?

राज्याच्या एकूण अर्थव्यवस्थेतील साठ टक्के वाटा ज्या क्षेत्रातून येतो, त्या कृषीची अवस्था यंदाही भीषण आहे. ऐन दिवाळीच्या पर्वात सारा शहरी वर्ग आनंदाने न्हाऊन निघत असताना ग्रामीण भागात पसरलेला सन्नाटा अंगावर काटा उभा करणारा ठरला. फटाक्यांच्या आतीषबाजीने कान फाटायची वेळ आली होती, पण ग्रामीण भागातील व्यवस्था मात्र कोसळल्यातच जमा झाली.

कोरोनाच्या दाहक काळात ज्या शेतीने तारले, ज्या प्रदेशाच्या अर्थव्यवस्थेला धुगधुगी दिली, ती शेतीच यंदा पार भूईसपाट झालेली दिसते. कोणत्याही शिवारात जा, कुठे करपलेली तर कुठे झोपलेली पिके व डोक्यावर हात ठेऊन बसलेला शेतकरी हे दृश्य सार्वत्रिक आहे. दुर्दैव हे की, या दुरवस्थेच्या योग्य चित्रणापासून माध्यमे अद्याप दूर आहेत.

देशाच्या अर्थव्यवस्थेत मोठा वाटा असलेले कृषी क्षेत्र अजूनही 'माध्यमस्नेही' झालेले नाही. पण माध्यमांनी पाठ फिरवली म्हणून वस्तुस्थिती दडवता येते असे नाही. शेतीच्या या दुरवस्थेचे दाहक परिणाम येणाऱ्या काळात साऱ्यांनाच भोगावे लागणार आहेत हे निश्चित. प्रामुख्याने कोरडवाहू






शेतीवर भर असलेल्या शेतकऱ्यांची सारी भिस्त खरीप हंगामावर. यंदा पावसाने त्यावरच अक्षरशः पाणी ओतले. याचा फटका कापूस, सोयाबीन व तूर या हंगामातील प्रमुख पिकांना बसला.

प्रत्येक शेतकऱ्यांच्या घरातली वर्षभराच्या गुजराणीची बेगमी याच पिकांवर ठरत असते. एकदा का ती हातात आली की, शेतकरी नव्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सज्ज होत असतो. यंदा पावसाळ्याच्या आरंभापासून ऑक्टोबरपर्यंत पाऊस सलग कोसळत राहिला, तेव्हाही पिके हातची जातील याची भीती शेतकरी वर्गाला होतीच.

शेतीतल्या या चित्राकडे मध्यमवर्ग डोळे फिरवत असला तरी व्यापाऱ्यांचे तसे नाही. धंदा हेच मुख्य उद्दिष्ट असलेल्या या वर्गाने बाजारात माल येण्याआधीच भाव पाडायला सुरुवात केली. राज्यात सर्वदूर अतिरिक्त व सरासरीच्या कितीतरी पट जास्त पाऊस पडला. राज्यात ३६ लाख हेक्टरमधील पिकांना पावसाचा फटका बसला, असे कृषी खात्याचा अहवाल सांगतो.

अलीकडच्या काही वर्षांचा विचार केला तर ही हानी अभूतपूर्व म्हणावी अशीच. पिकाचे भाव पडण्याची स्पर्धाही जोरात सुरू झाली. आता प्रश्न आहे तो शेतकरी या संकटातून बाहेर येईल कसा? दुर्दैव हे की याचे उत्तर व्यवस्थेतील कुणाजवळही नाही. सरकार नावाच्या यंत्रणेजवळ तर अजिबात नाही. पर्यावरणाच्या असमतोलामुळे बदललेल्या नैसर्गिक ऋतुचक्राचा फटका प्रामुख्याने पारंपरिक शेती पद्धतीला सहन करावा लागतो.

अलीकडच्या काही वर्षांत हा अनुभव शेतकऱ्यांसकट साऱ्या यंत्रणांनी घेतलेला. तरीही या पद्धतीत बदल करणे हे भविष्याच्या

**थर्ड अम्पायर**
**जयंत महाजन**
**९४२०६११४२०**

दृष्टीने आवश्यक आहे, याची जाणीव जशी शेतकऱ्यांना झालेली नाही, तशी या यंत्रणांना सुद्धा नाही. झाले नुकसान की द्या मदत याच मानसिकतेत अजून राज्यकर्ते अडकून पडलेले दिसतात.

अलीकडच्या काही दशकात शेतकरी इतका खचलेला आहे की, बदल करण्याची हिंमतच त्याच्याजवळ शिल्लक उरलेली नाही. अशावेळी पुढाकार घ्यायचा असतो तो सरकारने. जोवर ही यंत्रणा खंबीरपणे पाठीशी उभी राहणार नाही, तोवर शेतकरी वर्गात विश्वासाचे वातावरण तयार होणे अशक्य.

मात्र, सरकार असा दीर्घकालीन खंबीरपणा दाखवण्याऐवजी आकर्षक घोषणातच अडकून पडल्यामुळे शेतकऱ्यांच्या पदरी फार काही पडत नाही हे सध्याचे वास्तव. अलिकडे तर सरकारचे धोरणच जुनाट व कालबाह्य ठरते आहे. हा सारा प्रकार बळीराजाच्या नैराश्यात आणखी भर घालणारा. यातून बाहेर पडायचे असेल तर कृषी धोरणात आमुलाग्र बदलासोबतच नैसर्गिक संकटावर मात करत आधुनिक शेतीची कास शेतकऱ्यांना धरायला लावणे गरजेचे आहे.

सरकारने शेतकरी डोळ्यासमोर ठेवूनच सर्व धोरणे आखली, तर पुढील चक्र आपोआप सुरळीत फिरेल. उद्योगांसह सर्वत्र सवलतींचा पाऊस पाडला जातो. पण शेतकऱ्यांसाठी काहीही सवलती नाही. बियाण्यांपासून ते वीज व पाण्यासाठी त्याला संघर्ष करावा लागतो. निसगार्शी देखील मुकाबला करावा लागतो. त्यातूनही तावूनसुलाखून बाहेर पडल्यावर बाजारपेठेत त्याचा फडशा पाडला जातो. उर्वरित कारभार सरकारी अधिकारी कसे करतात हे महाराष्ट्राने पाहिले. मग सरकार शेतकऱ्यांसाठी नेमके करते काय? याचे उत्तर मिळाले पाहिजे!

### शेतकऱ्यांच मरण, हेच सरकारच धोरण.....

नैसर्गिक आपत्तीत शेतकऱ्यांच्या मदतीसाठी राज्याच्या मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी ३१६२८ कोटी रुपयाच्या ऐतिहासिक (?) पॅकेजची घोषणा केली. या पॅकेजमध्ये आकड्यांची जुळवाजुळव करून शब्दाचां खेळ करीत शेतकऱ्यांशी सरकारने बेईमानी केली, हे शासन निर्णयाने सिध्द झाले आहे. देशांतील इतर राज्यांच्या तुलनेत फार कमी मदत असल्याने शेतकऱ्यांशी बेइमानी झाली आहे. सत्तेत येण्यापूर्वी कर्जमाफी करू म्हणून सांगीतले. एवढ्या भिषण परिस्थितीत कर्जमाफी ऐवजी कर्ज वसुली एक वर्षासाठी स्थगित ठेवण्याचा निर्णय जाहीर केला. विद्यार्थ्यांना परिक्षा शुल्क माफी जी रक्कम फार कमी असते, फक्त १० वी, १२ वी च्या विद्यार्थीना फी माफी जी सवलत नियमित सुरू आहे. घर पूर्णतः पडले असेल तर १ लाख २० हजार मिळणार. ही मदत आवास योजनेत पुर्वी पासुन सुरूच आहे. तिमाही विज बिल माफी, पण वीजबिल कोणते? शेतीचे की घराचे? याचा स्पष्ट उल्लेख नाही. जर शेतीचे असेल तर ते माफच आहे. अशी शब्दछल करून पॅकेजचे घोषणेत फडणवीस सरकारने शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. दिल्लीतील मोदी सरकारने सर्व शेतमाला वरील आयात शुल्क रद्द करून विदेशातून मोठ्या प्रमाणावर आयातीला परवानगी देवून बाजारात सर्वच शेतीमालाचे भाव पाडले. वायदे बाजारातील व्यापारावर बंदी घालून खुल्या बाजारांतील तेजीमंदीच्या माहितीचा अभाव निर्माण करून भीतीयुक्त वातावरण निर्माण केले. याचा परिणाम बाजारातील भाव पडले. या अतिवृष्टी, अतीपावसाला सहनशील असलेल्या जीएम बियाण्यांवरील बंदी कायम ठेवून शेतकऱ्यांना या नैसर्गिक आपत्तीच्या संकटातून बाहेर निघण्याचा मार्गही बंद केला आहे. तर राज्यातील सरकारने नैसर्गिक आपत्तीत मागील वर्षीच्या तुलनेत कमी मदतीचा शासन निर्णय काढून शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळत आत्महत्येच्या दारात उभे केले आहे.

## : शब्दांचा बंडखोर : नामदेव ढसाळांचे अस्वस्थ करणारे सत्य



१५ जानेवारी २०१४ रोजी मराठी साहित्य आणि समाजकारणातील एक वादळी पर्व संपले. स्पष्टवक्तेपणा, निर्भीड अभिव्यक्ती आणि व्यवस्थेला थेट आव्हान देणारी भाषा यासाठी ओळखले जाणारे कवीक्रांतिकारक नामदेव ढसाळ या दिवशी काळाच्या पडद्याआड गेले. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या जीवनप्रवासाकडे आणि योगदानाकडे पाहणे केवळ आदरांजली नाही, तर आजच्या समाजासाठी एक आत्मपरीक्षण आहे.

नामदेव लक्ष्मण ढसाळ यांचा जन्म १५ फेब्रुवारी १९४९ रोजी पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील पळसदेव येथे झाला. वडील मुंबईत कामाला असल्याने त्यांचे बालपण मुंबईतील कामाठीपुरा परिसरातील गोलपीठा भागात गेले.

गरिबी, उपेक्षा, शोषण आणि सामाजिक विषमतेचे भीषण वास्तव त्यांनी इथे प्रत्यक्ष अनुभवले. हाच अनुभव त्यांच्या लेखनाचा कच्चा माल ठरला आणि त्यांच्या शब्दांना धार मिळाली.

औपचारिक शिक्षण फारसे झाले नसले, तरी जीवनाचे कठोर शिक्षण त्यांनी रस्त्यावर घेतले. उदरनिर्वाहासाठी काही काळ टॅक्सी चालवतानाच समाजातील अन्याय त्यांना अस्वस्थ करत राहिला. या अस्वस्थतेतूनच त्यांनी शब्दांना वाट मोकळी करून दिली. १९७२ मध्ये प्रकाशित झालेला गोलपीठा हा कवितासंग्रह मराठी साहित्यविश्वात भूकंप घडवणारा ठरला.

प्रस्थापित साहित्यिक भाषेच्या चौकटी मोडून, वस्तीतील बोली, कडवट सत्य आणि नग्न वास्तव त्यांनी कवितेत आणले. त्यामुळे कौतुकासोबत तीव्र विरोधही झाला; मात्र ढसाळ मागे हटले नाहीत.साहित्यापुरते न थांबता त्यांनी सामाजिक चळवळीतही सक्रिय भूमिका बजावली.

९ जुलै १९७२ रोजी ज.वि. पवार आणि सहकाऱ्यांसह दलित पँथर या क्रांतिकारी संघटनेची स्थापना करून त्यांनी दलित प्रश्नांना रस्त्यावर उतरवले.

शोषितांचा आवाज बुलंद करताना त्यांनी व्यवस्थेशी थेट टक्कर घेतली. पुढे राजकीय मतभेदांमुळे संघटनेत फूट पडली आणि त्यांना एकाकीपणाचा सामना करावा लागला, तरीही त्यांच्या भूमिकेत तडजोड झाली नाही.

आयुष्याच्या उत्तरार्धात मायस्थेनिया ग्रॅव्हिस या गंभीर आजाराशी झुंज देत असतानाही त्यांचे लेखन आणि विचारप्रवाह थांबले नाहीत. त्यांच्या साहित्यिक आणि सामाजिक योगदानाची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले.



प्रमोद जांभुळकर
नागपूर.
९८२३९६९०९७

नामदेव ढसाळ यांची आक्रमक भाषा ही केवळ बंडखोरी नव्हती, तर ती समाजात समता, माणुसकी आणि न्यायाची ठाम मागणी होती. उपेक्षित, दुर्लक्षित आणि शोषितांचे जीवन साहित्यात केंद्रस्थानी आणण्याचे ऐतिहासिक काम त्यांनी केले. प्रतिकूल परिस्थितीतही आपल्या विचारांशी प्रामाणिक राहून उभे राहणे, हीच त्यांची खरी ओळख आहे. स्मृतिदिनानिमित्त या बंडखोर कवीला विनम्र अभिवादन. त्यांचे शब्द आजही प्रश्न विचारतात आणि समाजाला अस्वस्थ करतात.

■ ■ ■

## महायुती की ठाकरे बंधू?

राज्यातील २९ महापालिकांसाठी गुरुवारी, १५ जानेवारीला मतदान झाले. मुंबईसह २६ महापालिकांमधे भाजपाची सत्ता येईल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. मुंबई महापालिका जिंकण्याची भाजपाची महत्वाकांक्षा ठाकरे बंधू रोखू शकतील का ? पुणे व पिंपरी चिंचवड महापालिकेत भाजपाची असलेली सत्ता उपमुख्यमंत्री अजितदादा पवार काबीज करू शकतील का? ठाणे महापालिकेवर विक्रमी बहुमताने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आपले वर्चस्व कायम ठेऊ शकतील का? वसई झविरार महापालिकेतील हितेंद्र ठाकूर यांचे वर्चस्व भाजपा मोडून काढेल का? राज्यातील अन्य महापालिकांमधे भाजपाचा झंझावात कायम राहील का? या प्रश्नांची उत्तरे आज शुक्रवारी मतमोजणीनतंर मिळणार आहेत. महापालिकांचा निवडणूक निकाल ही देवेंद्र फडणवीस, उद्धव ठाकरे, राज ठाकरे, एकनाथ शिंदे, अजित पवार, गणेश नाईक, वर्षा गायकवाड, प्रकाश आंबेडकर आणि हितेंद्र ठाकूर यांची परीक्षा ठरणार आहे.

-------------------

राज्यातील मुंबई, छत्रपती संभाजीनगर, सांगली- मिरज - कुपवाड, नवी मुंबई वसई- विरार, कल्याण- डोंबिवली, कोल्हापूर, नागपूर, सोलापूर, अमरावती, अकोला, नाशिक, पिंपरी- चिंचवड, पुणे, उल्हासनगर, ठाणे, चंद्रपूर, परभणी , लातूर, भिवंडी- निजामपूर, मालेगाव, पनवेल, मिरा भाईंदर, नांदेड, जळगाव, अहिल्यानगर , धुळे, जालना, इचलकरंजी या महापालिकांसाठी मतदान पार पडले.

या २९ महापालिकेतील ८९३ प्रभागांतील २८०१ जागांवर पंधरा हजारापेक्षा जास्त उमेदवार निवडणुकीच्या मैदानात आपले नशीब आजमावत आहेत. मुंबईतील २२७ वॉर्डातून सतराशे उमेदवार लढतीत आहेत. मुंबई वगळता अन्यत्र ६८ नगरसेवकांची बिनविरोध निवड झाली आहे,

केंद्रात भाजपाप्रणित एनडीएची सत्ता आहे. राज्यात भाजपाप्रणित महायुतीची सत्ता आहे. नुकत्याच झालेल्या नगर परिषद व नगरपंचायत निवडणुकीत भाजपाने धुव्वाधार यश मिळविले आहे. देशात मोदी पर्व सुरू झाल्यापासून राज्यात भाजपाचा झंजावात सुरू झाला आहे.

देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री आहेत तसेच भाजपाचे राज्यातील सर्वोच्च नेते आहेत. प्रशासनात व पक्ष संघटनेतील अंतिम निर्णय त्यांचाच असतो. शिवसेनेची पंचवीस वर्षे असलेली युती त्यांच्याच काळात तुटली आणि ठाकरेंच्या शिवसेनेची तोडफोड त्यांच्याच रणनितीने झाली. अगोदर शिवसेना व नंतर राष्ट्रवादी काँग्रेस फोडून दोन प्रबळ प्रादेशिक पक्षांना कमजोर करण्याची किमया त्यांच्याच नेतृत्वाने महाराष्ट्रात करून दाखवली.

मुंबई कॉलिंग
डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

सन २०१७ च्या मुंबई महापालिका निवडणुकीत पक्षाचे ८२ नगरसेवक निवडून आल्यावर शिवसेनेबरोबर सत्तेत सहभागी न होण्याची खेळी त्यांचीच होती. देशातील सर्वात श्रीमंत महापालिका असलेल्या मुंबईवरील ठाकरे सेनेची मक्तेदारी संपविण्यात देवेंद्र फडणवीस हे यशस्वी होतील काय याचे उत्तर निकालानंतर मिळेल. भाजपाने मुंबईत विजय मिळवला तर फडणवीसांच्या वर्चस्वावर व नेतृत्वावर शिक्कामोर्तब होईल.

वीस वर्षांनी ठाकरे बंधू आपापसातील वाद विसरून एकत्र आले व त्यांनी महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने मुंबईकरांकडे कौल मागितला आहे. मुंबई आणि मराठीचा मुद्दा भाजपाच्या हिंदुत्वाच्या मुद्दयावर मात करणार का, हे निकालानंतर दिसून येईल.

एकनाथ शिंदे यांच्या बंडखोरीला भाजपाने उत्तेजन, संरक्षण व नंतर बक्षिसी दिली. जून २०२२ मधे उध्दव ठाकरे यांचे सरकार कोसळले. ठाकरेंची शिवसेना म्हणजे मुंबई महापालिका हे समिकरण कायम ठेवण्यासाठी मुंबईकरांची ठाकरेंना साथ मिळणार का?

राज ठाकरे यांनी मनसे स्थापन केल्यावर अनेकदा राजकीय भूमिका बदलल्या आहेत. कधी मोदींना पाठिंबा तर कधी विरोध. कधी शरद पवारांशी सख्य तर कधी निवडणूक न लढविण्याचा निर्णय. त्यांच्या धरसोड वृत्तीने त्यांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झालेले आहे. निकालानंतर अपयश आले तर राज ठाकरे उद्धव यांच्याबरोबर राहतील का?

मुंबई महापालिकेत मनसेचा एकही नगरसेवक नाही. जे निवडून आले ते सातही उध्दव यांच्या पक्षात निघून गेले. त्यामुळे मुंबई- ठाण्यात किंवा नाशिकमधे मनसेचे जे काही नगरसेवक निवडून येतील तो त्यांचा लाभच असेल.

राज ठाकरे यांच्या भाषणाने निवडणुकीच्या प्रचाराची दिशाच बदलली किंबहुना महामुंबईत एकतर्फी निवडणूक होणार असे जे वातावरण होते त्याला चाप बसला. ठाणे, कल्याण, डोंबिवलीवर एकनाथ शिंदे यांचे वर्चस्व आहे व ते कसे मोडून काढायचे याची चिंता भाजपाला आहे. अंबरनाथ पालिकेत शिंदे यांचे सर्वाधिक नगरसेवक निवडून आले असताना भाजपाने काँग्रेसच्या निवडून आलेल्या नगरसेवकांना पायघड्या घालून पक्षात घेतले व एकनाथ शिंदे यांना डावलून पालिकेवर कब्जा मिळविण्याचा प्रयत्न केला.

पण खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मुत्सद्दीपणाने भाजपाचा डाव उधळला गेला.

महायुतीत शिंदे व अजित पवार असले तरी त्यांची ताकद मर्यादीत ठेवण्याची भाजपाची सतत धडपड चालू असते हे मुंबई, ठाणे व पुण्यात दिसून आले. मनसे नको म्हणून काँग्रेसने उबाठा सेनेबरोबर जाण्याचे टाळले व प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन बरोबर युती करून मुंबईत निवडणूक लढवली.

या दोन्ही पक्षांकडे सर्व २२७ जागांवर लढण्यासाठी उमेदवारही मिळाले नाहीत यापेक्षा दुर्दैव कोणते? आपल्याकडे उमेदवार नाहीत म्हणून अनेक जागा वंचितने काँग्रेसला परत केल्या. पराभवाच्या मानसिकतेत असलेल्या पक्षांकडून वेगळी तरी काय अपेक्षा करणार?

नवी मुंबईत वनमंत्री गणेश नाईक यांना मंदा म्हात्रे यांच्याशी स्पर्धक म्हणून लढावे लागले. दोघेही नेते भाजपामधे आयाराम आहेत. पण धनवान आहेत. नाईकांकडे मोठी कार्यकर्त्यांची फौज आहे. दोघांना संभाळताना फडणविसांना तारेवरची कसरत करावी लागते.

शिंदेवर नियंत्रण ठेवण्यासाठी नाईकांना भाजपाकडून उत्तेजन मिळत असते. त्यामुळे नाईकांना शिंदे व मंदा म्हात्रे या दोघांशी लढून आपले वर्चस्व कायम राखावे लागत आहे. महायुतीतील पक्षच एकमेकांविरूध्द लढत आहेत, नेते एकमेकांवर आरोप करीत आहेत. पैसे वाटून आणि मतदारांना गृहित धरून निवडणूक लढवली गेली हे वास्तव आहे.

मतदानाच्या अंतिम टप्प्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सल्लागार ऑफीसवर क्राइम ब्रँचची धाड पडली आणि शिवसेनेचे सर्वाधिक नगरसेवक असताना त्यांना डावलून आपला नगराध्यक्ष करण्याचे कारस्थान भाजपाने रचले . केंद्रात एनडीएमधे, राज्यात महायुतीत एकत्र पण महापालिका निवडणुकीत एकमेकांच्या विरोधातङ्क लोकांना काहीच कळत नाही, असे सत्ताधारी नेत्यांना वाटते काय ?

## खरा वसंत

**वाचक लिहितात**

निसगार्ने निर्माण केलेले ऋतुचक्र हे केवळ हवामानातील बदलांचे चक्र नसून, मानवी जीवनाला गहन आध्यात्मिक संदेश देणारी एक दिव्य व्यवस्था आहे. प्रत्येक ऋतू मनुष्याच्या अंतःकरणातील एखाद्या अवस्थेचे प्रतीक आहे. त्यामध्ये वसंत ऋतू हा आत्मिक उन्नती, चैतन्य आणि नवचैतन्याचा ऋतू मानला जातो. म्हणूनच वसंत ऋतूला ऋतूंचा राजा असे संबोधले जाते. वसंत ऋतू म्हणजे पानगळ आणि बहर यांचा संगम. आध्यात्मिक दृष्टिकोनातून पाहिले तर पानगळ म्हणजे जुने संस्कार, दोष, अहंकार आणि नकारात्मक वृत्ती यांचे गळून पडणे; तर बहर म्हणजे शुद्ध भाव, सात्त्विक विचार आणि ईश्वरप्राप्तीची ओढ यांचे उमलणे. कडाक्याच्या थंडीप्रमाणेच मानवी जीवनातही कधी कधी जडत्व, निरुत्साह आणि अज्ञानाची अवस्था येते. त्या अवस्थेतून बाहेर काढणारी सूर्याची कोवळी ऊब म्हणजे ईश्वरकृपा

वसंत ऋतूत झाडांना नवी पालवी फुटते, आंब्याला मोहर येतो, फुलांवर भोवऱ्यांचे गुंजन सुरू होते. ही सर्व दृश्ये बाह्य असली, तरी त्यांचा सूक्ष्म अर्थ अंतर्मनाशी जोडलेला आहे. पालवी म्हणजे साधकाच्या मनात उगवणारे सद्विचार, मोहर म्हणजे भक्तीभावाची सुरुवात, तर भोवऱ्यांचे गुंजन म्हणजे नामस्मरणातून निर्माण होणारी चैतन्यलहरी. कोकिळेचा मधुर स्वर हा आत्म्यातून उमटणाऱ्या आनंदाचा प्रतिध्वनी आहे. वसंत ऋतूत येणारी वसंत पंचमी म्हणजे ज्ञानज्योतीचा आध्यात्मिक उत्सव

वसंत ऋतूची सुरुवात वसंत पंचमी या पवित्र दिवशी होते. विवेकबुद्धी आणि चैतन्यस्वरूप शक्ती. साधकासाठी खरे ज्ञान म्हणजे केवळ पुस्तकी विद्या नव्हे, तर आत्मा आणि परमात्म्याची ओळख होणे. वसंत पंचमीला पिवळ्या रंगाला विशेष महत्त्व आहे. जसा निसर्ग दरवर्षी नव्याने बहरतो, तसाच साधकानेही दररोज स्वतःला अंतर्मुख करून आत्मिक उन्नतीचा संकल्प करावा. साक्षीभाव ठेवून जीवनातील प्रत्येक प्रसंग पाहिला, तर अंतर्मनात कायमचा वसंत नांदू लागतो.

जिथे अंतःकरण शुद्ध आहे, जिथे ईश्वरस्मरण आहे, तिथेच खरा वसंत आहे.

■ सौ. रमा देशमुख
नागपूर.

## पोषणतत्त्वांचा खजिना आणि फिटनेसचा गुपित मंत्र



मोरींगा पावडर किंवा शेवग्याच्या पानांची पावडर आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानली जाते. यात भरपूर प्रमाणात जीवनसत्त्वे, खनिजे कॅल्शियम, लोह, पोटॅशियम, प्रथिने आणि अँटिऑक्सिडंट्स आढळतात. मोरींगा पावडर नियमित सेवन केल्यास शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होते.

सर्दी-खोकला, संसर्ग यापासून संरक्षण मिळते. तसेच यात असलेले अँटिऑक्सिडंट्स शरीरातील घातक मुक्त रॅडिकल्स कमी करून पेशींना नुकसान होण्यापासून वाचवतात. मोरींगा पावडर पचनसंस्था सुधारते, बद्धकोष्ठता कमी करते आणि आतड्यांचे आरोग्य चांगले ठेवण्यास मदत करते. मधुमेह असलेल्या व्यक्तींमध्ये रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यासाठीही मोरींगा उपयुक्त ठरतो, कारण तो इन्सुलिनचे कार्य सुधारण्यास मदत करतो.

याशिवाय मोरींगा पावडर हाडे आणि स्नायू मजबूत करण्यासाठी फायदेशीर आहे. यात कॅल्शियम आणि फॉस्फरस भरपूर असल्याने हाडांची घनता वाढते आणि सांधेदुखी, ऑस्टिओपोरोसिसचा धोका कमी होतो. महिलांसाठी मोरींगा पावडर विशेष लाभदायक आहे, कारण ती रक्तातील हिमोग्लोबिन वाढवण्यास मदत करते व अशक्तपणा कमी करते. त्वचा आणि केसांच्या आरोग्यासाठीही मोरींगा उपयुक्त आहे.

वजन कमी करण्यासाठी मोरींगा पावडर चांगला पर्याय आहे, कारण ती चयापचय सुधारते आणि पोट भरल्याची भावना देते. मोरिंगा या पृथ्वीवरील सर्वात शक्तिशाली पोषक घटकांपैकी एक आहे. म्हणूनच त्याला पोषणाचा सुपर बाप म्हणतात. मोरिंगा प्रत्यक्षात अन्नात एक हिरा आहे.

मोरिंगामध्ये व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन बी १, व्हिटॅमिन बी २, व्हिटॅमिन बी ३, व्हिटॅमिन सी, कॅल्शियम, पोटॅशियम, लोह, मॅग्नेशियम, फॉस्फरस यासारखे अनेक घटक असतात. त्याचे सुपर पोषण असे आहे की मोरिंगामध्ये संत्रापेक्षा ७ पट जास्त व्हिटॅमिन सी, दुधापेक्षा चार पट जास्त कॅल्शियम, केळीपेक्षा ३ पट जास्त पोटॅशियम आणि ताकापेक्षा दुप्पट प्रथिने असतात.

मोरिंगामध्ये अँटीमाइक्रोबियल आणि अँटीफंगल गुणधर्म आहेत, ज्यामुळे ते नैसर्गिक रोग प्रतिकारशक्ती बूस्टर बनते.

मोरिंगा उपवास रक्तातील साखर कमी करण्यास आणि मधुमेहावरील रामबाण उपाय संवेदनशीलता सुधारण्यास मदत करू शकतो. त्याचे नियमित सेवन केल्याने ग्लूकोजचे अचानक स्पाइक्स टाळण्यास मदत होते. जर आपल्याला बद्धकोष्ठता, गॅस किंवा अपचन असेल तर मोरिंगा पावडर उपयुक्त ठरू शकते. हे फायबरमध्ये समृद्ध आहे, जे पचन मजबूत करते आणि आतड्यांसंबंधी आरोग्यास समर्थन देते. अल्सर कमी करण्यास उपयुक्त ठरू शकतात.

■ ■ (उर्वरीत भाग उद्याच्या अंकात) ■ ■

**अशोकायन**

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### हगणदारी मुक्ति योजना?

डोळे झाकुन खुशाल
बसने प्रवास करावा
गावठाण आल्याची वर्दी
देते दुर्गंधीयुक्त हवा...

हगणदारी मुक्तिची
शासन करते बढाई
पण प्रत्यक्षात तशी
वस्तुस्थिती दिसत नाई..

टमरेल घेऊन हाती
लोक जाती उघड्यावर
कायद्याचा वचक वाटते
राहिला नाही कुणावर ..

# : तामिळनाडू : द्रमुक आणि अण्णा द्रमुकची रणनिती!



अभय गोखले

तामिळनाडूमध्ये लवकरच विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. त्या करता सत्ताधारी द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडी आणि प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या अण्णा द्रमुक या पक्षाच्या नेतृत्वाखालील आघाडी व सिनेस्टार विजय याच्या नेतृत्वाखालील तमिलगा वेत्री कळघम (टीव्हीके) हा पक्ष यांच्यात प्रामुख्याने लढत होणार आहे.

द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडीत कॉंग्रेस,सीपीआय, सीपीएम आणि इतर छोट्या पक्षांचा समावेश आहे. अण्णा द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडीत भाजपा, पीएमके आणि इतर छोट्या पक्षांचा समावेश आहे.

भाजपाने या खेपेस अण्णा द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडी सत्तेवर आली तर अण्णा द्रमुककडे ३ कॅबिनेट मंत्रीपदे आणि जागा वाटपात ५६ जागा स्वतःसाठी आणि आपल्या सहयोगी पक्षांसाठी मागितल्याचे बोलले जाते. गेल्या खेपेस अण्णा द्रमुकने, भाजपा करिता २० जागा सोडल्या होत्या. त्यापैकी चार जागा भाजपाने जिंकल्या. अण्णा द्रमुकने गेल्या खेपेला १९१ जागा लढवल्या होत्या, त्यापैकी ६६ जागा पक्षाने जिंकल्या होत्या.

आघाडीतील आणखी एक पक्ष,पीएमकेने,२३ जागा लढवून त्यापैकी ५ जागा जिंकल्या होत्या. मध्यंतरी पीएमके पक्षात फूट पडली असून वडिलांच्या (एस.रामदास ) यांच्या नेतृत्वाखालील गट आणि मुलाच्या (अंबुमणी रामदास) याच्या नेतृत्वाखालील गट असे दोन गट निर्माण झाले आहेत.त्यापैकी एक गट (एस. रामदास) हा भाजपा बरोबर असून दुसरा गट (अंबुमणी रामदास) हा अण्णा द्रमुक बरोबर आहे.

तामिळनाडूमध्ये विधानसभेच्या एकूण २३४ जागा आहेत.साध्या बहुमतासाठी ११८ जागा हा जादूई आकडा आहे. अण्णा द्रमुक हा पक्ष लवकरच होणाऱ्या तामिळनाडू विधानसभेच्या निवडणुकीत १७० च्या आसपास जागा लढवण्यासाठी उत्सूक असल्याचे बोलले जात आहे.

कारण साध्या बहुमतासाठी आवश्यक असणारा ११८ हा जादूई आकडा स्वबळावर गाठावयाचा असेल तर अण्णा द्रमुकला तेवढ्या जागा लढाव्याच लागतील. तेंव्हा भाजपाची ५६ जागांची मागणी अण्णा द्रमुक मान्य करेल असे वाटत नाही. फार फार तर भाजपाला २५ ते ३० च्या आसपास जागा सोडण्यास,अण्णा द्रमुक राजी होईल अशी शक्यता दिसून येत आहे.

अण्णा द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडी येत्या विधानसभा निवडणुकीत सत्तेवर आली तर आपल्याला ३ कॅबिनेट मंत्रीपदे देण्यात यावीत, अशी आणखी एक मागणी भाजपाकडून करण्यात आली आहे.अर्थात ही मागणी, अण्णा द्रमुक मान्य करेल असे वाटत नाही. अण्णा द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडी येत्या विधानसभा निवडणुकीत तामिळनाडूमध्ये सत्तेवर आली तर भाजपाला मंत्रीमंडळात स्थान मिळण्याची शक्यता फारच कमी आहे. द्रमुककडून आता पासूनच प्रचार सुरू झाला आहे की,येत्या विधानसभा निवडणुकीत, अण्णा द्रमुक पक्ष सत्तेवर आला तर, तामिळनाडूचे नियंत्रण, भाजपाच्या हातात जाईल. तामिळनाडूमध्ये आजही भाजप हा पक्ष हिंदी भाषिक पट्ट्यातील पक्ष म्हणून ओळखला जातो.

तामिळनाडूतील बहुसंख्य लोकांचा हिंदी भाषेच्या सक्तीला विरोध असल्याने ते साधारणपणे द्रमुक आणि अण्णा द्रमुक या प्रादेशिक पक्षांना मतदान करतात. त्यामुळे द्रमुकला अपप्रचार करण्याची संधी मिळू नये म्हणून, भाजपाला मंत्रीमंडळात घेण्याची मागणी अण्णा द्रमुक सध्या तरी मान्य करणार नाही. अर्थात या जरतरच्या गोष्टी झाल्या.

महत्वाचे म्हणजे तामिळनाडूचा आजवरचा इतिहास पाहता तेथे आलटून पालटून सत्तेवर आलेल्या द्रमुक आणि अण्णा द्रमुक या पक्षांनी आपल्या आघाडीतील मित्रपक्षांना आपल्या मंत्रीमंडळात कधीही स्थान दिले नाही. द्रमुक आणि अण्णा द्रमुक या पक्षांची आजवर ही रणनिती राहिली आहे की आपल्या आघाडीतील मित्रपक्षांना जरुरीपेक्षा जास्त मोठे होऊन द्यायचे नाही.

बऱ्याच वेळा हे दोन्ही पक्ष स्वबळावर सत्तेत आल्याने त्यांना आघाडीतील घटक पक्षांना आपल्या मंत्रीमंडळात घेण्याची गरजच भासली नाही. मात्र २००६ साली द्रमुकला स्वबळावर बहुमत मिळालेले नसतानाही, द्रमुकने आघाडीतील घटक पक्षांना आपल्या मंत्रीमंडळात स्थान दिले नव्हते. २००६ साली झालेल्या तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत, द्रमुकला, विधानसभेच्या एकूण २३४ जागांपैकी ९६ जागांवर विजय मिळाला होता.

साध्या बहुमतासाठी आवश्यक असणारा ११८ हा जादूई आकडा, तेंव्हा द्रमुक गाठू शकला नव्हता, तरी सुद्धा द्रमुकने आपल्या मंत्रीमंडळात आघाडीतील घटक पक्षांना स्थान दिले नव्हते.कॉंग्रेस आणि पीएमके या मित्रपक्षांनी तेंव्हा द्रमुकच्या नेतृत्वाखालील सरकारला बाहेरून पाठिंबा दिला होता.

लवकरच होणाऱ्या तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडी पुन्हा सत्तेवर आली तर आपल्याला मंत्रीमंडळात स्थान मिळायला हवे, अशी मागणी कॉंग्रेसकडूनही काही दिवसांपूर्वी करण्यात आली आहे.मात्र ती मागणी, द्रमुक, मान्य करेल असे वाटत नाही. १९६७ साली तामिळनाडूमध्ये कॉंग्रेसचा पराभव झाल्यानंतर, गेल्या ५८ वर्षांत, कॉंग्रेस तेथे, सत्तेच्या आसपासही फिरकलेली नाही. त्यामुळे मंत्रीमंडळात स्थान देण्याची जी मागणी, कॉंग्रेसने द्रमुककडे केली आहे ती समजण्यासारखी आहे.

थोडक्यात कॉंग्रेस काय किंवा भाजपा काय, या दोन्ही राष्ट्रीय पक्षांना, द्रमुक आणि अण्णा द्रमुक हे तामिळनाडूतील प्रादेशिक पक्ष, जरुरीपेक्षा मोठे होऊन देणार नाहीत.त्यामुळे त्यांची मंत्रीमंडळात सामावून घेण्याची मागणी, द्रमुक किंवा अण्णा द्रमुक हे तामिळनाडूतील प्रादेशिक पक्ष मान्य करणार नाहीत, याबाबत शंका बाळगण्याचे कारण नाही.

■ ■ ■

# साहित्य संस्कृतीच्या संवर्धनाची दुर्दम्य महत्त्वाकांक्षा






mahasagarngp@gmail.com

शाळेपेक्षा शाळाबाह्य उपक्रमांमध्ये सदैव रमलेले, समाजातील दुःख, करुणा, कष्टकरी, शेतकरी यांच्या हालअपेष्टांनी भरलेले उपेक्षित जगणे, स्त्री-जाणिवा यांचे प्रतिबिंब आपल्या लिखाणातून समाजासमोर उजागर करणारे ज्येष्ठ साहित्यिक दगडू मथुरा बाबुराव लोमटे सांगतात की, मानवाचे जीवन अधिक समृद्ध होत असते ते त्याच्या जीवनानुभवांतून. या जीवनानुभवांना अधिक व्यापक दृष्टी देण्याची ताकद साहित्यात दडलेली आहे.

साहित्याविषयी प्रेम, रुची आणि आस्वादकता निर्माण करून नव्या दमाचे लेखक, कवी, कथाकार, गझलकार घडवण्याबरोबरच साहित्य-संस्कृतीच्या संवर्धनाची दुर्दम्य इच्छाशक्ती बाळगणारे दगडू लोमटे हे यशवंतराव चव्हाण स्मृती समितीच्या माध्यमातून अहोरात्र झटत मराठवाड्यातील अंबाजोगाईचे सांस्कृतिक दूत म्हणून नावारूपास आले आहेत.

दगडू लोमटे मोठ्या कृतज्ञ भावनेने सांगतात की, माझ्या जडणघडणीत शिक्षक वडील बाबुराव लोमटे आणि आई मथुरा बाबुराव लोमटे यांचा फार मोठा वाटा आहे. वडील शिक्षक असल्याने पुस्तकांचा सहवास लाभला. कुटुंबवत्सल आईचे माणसांवरील प्रेम आणि भूतदया यांतून माज्या सामाजिक जाणिवांच्या कक्षा अधिक वृद्धिंगत झाल्या.

यावेळी ते बीड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष असलेले त्यांचे चुलते भगवानराव लोमटे यांची प्रकर्षाने आठवण करून देतात. यशवंतराव चव्हाण यांच्या कार्याने प्रेरित झालेले भगवानराव लोमटे राजकारणात रमले असले तरी, त्यांना नाटक, संगीत, लावणी, कथा, शायरी यांचीही ओढ होती. त्यांच्या सान्निध्यातच साहित्याची गोडी निर्माण झाली.

यातूनच खेड्यावर बहिणीकडे शिक्षण घेत असताना ग्रामीण जीवनातील वास्तव, कष्टकरी शेतकऱ्यांचे दुःख, स्त्रीविश्व त्यांनी शब्दबद्ध केले. त्यांच्या हातून पहिल्या कवितेची निर्मिती झाली आणि ते लिहिते झाले. अनेक वृत्तपत्रे, मासिके, दिवाळी अंकांतून त्यांनी लेख व कविता लिहिल्या. यातूनच पांगलेल्या प्रार्थना हा कवितासंग्रह आणि व्यक्तिचित्रात्मक लेखांचा संग्रह राहून गेलेली पत्रे जन्माला आला.

शालेय शिक्षणापेक्षा शाळाबाह्य उपक्रमांमध्ये रमलेल्या दगडू लोमटे यांच्यातील कवी आणि लेखकाला खऱ्या अर्थाने पोषण मिळाले ते १९८२ साली अंबाजोगाई येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात. शाळेत अभ्यासलेल्या कविता आणि पाठ्यपुस्तकांतील कवी-लेखकांना प्रत्यक्ष भेटण्याची संधी येथे मिळाली. मराठी गझलांचे आद्यकार कवी सुरेश भट यांच्या हृदयस्पर्शी सादरीकरणाचा त्यांच्यावर विशेष प्रभाव पडला. तेथूनच त्यांनी ठरवले की, आपल्याला साहित्य क्षेत्रातच जगायचे आहे. यानंतर पद्मश्री बाबा आमटे यांच्या भारत जोडो यात्रेत सहभागी झाल्याने देशातील विविध समाजांची संस्कृती, भाषा आणि समस्या जवळून पाहण्याची संधी मिळाली. बाबांची सेवाभावी वृत्ती अनुभवता आली. याचाच परिणाम म्हणून माझ्यातील साहित्यिक कार्यकर्त्याला नवे बळ मिळाले, असे ते सांगतात.

यशवंतराव चव्हाण यांना अपेक्षित असलेली साहित्य-संस्कृती रुजावी आणि तिचे संवर्धन व्हावे, यासाठी त्यांचे चुलते भगवानराव लोमटे वर्षातून एकदा तीन दिवसीय साहित्य महोत्सवाचे आयोजन करीत. या चळवळीत दगडू लोमटे यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. त्यांच्या धडपडीची आणि उत्साहाची दखल घेत यशवंतराव चव्हाण स्मृती समितीचे सचिवपद त्यांच्याकडे आले. गेल्या २८ वर्षांपासून ही जबाबदारी ते अत्यंत यशस्वीपणे सांभाळत आहेत.

४१ वर्षे पूर्ण झालेला हा तीन दिवसीय साहित्य महोत्सव यशस्वी करण्यासाठी ते मराठवाड्यासह कोकण, खानदेश, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, बृहन्महाराष्ट्र तसेच देशाच्या कानाकोपऱ्यात होणाऱ्या साहित्य संमेलनांना आणि कवी संमेलनांना आवर्जून उपस्थित राहतात. उत्कृष्ट लेखन, प्रभावी सादरीकरण आणि माणुसकी जपणाऱ्या व्यक्तींना शोधून ते आपल्या संमेलनात आमंत्रित करतात.

ते अभिमानाने सांगतात की, साहित्यिकांबरोबरच संगीत वारसा लाभलेल्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील गायक-वादकांनाही आम्ही मंच दिला आहे. आजवर विं.दा. करंदीकर, विठ्ठल वाघ, अरुण म्हात्रे, नारायण सुर्वे, रामदास फुटाणे, वसंतराव देशपांडे, सी. आर. व्यास, राहुल देशपांडे, सतीश व्यास, एम. राजम, आरती अंकलीकर-टिकेकर अशा अनेक दिग्गजांचा सहभाग या साहित्य समारोहात झाला आहे.

यशस्वी आयोजनासाठी आर्थिक पाठबळ, मनुष्यबळ आणि योग्य नियोजन या त्रिसूत्रीचा ते कटाक्षाने अवलंब करतात. अतिथी कवी-लेखक येण्यापासून ते त्यांच्या प्रस्थानापर्यंत आदरातिथ्य यथोचित होईल, याची ते पूर्ण दक्षता घेतात. विशेष मेहनत घेऊन सादरीकरण करणाऱ्या कवी-लेखकांना मानधन देण्याची परंपराही त्यांनी रूढ केली आहे.

ही साहित्य चळवळ वर्षभर सुरू राहावी आणि नवोदित लेखक, कवी, गझलकारांना पोषक वातावरण मिळावे, यासाठी मराठवाडा साहित्य परिषद (शाखा अंबाजोगाई), मासिक संगीत मैफिली आणि विविध शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून सातत्याने साहित्य मैफिली आयोजित केल्या जातात.

अंबाजोगाईमध्ये संगीताची विशेष रुची जपली जाते. या रुचीला व्यापक आयाम देण्यासाठी पोषक वातावरण निर्मिती केली जाते. यामुळेच महाराष्ट्रातील सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध शहरांमध्ये अंबाजोगाईचा समावेश होतो, असे ते आत्मीयतेने सांगतात.

साहित्य चळवळ उभारत असतानाच त्यांनी मानवी दृष्टिकोन आणि करुणा जपत मानवी नाती संवेदनशीलतेने गुंफली आहेत. यवतमाळ जिल्ह्यातील मराठी व उर्दू गझल लिहिणारा नवोदित कवी आबेद शेख अत्यंत विवंचनेत होता. त्याची परिस्थिती पाहून त्यांनी त्याला आर्थिक मदत केली.

नंतर सहज भेटीत आबेद शेख म्हणाला, तुमच्या मदतीमुळे यंदा माझ्या घरी ईद साजरी होणार आहे, आणि त्याचा पहिला मान तुम्हालाच जातो.हे शब्द ऐकून दगडू लोमटे यांच्या डोळ्यांत पाणी तरळले. त्या गुणवंत कवीसाठी व्यासपीठ उपलब्ध करून देत त्यांनी अनेक कार्यक्रम दिले आणि मानधनही मिळवून दिले. अशा असंख्य प्रसंगांतून त्यांच्या मातृहृदयाची प्रचिती येते.

याच सामाजिक जाणिवेतून नवसाहित्य लिहिणाऱ्या तरुणांना प्रोत्साहन देण्यासाठी निलेश चव्हाण, अविनाश भारती, सय्यद चांद तरोडकर, सुनील उबाळे, डी. के. शेख, गुंजन पाटील अशा अनेक कवींना पुन्हा पुन्हा व्यासपीठ मिळवून देण्याचा प्रयत्न ते करीत असतात.

साहित्य-संस्कृती रुजविण्याच्या आणि फुलविण्याच्या त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना शांतीवन बाबा आमटे उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार, संगीत क्षेत्रातील भरीव कामगिरीसाठी मारवा फाउंडेशन, पुणे यांचा पं. अण्णासाहेब गुंजकर स्मृती पुरस्कार, उर्दू मुशायऱ्यांसाठी भुसावळ येथील अनिक फाउंडेशनचा साहब-ए-एजाज सन्मान, जमाते हिंद अंबाजोगाई सामाजिक सौहार्द पुरस्कार तसेच श्री अनंतपाळ साहित्य सेवा पुरस्कार (शिरूर, जि. लातूर) यांनी गौरविण्यात आले आहे.

ते म्हणतात की, आज नवोदित कवी-लेखक निसर्ग, प्रेम, करुणा, स्त्रीविश्व आणि दुःखी-कष्टकऱ्यांच्या जाणीवा अधिक ताकदीने गझल व कवितांच्या माध्यमातून मांडत आहेत. त्यांच्यासाठी भविष्यात विशेष योजना आखण्याचा मानस आहे.

या लेखाच्या माध्यमातून ते नवोदित कवी-लेखकांना सांगू इच्छितात की, प्रस्थापित कवी-लेखकांचा प्रभाव जरूर घ्या; पण तुमच्या लिखाणाला स्वतःची स्वतंत्र शैली असली पाहिजे. तेव्हाच ते अजरामर ठरेल. दुर्दम्य इच्छाशक्ती, करुणा आणि मानवतेला चहुबाजूंनी स्पर्श करणारा हा कार्यकर्ता साहित्य-संस्कृती रुजविण्यासाठी आणि तिच्या संवर्धनासाठी जे अखंड कार्य करीत आहे, त्याला असेच भरघोस यश मिळत राहो—यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा.

-----------------

दगडू लोमटे संपर्क क्रमांक
9823009512

■ ■ ■

# संक्रांतीत काळी साडी : मोठ्या रात्रीस निरोपाची घडी!!

भारत हा कृषीप्रधान देश आहे त्यामुळे या भारत देशात कृषी व्यवस्था व त्याच्याशी निगडित अनेक सण- समारंभ साजरे केले जातात. त्याचप्रमाणे मकरसंक्रांत हा जानेवारी महिन्यात व हिंदू पंचांगाप्रमाणे पौष या दहाव्या मराठी महिन्यात येणारा शेती संबंधित सण असून सौर कालगणनेशी संबंधित असा हा महत्त्वाचा भारतीय सण आहे. या दिवसांमध्ये शेतांत आणि मळ्यांमध्ये आलेल्या धान्याचे वाण स्त्रिया एकमेकींना देतात. हरबरे, ऊस, बोरे, गव्हाच्या ओंब्या, तीळ अशा गोष्टी सुगडात भरून त्या देवाला अर्पण करतात. बायका उखाणे घेतात व एकमेककींना तिळगूळ घ्या, गोड गोड बोला असे म्हणतात.

--------------

मकरसंक्रांतीला महाराष्ट्रात नुसतेच संक्रांत म्हणतात. मकरसंक्रांती- उत्तरायण माघी संक्रांती, ज्याला पश्चिम बंगालमध्ये मोकोर सोनक्रांती म्हणूनही ओळखले जाते आणि नेपाळमध्ये माघे संक्रांती, येथे संक्रांती म्हणजे हस्तांतरण, हा दिवस सूर्याचा मकर राशीत संक्रमण दिवस मानला जातो.

आता हिंदू दिनदर्शिकेमध्ये सूर्य उत्तरेकडे सरकतो. सूर्य या देवतेला समर्पित, अनेक स्थानिक बहु-दिवसीय उत्सव संपूर्ण भारतात आयोजित केले जातात. ग्रेगेरियन दिनदर्शिकेनुसार जानेवारी महिन्यात सूर्य मकर राशीत प्रवेश करतो, तो दिवस दरवर्षी साजरा केला जातो. सूर्याच्या मकर राशीत प्रवेशाचा तो पहिला दिवस आहे.

लीप वर्षांमध्ये एक दिवस जोडल्यामुळे, मकर संक्रांतीची तारीख थोडी बदलू शकते. लीप वर्षात ते १५ जानेवारीला येते, अन्यथा १४ जानेवारीला असते. मकर संक्रांतीशी संबंधित सण आसाममध्ये माघ बिहू, पंजाबमध्ये माघी, हिमाचल प्रदेशात माघी साजी, जम्मूमध्ये माघी संग्रांद किंवा उत्तरायण, हरियाणामध्ये सक्रत, राजस्थानमध्ये सकरत, मध्य भारतात सुकरात, पोंगल अशा विविध नावांनी ओळखले जातात.

तामिळनाडूमध्ये उत्तरायण, गुजरात आणि उत्तर प्रदेश, उत्तराखंडमध्ये घुघुटी, बिहारमध्ये दही चुरा, ओडिशामध्ये मकर संक्रांती, कर्नाटक, महाराष्ट्र, गोवा, पश्चिम बंगाल- ज्याला पौष संक्रांती देखील म्हणतात, उत्तर प्रदेश -खिचडी संक्रांती देखील म्हणतात. उत्तराखंड- ज्याला उत्तरायणी देखील म्हणतात किंवा सोप्या भाषेत, आंध्र प्रदेश आणि तेलंगणामधील संक्रांती, माघे संक्रांती- नेपाळ, सोंगक्रान- थायलंड, थिंगयान- म्यानमार, मोहन सोंगक्रान- कंबोडिया आणि शिशूर, सेनक्राथ- काश्मीर आदी.

मकर संक्रांती हा सामाजिक सण आहे. हा सण रंगीबेरंगी सजावट, ग्रामीण मुलांनी घरोघरी जाणे, गाणी गाणे आणि काही भागात भेटवस्तू मागणे, मेळे, नृत्य, पतंग उडवणे, शेकोटी पेटवणे आणि मेजवानी यांसारख्या सामाजिक उत्सवांनी साजरी केली जाते.

इंडोलॉजिस्ट डायना एल. एक यांच्या मते मघा मेळ्याचा उल्लेख हिंदू महाकाव्य महाभारतात आहे. अनेक निरीक्षक पवित्र नद्या किंवा तलावांवर जातात आणि सूर्याला धन्यवाद देण्यासाठी स्नान करतात.

दर बारा वर्षांनी, हिंदू कुंभमेळ्यासह मकर संक्रांत पाळतात- जगातील सर्वात मोठ्या सामूहिक तीर्थक्षेत्रांपैकी एक, अंदाजे ६० ते १०० दशलक्ष लोक या कार्यक्रमाला उपस्थित राहतात. या कार्यक्रमात, ते सूर्याला प्रार्थना करतात आणि गंगा व यमुना नदीच्या प्रयागराज संगमावर स्नान करतात, या परंपरेचे श्रेय आदि शंकराचार्यांना दिले जाते.

दरवर्षी २१-२२ डिसेंबरला सूर्याची किरणे पृथ्वीच्या साडेतेवीस दक्षिण या अक्षांशावर लंबरूपात पडतात आणि त्या दिवसापासून सूर्याचे उत्तरायण सुरू होते. इसवी सनाच्या सुरुवातीच्या वर्षात सूर्य त्याच सुमारास मकर राशीमध्ये संक्रमण- प्रवेश करीत असे, त्यामुळे साडेतेवीस दक्षिण या अक्षवृत्ताला मकरवृत्त म्हणू लागले.

पुढच्या काळात सूर्याच्या उत्तरायणाची सुरुवात २१-२२ डिसेंबरलाच होत राहिली, तरी पृथ्वीच्या परांचन गतीमुळे सूर्याच्या मकरसंक्रमणाची तारीख पुढेपुढे जात राहिली. साहजिकच हिंदूंच्या मकरसंक्रांत या सणाची तारीख बदलत राहिली. मकरसंक्रांतीच्या दिवशी सूर्य धनू राशीतून मकर राशीत प्रवेश करतो. सूर्याचे उत्तरायण आधीच म्हणजे २१-२२ डिसेंबरलाच सुरू झालेले असते.

अर्थातच त्या दिवसापासून सूर्याचे उत्तरायण सुरूच असते. पृथ्वीवरून पाहिले असता २१-२२ डिसेंबरपासून सूर्याच्या उगविण्याची जागा दिवसेंदिवस उत्तरेकडे सरकत जाते.

महाभारतात कुरु वंशाचे संरक्षक भीष्म हे बाणांच्या शय्येवर- शरशय्येवर उत्तरायणाची वाट पहात पडून होते. त्यांना इच्छामरणाचे वरदान होते. ज्या दिवशी उत्तरायण सुरू झाले त्यादिवशी त्यांनी प्राणत्याग केला. भारतीय परंपरेत उत्तरायणाचा काळ दक्षिणायनापेक्षा अधिक शुभ मानला जातो.

संक्रांत ही एक देवता मानली गेली असून प्रतिवर्षी ती येताना वेगवेगळ्या वाहनावर बसून येते, अशी समजूत प्रचलित आहे. कधी तिचे वाहन हत्ती, कधी गाढव तर कधी डुक्कर असते. मात्र यामागे नेमका काय कार्यकारणभाव आहे? हे मात्र नोंदविलेले दिसून येत नाही.

संक्रांतीचा आदला दिवस महाराष्ट्रात भोगी या नावाने साजरा होतो. या हवामानात उपलब्ध सर्व शेंगभाज्या, फळभाज्या यांची तिळाचा कूट घालून केलेली मिश्र भाजी, तीळ लावलेली बाजरीची भाकरी, लोणी अणि मुंगाची खिचडी असे पदार्थ या दिवशी आवर्जून केले जातात. संक्रांतीच्या दिवशी गुळाची पोळी आणि तिळगुळाचे विशेष महत्त्व असते.



कृष्णकुमार आनंदी गोविंदा निकोडे
गडचिरोली.
९४२३७१४८८३

महाराष्ट्रात हा सण तीन दिवस साजरा करतात. यास भोगी- सामान्यतः १४ जानेवारी, संक्रांत- सामान्यतः १५ जानेवारी व किंक्रांत- सामान्यतः १६ जानेवारी, अशी नावे आहेत. संक्रांतीस आप्तस्वकीयांना, मित्रमंडळींना आणि लहान मुलांना तिळगुळ, तिळाचे लाडू, वड्या किंवा तिळाचा हलवा आणि स्त्रियांना वाण वाटून तिळगुळ घ्या आणि गोड बोला असे सांगून स्नेह वृद्धिंगत होण्याची शुभकामना दिली जाते.

विवाहित स्त्रिया या दिवशी आणि या दिवसापासून हळदीकुंकू करतात. रथसप्तमी हा संक्रांतीच्या हळदीकुंकवाचा शेवटचा दिवस असतो. मराठी स्त्रिया संक्रांतीच्या दिवशी आवर्जून काळी साडी नेसतात. आसाम- भोगाली बिहू, पश्चिम बंगाल- मकर संक्रान्ति, ओरिसा - मकर संक्रान्ति, पश्चिम भारतात- गुजरात व राजस्थान - उतरायण- पतंगनो तहेवार- पतंगांचा सण, गुजरातमध्ये या दिवशी धान्य, तळलेल्या मिठाया, खाद्यपदार्थ बनवले व दान केले जातात. गुजरातेत या दिवशी गहू, बाजरी यांच्या खिचड्या बनवल्या जातात.

गुजरातमध्ये मकरसंक्रांतीचा दिवस उत्तराण म्हणून ओळखला जातो. या दिवशी घरोघरी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वजण पतंग उडवतात. हा पतंगोत्सव पाहण्यासाठी जगभरातील पर्यटक गुजरातला भेट देतात.

दक्षिण भारतात- कर्नाटक, आंध्र प्रदेश - संक्रांति, तमिळनाडू - पोंगल, दक्षिण भारतात पोंगल सण ३ दिवस साजरा होतो. भोगी पोंगल या दिवशी होळी पेटवून त्यात घरातील अनावश्यक वस्तू टाकतात. मुली त्या होळीभोवती फेर धरून नाचतात.

सूर्य पोंगल या दिवशी तांदूळ, गूळ, दूध यांची खीर करून तिचा नैवेद्य दाखवितात. मुडू किंवा कन्नु पोंगल या दिवशी गोठ्यातील जनावरांची पूजा केली जाते. याच दिवशी भावाच्या चांगल्या आयुष्यासाठी बहिणी पूजा करतात व भावाला ओवाळतात.

शबरीमला मंदिरात मकर वल्लाकु उत्सव होतो. भारताबाहेरील देशात- नेपाळमध्ये, थारू लोक - माघी, अन्य भागात माघ संक्रान्ति, थायलंड- सोंग्क्रान, लाओसठ- पि मा लाओ, म्यानमार- थिंगयान साजरा करतात. मकरसंक्रांतीच्या दिवशी कलकत्ता शहरानजीक गंगा नदी जेथे बंगालच्या उपसागरास मिळते, त्या गंगासागर ठिकाणी गंगासागर यात्रा आयोजित केली जाते.

हिमालयातील देवप्रयाग, मुनी की रेती, कीर्तिनगर, व्यासघाट या ठिकाणी संक्रांतीच्या निमित्ताने मेळे भारतात. या दिवशी केरळमधील शबरीमला डोंगरावर मकरज्योतीचे दर्शन घेण्यास अनेक भाविकांची गर्दी होते. मकर संक्रांतीच्या आदल्या दिवसाला भोगी असे म्हणतात. भोगी हा आनंदाचा आणि उपभोगाचा सण म्हणून मानला जातो. या दिवशी सकाळी आपले घर तसेच घरासभोवतालचा परिसर स्वच्छ केला जातो. दरवाजासमोर रांगोळी काढतात.

घरातील सर्व जण अभ्यंगस्नान करून नवीन कपडे परिधान करतात. महिला नवीन अलंकार धारण करतात. सासरच्या मुली भोगीचा आनंदोत्सव साजरा करण्यासाठी या दिवशी माहेरी येतात.

कुटुंबातील सर्वजण एकत्र येऊन भोगीचा आनंदोत्सव साजरा करतात. दुपारी जेवणाचा बेतही खास भोगीचा असतो. तीळ लावलेल्या भाकऱ्या, लोणी, पापड, वांग्याचे भरीत, चटणी आणि खमंग खिचडी असा लज्जतदार खास बेत असतो. प्रथम या पदार्थाचा देवाला नैवेद्य दाखवून सर्वजण एकत्र जेवायला बसतात.

वांग्या-बटाट्याच्या जोडीला हिरवागार घेवडा, पापडी, हरबऱ्याचे हिरवेगार दाणे, कोनफळ, लालचुटुक गाजरे, भुईमुगाच्या आणि इतर सर्व प्रकारच्या शेंगा यांच्या भेसळभाजीला भोगीची भाजी म्हणतात. दक्षिण भारतात हा दिवस भोगी पोंगल म्हणून साजरा करतात. या दिवशी इंद्राची पूजा करून आप्तजनांसह मिष्टान्न भोजन करण्याची प्रथा आहे.

मकर संक्रांतीचा सण संपूर्ण भारतात साजरा केला जातो. या दिवशी दान देण्याला विशेष महत्त्व आहे. देवीपुराणातील हा श्लोक साक्ष देतो.

*संक्रांतौ यानि दत्तानि द्व्यकव्यानि मानवैः।*
*तानि नित्यं ददात्यर्कः पुनर्जन्मनि जन्मनि।।*

मकर संक्रांतीच्या दिवशी जी माणसे दान देतात आणि हव्यकव्ये करतात, त्या-त्या वस्तू सूर्य त्यांना प्रत्येक जन्मात देत असतो, अशी खुळी समज आहे. आधुनिक कालात दान देण्याच्या गोष्टींच्या यादीमध्ये विद्यादान, श्रमदान, रक्तदान, वस्त्रदान, अन्नदान, नेत्रदान याही गोष्टींचा समावेश व्हावयास हवा.

यादिवशी घरातील आणि गावच्या मंदिरातील देवाला तीळ-तांदूळ वाहतात. सुगडात गहू, उसाचे तुकडे, हळकुंडे, कापूर, बोरे, द्रव्य इत्यादी वस्तू घालून ते दान देण्याची प्रथा आहे. मकर संक्रांतीच्या दिवशी नववधूला हलव्याचे दागिने घालून जावयाला तिळगूळ आणि आहेर देण्याची पद्धत महाराष्ट्रात आहे.

तिळावर साखरेचा पाक चढवून हलवा करण्याची प्रथा आहे. या दिवशी महिला एकत्र येऊन हळदीकुंकू समारंभ करतात, तिळगुळ वाटतात. महाराष्ट्रात अशा समारंभात प्रत्येकीला काही तरी वस्तू भेट देण्याची प्रथा आहे. लहान मुलांना लुटले जाते. या दिवशी महिला काळे वस्त्र परिधान करतात.

मकर संक्रांतीचे दिवस हे थंडीचे असतात. काळ्या रंगाचे वस्त्र हे उबदार असते. काळ्या मोठ्या रात्रीला निरोप देण्याच्या उद्देशानेही असे काळ्या रंगाचे वस्त्र नेसण्याची प्रथा पडली असावी. मकर संक्रांतीचा सण हा स्नेहवर्धनाचा सण असतो. मकर संक्रांतीच्या दिवसापासून उत्तरायणारंभापासून मोठे झालेले दिनमान जाणवू लागते.

पूर्वी इलेक्ट्रिसिटी नव्हती. त्या वेळी माणसे सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंतच कामे करावयाची. दिनमान वाढत जाणार म्हणजे अधिक काम करण्याची संधी मिळणार! म्हणून मकर संक्रांतीचा सण हा आनंदाचा सण म्हणून साजरा केला जातो.

थंडीच्या दिवसात तीळ हे अधिक आरोग्यदायी असतात. फरगीवि‍ह ॲन्ड फरगेट हा संदेश या सणाद्वारे दिला जातो. जीवनात आनंद फुलवण्याचा प्रयत्न केला जातो. महाराष्ट्रात या दिवशी लहान मुलांनाही हलव्याचे दागिने घालून बोरन्हाण घालण्याची- त्यालाच काही ठिकाणी लूट म्हणतात, ही एक प्रथा आहे.

बंगालमध्ये या दिवशी काकवीत तीळ घालून तिळुवा नावाचा पदार्थ तयार करून इष्ट मित्राना देतात. तसंच तांदुळाच्या पिठात तूप-साखर मिसळून पिष्टक नावाचा पदार्थ तयार करून तोही वाटतात. मकर संक्रांतीच्या दिवशी प्रयाग इथे मोठी यात्रा भरते.

अनेक भाविक गंगास्नान करतात. दक्षिणेतही ताम्रपर्णी नदीमध्ये स्नान करण्यासाठी अनेक लोक तिरुवनवेल्ली जिल्ह्यामध्ये जात असतात. हिमालयाच्या सरूळ भागात या दिवशी पिठाचे पक्षी करून ते तुपात तळतात व लहान मुलांच्या गळ्यात बांधतात. दुसऱ्या दिवशी ते पक्षी कावळ्याना खाऊ घालतात.

दक्षिण भारतात हा दिवस सूर्य पोंगल किंवा पेरूम पोंगळ म्हणून साजरा करतात. या दिवशी अंगणात दुधातही तांदुळाची खीर शिजवतात. खिरीला उकळी आली, की पोंगल ओ पोंगल₹ म्हणून ओरडतात. मकरसंक्रांतीच्या दिवशी संक्रांतीदेवीने संकारसूर या राक्षसाचा वध करून सर्व लोकांना सुखी केले अशी कथा आहे.

संक्रांतीचा दुसरा दिवस किंक्रात म्हणून साजरा करतात. संक्रांतीदेवीने मकर संक्रांतीच्या दुसऱ्या दिवशी किंकरासुर नावाच्या राक्षसाला ठार मारले आणि त्याच्या जाचातून प्रजेला मुक्त केले. म्हणून हा दिवस किंक्रांत म्हणून पाळला जातो. पंचागात हा दिवस करिदिन म्हणून दाखवलेला असतो. हा दिवस शुभकायार्ला घेतला जात नाही. या दिवशीही स्त्रिया हळदीकुंकू समारंभ साजरा करतात.

दक्षिण भारतात किंक्रांतीचा दिवस मट्टू पोंगल म्हणून साजरा करतात. या दिवशी गाई-बैलांना स्नान घालून त्यांच्या गळ्यात फुलांच्या माळा घालतात. त्यांच्या शिंगाना बेगड लावून त्यांना सजवतात. गुरांना दुपारी गोडधोड जेवण घालून दिवसभर त्यांना मोकळे सोडतात. संध्याकाळी त्यांची गावातून मिरवणूक काढतात. त्यानंतर नृत्यगायनाचा कार्यक्रमही केला जातो. सर्व भावाबहिणींना मकरसंक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा !!

# शब्दांना वेग देणारा विचारवंत सर आयझॅक पिटमॅन



प्रविण बागडे
नागपूर.
9923620919

आजच्या वेगवान डिजिटल युगात टायपिंग, रेकॉर्डिंग, आर्टिफिशियल इंटेलिजन्स या शब्दांचा उच्चार सहज होतो. मात्र या आधुनिक साधनांच्या कितीतरी आधी, मानवी विचारांना वेग देणारे, शब्दांना शिस्तबद्ध रूप देणारे आणि कार्यालयीन व्यवस्थेला नवे आयाम देणारे एक महान संशोधक होऊन गेले, ते लघुलिपीचे जनक सर आयझॅक पिटमॅन.

त्यांचा जन्मदिन म्हणजे केवळ एका संशोधकाची आठवण नव्हे, तर ज्ञान, कष्ट आणि संधी यांच्या ऐतिहासिक संगमाचे स्मरण होय. इंग्लंडमधील ट्रॉब्रिज, विल्टशायर येथे जन्मलेल्या सर आयझॅक पिटमॅन यांनी विकसित केलेली लघुलिपी ही केवळ लेखनपद्धती नव्हती; तर ती एक क्रांती होती. माणसाच्या विचारांच्या गतीला कागदावर उतरविण्याचे सामर्थ्य त्यांच्या लघुलिपीत होते.

एखाद्या कार्यालय प्रमुखाच्या, न्यायाधीशाच्या किंवा वक्त्याच्या तोंडून निघणारा प्रत्येक शब्द अचूक, त्वरित आणि शिस्तबद्ध पद्धतीने नोंदवता येणे, ही त्या काळातील अभूतपूर्व बाब होती.

कार्यालयीन कामकाज म्हणजे आज ज्या गतीने ई-मेल, नोट्स, मिनिट्स तयार होतात, त्याची बीजे पिटमॅन यांच्या लघुलिपीतच दडलेली होती. निर्णय प्रक्रिया, प्रशासकीय नोंदी, न्यायालयीन कामकाज आणि पत्रकारिता, या सर्व क्षेत्रांना लघुलिपीने नवे बळ दिले. शब्द फक्त ऐकायचे नाहीत, तर ते जपायचे आणि जतन करायचे असतात, ही जाणीव पिटमॅन यांच्या कार्यातून ठळकपणे पुढे आली.

संगणक, मोबाईल आणि व्हॉइस-टू-टेक्स्टच्या युगात लघुलिपी हळूहळू मागे पडत असली, तरी अवघ्या पाचझसहा दशकांपूर्वी लघुलेखन आणि टंकलेखन ही लाखो मध्यमवर्गीय युवकांची जीवनरेषा होती. अत्यल्प खर्चात, कमी कालावधीत शिकता येणारे हे कौशल्य अनेकांच्या हाताला काम देणारे ठरले.

सरकारी व खासगी कार्यालयांमध्ये लघुलेखक ही पदे केवळ नोकरी नव्हती, तर सामाजिक प्रतिष्ठा आणि स्थैर्याची हमी होती. या लघुलिपीच्या बळावर अनेकांनी नोकरी करत शिक्षण पूर्ण केले, पुढे अधिकारी झाले, काहींनी प्रशासनात उच्च पदे भूषवली, तर काहींनी पत्रकारिता व न्याय व्यवस्थेत मोलाची भूमिका बजावली. ही सारी यशोगाथा म्हणजे सर आयझॅक पिटमॅन यांच्या संशोधनाची जिवंत साक्ष आहे.

१९८६ पर्यंत त्यांच्या लघुलिपीवरील पुस्तकांच्या दहा लाखांहून अधिक प्रती विकल्या जाणे, ही केवळ व्यावसायिक यशाची आकडेवारी नव्हे, तर त्यांच्या कार्याची जागतिक स्वीकारार्हता दर्शविणारी बाब आहे. शिक्षणशास्त्राच्या क्षेत्रात ते एक नावाजलेले संशोधक, प्रभावी शिक्षक आणि दूरदृष्टीचे प्रकाशक म्हणून ओळखले गेले.

आज प्रश्न असा आहे की, आपण प्रगत तंत्रज्ञानाच्या झगमगाटात मूलभूत कौशल्यांचे महत्त्व विसरत तर नाही ना? लघुलिपी आज मागे पडत असली, तरी शिस्त, अचूकता, एकाग्रता आणि श्रवणशक्ती ही मूल्ये तितकीच महत्त्वाची आहेत. पिटमॅन यांची लघुलिपी आपल्याला केवळ वेगवान लेखन शिकवत नाही, तर विचार ऐकण्याची, समजून घेण्याची आणि जतन करण्याची संस्कृती शिकवते.


सर आयझॅक पिटमॅन यांचे पुण्यस्मरण केवळ एका संशोधकाचा गौरव नाही, तर ज्ञानाच्या साधेपणातून संधी निर्माण होऊ शकतात, याचा आत्मविश्वास देणारा दिवस आहे. शब्दांना वेग देणाऱ्या या विचारवंताचे योगदान काळाच्या ओघात बदलले, तरी त्यामागील तत्त्वज्ञान आजही तितकेच जिवंत आणि प्रेरणादायी आहे.

मी स्वतः एक वरिष्ठ लघुलेखक असल्याने शब्दांना वेग, विचारांना शिस्त, संधींना दिशा देणाऱ्या आणि शब्द जतन करण्याची संस्कृती घडवणाऱ्या लघुलिपीचे जनक सर आयझॅक पिटमॅन यांना पुण्यतिथीनिमित्त कृतज्ञ स्मरण..

■ ■ ■

# कोणालाही मत न देणं उपाय नाही
## आरएसएस प्रमुखांचा नोटावर थेट प्रहार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :



नागपूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत आज पहाटेपासूनच मतदान सुरू झाले असून, या प्रक्रियेत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत यांनी सकाळच्या सत्रात मतदान करून नागरिकांना संदेश दिला.

गुरुवारी सकाळी साडेसातच्या सुमारास नागपूरच्या महाल परिसरातील मतदान केंद्रावर पोहोचत त्यांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. सुरुवातीच्या मतदारांमध्ये त्यांचा समावेश होता. मतदानानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना केवळ मतदानाचे महत्त्वच अधोरेखित केले नाही, तर नोटा या पयार्यावरही स्पष्ट भूमिका मांडत राजकीय चर्चेला नवी दिशा दिली.

मतदान केंद्रातून बाहेर पडताच मोहन भागवत यांनी सांगितले की, निवडणूक ही लोकशाही व्यवस्थेची अत्यंत महत्त्वाची आणि अनिवार्य प्रक्रिया आहे. लोकशाही केवळ मतदानाच्या अधिकारावर उभी नाही, तर त्या अधिकाराच्या जबाबदारीवर उभी आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. प्रत्येक नागरिकाने मतदान केले पाहिजे, कारण मत न देणे म्हणजे लोकशाहीपासून दूर राहणे, असा संदेश त्यांनी दिला. आज मी सर्वात पहिलं काम मतदानाचंच केलं, असे सांगत त्यांनी स्वतःचा अनुभव मांडला आणि इतर मतदारांनाही मतदानासाठी प्रेरित केले.

भागवत यांनी यावेळी मतदारांना जनहिताचा विचार करून मतदान करण्याचे आवाहन केले. कोणत्याही भावनिक किंवा तात्कालिक मुद्द्यांवर न अडकता, पात्र, योग्य आणि समाजासाठी उपयुक्त ठरणाऱ्या उमेदवारालाच मत द्यावे, असे त्यांनी सांगितले.

मतदान हा केवळ अधिकार नसून तो समाज आणि देशाच्या भविष्यासाठी घेतला जाणारा निर्णय आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. त्यामुळे प्रत्येक मतदाराने विचारपूर्वक निर्णय घ्यावा, असा सल्लाही त्यांनी दिला.

यावेळी नोटा या पयार्यावर बोलताना मोहन भागवत यांनी थेट आणि ठाम भूमिका मांडली. नोटा निवडल्याने आपण सर्व उमेदवारांना नाकारतो, मात्र त्याचा परिणाम असा होतो की अप्रत्यक्षपणे अशा उमेदवाराला फायदा होतो, ज्याला लोकांची खरी पसंती नाही, असे त्यांनी सांगितले.

नोटा म्हणजे आपण सगळ्यांनाच नाकारतो आणि त्यामुळे असा व्यक्ती पुढे येतो, ज्याला कोणीही खरोखर निवडू इच्छित नाही, असे स्पष्ट मत त्यांनी मांडले. त्यांच्या या विधानामुळे निवडणुकीच्या काळात नोटाच्या भूमिकेवर पुन्हा एकदा चर्चा रंगू लागली आहे.

**बदल घडवायचा असेल तर**

भागवत यांनी पुढे स्पष्ट केले की, नोटा हा पर्याय नागरिकांना आपली नाराजी व्यक्त करण्याची संधी देतो, हे मान्यच आहे. मात्र, कोणालाही मत न देण्यापेक्षा उपलब्ध पयार्यांमधून योग्य उमेदवार निवडणे हे अधिक जबाबदार आणि लोकशाहीस पोषक ठरेल. लोकशाहीत बदल घडवायचा असेल, तर सक्रिय सहभाग आवश्यक आहे. केवळ असहमती नोंदवून थांबणे हा दीर्घकालीन उपाय नाही, असा संदेश त्यांच्या वक्तव्यातून देण्यात आला.

# भाजप महिला कार्यकर्तीला मारहाण
## बंगाली कॅम्पमध्ये अपक्ष उमेदवाराची गुंडगिरी

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. १५ :

महापालिका निवडणूक मतदानाच्या पूर्वसंध्येला रात्री सुमारे ८.४० वाजताच्या सुमारास बंगाली कॅम्प परिसरात धक्कादायक घटना घडली. बंगाली कॅम्पमधील अपक्ष उमेदवार अजय सरकार याने भाजपच्या महिला कार्यकतीर्चा विनयभंग केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे भाजप प्रदेशाध्यक्ष यांनी जाहीर केलेल्या उमेदवारांच्या यादीत सरकार यांचे नाव होते. स्थानिक पातळीवर त्यांचे नाव यादीतून वगळून आमदार किशोर जोरगेवार यांच्या समर्थकाला उमेदवारी दिली गेली. त्यानंतर सरकार यांनी आमदार किशोर जोरगेवार यांना उघड आवाहन दिले होते. या तक्रारीत राजकारण असल्याची चर्चा आहे.

# भाजपकडून हुकूमशाही पध्दतीचा वापर

## विजय वडेट्टीवार यांची सडकून टीका

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :



मुंबई जिंकण्यासाठी भाजपकडून अक्षरशः गोंधळ घातला जात आहे. पोलीसांच्या उपस्थितीत पैसे वाटप, भेट वस्तू दिल्या जात आहेत. निवडणूक आयोग झोपला असेल आणि पोलिसांच्या सहकार्याने असाच प्रकार करायचा होता तर मग निवडणुका घेण्याची काही गरज नाही. भाजपला सर्व नगर पालिका, महानगर पालिका, महापौर, नगराध्यक्ष, नगरसेवक देवून टाका. मुंबई जिंकण्यासाठी भाजपकडून साम दाम दंड भेद या हुकूमशाही पध्दतीचा वापर केला जात असल्याची टिका काँग्रेस विधीमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

मुंबई महापालिकेत ठाकरे बंधू सत्तेजवळ जातील. काँग्रेस भूमिका ही निर्णायक राहील अशी कालपर्यंत मुंबईत स्थिती होती. पण बुधवारी रात्री मुंबईत जो धिंगाणा घातला त्यामुळे मतदान पूर्ण होईपर्यंत चित्र स्पष्ट होणार नाही असे वडेट्टीवार म्हणाले.

मुंबईसह सर्वत्र पोलिसांच्या उपस्थितीत पैसे वाटत असतील मिक्सर, वॉशिंग मशीन वाटत असतील निवडणूक आयोग झोपले असतील तर निवडणुका का घेतात? असा सवाल करीत मतदान म्हणजे लोकशाही टिकवण्यासाठी दिलेला अधिकार आहे. मात्र येथे हुकूमशाही कडे वाटचाल सुरू असल्याचे ते म्हणाले.

भाजपकडून मुंबई जिंकण्यासाठी हे जे सर्व प्रकार सुरू आहे हे मात्र मुंबईची वाट लावण्यासाठी, मुंबई गुजरातच्या दावणीला बांधण्यासाठी मराठी माणूस हद्दपार करण्यासाठी सुरू आहे असेही वडेट्टीवार म्हणाले. भाजपला बोगस मतदान करून निवडणुका जिंकायच्या आहेत. भाजप बेइमानी केल्याशिवाय, पैसे वाटल्याशिवाय निवडणुका जिंकू शकत नाही. म्हणून भाजप साम दाम दंड भेद करत आहे.

भाजप कार्यालयात थीनर आहे शाई पुसली जाते आहे. ही पारदर्शक निवडणूक आहे का? शाई निघत आहे की नाही? मी आयुक्तांना सांगितले शाई जात आहे. आमचे उमेदवार सांगत आहे शाई निघत आहे. मार्कर ने शाई लावली. हा प्रकार योग्य नाही असेही वडेट्टीवार म्हणाले.

# लोकशाहीचा खून होतोय : अडसूळ

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. १५ :



अमरावती : महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी गुरूवारी मतदान सुरू असताना काही ठिकाणी गोंधळाची स्थिती बघायला मिळत आहे. अनेक मतदान केंद्रांवर मतदान यंत्रे उलट्या क्रमाने ठेवण्यात आली असून ही लोकशाहीची हत्या असल्याचा आरोप शिवसेना शिंदे गटाचे माजी आमदार अभिजीत अडसूळ यांनी केला आहे.

अभिजीत अडसूळ म्हणाले, निवडणूक आयोगाने जाणून बुजून संगनमत करून मतदान यंत्रे ही उलट्या क्रमाने ठेवली आहेत. सामान्यपणे अ, ब, क आणि ड या क्रमाने मतदान यंत्रे ठेवण्याऐवजी ती ड, क, ब आणि अ अशा स्थितीत ठेवण्यात आली आहेत. यावर कुणीही उत्तरदायित्व स्वीकारण्यास तयार नाही. ही लोकशाहीची हत्या आहे. जिल्हाधिकाऱ्यांपासून ते निवडणूक आयोगाचे सर्व अधिकारी त्या ठिकाणी अत्यंत चुकीच्या पद्धतीने काम करीत आहेत.

आपण हिंदुस्थानात राहतो. आपण वाचायला सुरूवात डावीकडून उजवीकडे करतो. खऱ्या अर्थाने अबकड अशा पद्धतीने मतदान यंत्रे लावली गेली पाहिजेत. विरोधकांना आपला पराजय दिसायला लागला आहे, म्हणून चुकीच्या पद्धतीने निवडणूक आयोगाला हाताशी धरून मतदान यंत्रे उलट्या क्रमाने लावण्याचे कारस्थान रचण्यात आले. अमरावतीत सुमारे ४० टक्के मतदान केंद्रांवर अशा पद्धतीने उलट्या क्रमाने मतदान यंत्रे लावण्यात आली आहेत. मतदारांनी अत्यंत सावध राहून मतदान करण्याचे आवाहन देखील अभिजीत अडसूळ यांनी केले आहे.

गाडगेनगर परिसरातील प्रगती महाविद्यालयातील मतदान केंद्रावर एका मतदान यंत्रामध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने भाजपचे नेते आणि माजी पालकमंत्री प्रवीण पोटे यांना ताटकळत बसावे लागले. मतदारांनाही मनस्ताप झाला.

# मी तर म्हणतो ऑईल पेंट वापरावा...

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :



राज्यात अनेक ठिकाणाहून निवडणूकीनंतर बोटावरील शाई निघून जात असल्याच्या तक्रारी आहेत. दरम्यान, मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी निवडणूकीत वापरण्यात येणाऱ्या मार्कर पेनबाबत हरकत घेतली.

मात्र, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणूक आयोगाची बाजू घेत मार्कर पेन आताच वापरात नाही, तर यापूर्वी देखील अनेकदा तो वापरण्यात आल्याचे सांगितले. विरोधकांना शंकाच असेल तर आयोगाने दुसरा पेन वापरावा. ते सुद्धा जाऊ द्या, मी तर म्हणतो, ऑईल पेंट वापरावा, असे मुख्यमंत्री म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी नागपूर महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी मतदान केले. यावेळी त्यांनी निवडणूक आयोगाच्या कामकाजावर कोणत्याही प्रकारचा संशय घेणे अयोग्य आहे. मार्कर पेनबाबत कोणाला आक्षेप असेल तर निवडणूक आयोगाने त्याची दखल घ्यावी, असे सांगत त्यांनी विरोधकांवर टीका केली. या निवडणुकीत भाजपचा विजय निश्चित असल्याचा दावा करत, आमचे विरोधक उद्या पराभवाचे कारण काय सांगायचे याची आजच प्रॅक्टिस करत आहेत, असेही ते म्हणाले.

पॅड युनिटबाबत होत असलेल्या आरोपांवर भाष्य करताना फडणवीस म्हणाले, काही नेत्यांनी त्याला पाडू युनिट असे नाव दिले आहे. मात्र, ही यंत्रणा अचानक आणलेली नाही. राज्य निवडणूक आयोगाने सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना बोलावून या मशीनची माहिती दिली होती. मतमोजणीदरम्यान मशीन बंद पडल्यासच या युनिटमधील डेटाचा वापर केला जाणार आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था या लोकशाहीचा पाया असल्याचे नमूद करत फडणवीस यांनी मतदारांना मोठ्या प्रमाणात मतदान करण्याचे आवाहन केले. मतदान हा केवळ अधिकार नाही, तर कर्तव्यही आहे. मतदान न करणे म्हणजे लोकशाहीतील कर्तव्याचे पालन न करणे. चांगली शहरे घडवायची असतील तर राज्यातील सर्व २९ महापालिकांमधील मतदारांनी उत्स्फूर्त मतदान करावे, असे ते म्हणाले.

दरम्यान, पश्चिम नागपुरातील भाजप उमेदवार भूषण शिंगणे यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा निषेध करताना मुख्यमंत्री म्हणाले की, अतिशय वाईट प्रकारे त्यांच्यावर हल्ला करण्यात आला असून त्यांच्या हाताला दुखापत झाली आहे. लोकशाहीत निवडणुकीत जिंकता येत नाही म्हणून ठोकशाहीचा मार्ग स्वीकारला जात आहे. मात्र कितीही हल्ले झाले तरी आमचे कार्यकर्ते घाबरणार नाहीत, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.



■ **नागपूर :** केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूर महानगरपालिका निवडणूक २०२६ साठी आज चिटणीस पार्क, महाल येथील न्यू इंग्लिश हायस्कूल येथे परिवारासह मतदानाचा हक्क बजावला.



*नागपूर : नागपूर महानगर पालिकेसाठी आज येथील महाराज राजे मुधोजी भोसले यांनी डी डी नगर महाविद्यालय, महाल, नागपूर येथील मतदान केंद्रावर सहपरिवार मतदानाचा हक्क बजावला.*

# मतदान करतानाचा व्हिडिओ व्हायरल
## केंद्रावर मोबाईल वापरास बंदी असूनही केले शूटिंग

■ महासागर प्रतिनिधी
चंद्रपूर, दि. १५ :

राज्यात २९ महानगरपालिकांसाठी सकाळपासूनच मतदान प्रक्रियेस सुरुवात झाली. मात्र दिवसभरात अनेक मतदान केंद्रांवर बोगस मतदान, बोटांवरील शाई पुसणे, मतदान यंत्रात बिघाड, असे अनेक गैरप्रकार पाहायला मिळाले. चंद्रपूरच्या प्रभाग क्रमांक ५ विवेक नगर प्रभाग येथे एका मतदाराने आपण कोणाला मतदान केले याचा पूर्ण व्हिडिओ शूट केला आहे. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

प्रभाग क्रमांक ५ म्हणजे विवेक नगर प्रभाग येथे एका मतदाराने मतदान करतानाच व्हिडिओ काढला. व्हिडिओ शूट केल्यानंतर या मतदाराने हा व्हिडिओ सोशल मीडियावर देखील शेअर केला. विशेष म्हणजे मतदान केंद्रात मोबाईल घेऊन जाण्यास बंदी असते, मात्र तरी देखील या मतदाराने मोबाईल सोबत नेऊन व्हिडिओ देखील शूट केला. तसेच हा व्हिडिओ नेमका कोणी काढला आणि याचा उद्देश्य काय? हे अद्याप स्पष्ट झाले नाही.

### दोन उमेदवारांच्या पतींमध्ये हाणामारी

महापालिका निवडणुकीच्या मतदानादरम्यान एकोरी प्रभागातील नेहरू शाळा मतदान केंद्रावर दोन उमेदवारांच्या पतींमध्ये झालेल्या हाणामारीमुळे मोठा तणाव निर्माण झाला. भाजपचे बंडखोर ललित कासट आणि शिवसेना शिंदे गटचे रशीद हुसेन यांच्यात झालेल्या या वादाचे पर्यावसान मारहाणीत झाले. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे पाहून पोलिसांनी घटनास्थळी सौम्य लाठीमार केला, ज्यामुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण होते. या घटनेव्यतिरिक्त शहरांतील इतर काही प्रभागांमध्येही किरकोळ वादावादीच्या घटना समोर आल्या आहेत.

# ५० लाखाची रोकड जप्त

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १५ :

महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीमध्ये मतदान सुरू होण्याच्या काही तास अगोदर खदान पोलिसांनी ५० लाखाची रोख रक्कम बुधवारी रात्री जप्त केली. शहरातील खदान पोलीस ठाण्यांतर्गत ही कारवाई करण्यात आली.

महापालिका निवडणुकीच्या दरम्यान एवढ्या मोठ्या प्रमाणात रोख रक्कम बाळगण्याचे कारण काय? याचा तपास पोलीस करीत आहेत. या कारवाईची माहिती महापालिका निवडणूक विभाग व प्राप्तिकर विभागाला देण्यात आली. मतदानाच्या पूर्वी घडलेल्या या घटनेमुळे शहरात चांगलीच खळबळ उडाली.

अकोला शहरातील खदान पोलीस ठाण्यांतर्गत मोठ्या प्रमाणात रोकड आणली जात असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीवरून खदान पोलिसांनी सापळा रचत ५० लाख रुपयांची रोख रक्कम विद्या नगर भागातून जप्त केली आहे. ही रक्कम बाळगणाऱ्या एका व्यक्तीची पोलिसांकडून चौकशी केली जात आहे.

ऐन निवडणुकीच्या काळात ५० लाख रुपयांची रोख रक्कम जवळ ठेवण्याचे कारण काय? याची माहिती पोलीस घेत आहेत. रोख रक्कम जप्त केल्याची माहिती महापालिकेच्या निवडणूक विभागासह प्राप्तिकर विभागाला देण्यात आली. या ५० लाख रुपयांच्या रोख रकमेचा वापर महापालिका निवडणुकीसाठी होत आहे का? याचा सुद्धा तपास केला जात आहे. ५० लाख रुपयांची रोख रक्कम पोलिसांकडून जप्त करण्यात आली आहे. ही रक्कम नेमकी कोणाची, त्याचा वापर कशासाठी होणार होता? याचा सविस्तर तपास व चौकशी केली जात आहे.

# नागरिकच शिकवत आहेत आता नेत्यांना धडा..

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. १५

निवडणुकीमध्ये आता नागरिकच नेत्यांना सुधारत असून धडाही शिकवत आहेत, असे मत वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी आज येथे व्यक्त केले. महापालिका निवडणुकीच्या मतदान प्रक्रियेला गुरुवारी सकाळी ७.३० वाजतापासून सुरुवात झाली. मतदानाची संथ गती असून पहिल्या दोन तासात ६.४८ टक्के मतदान झाले.



ॲड. प्रकाश आंबेडकर व वंचितच्या नेत्या प्रा. अंजली आंबेडकर यांनी अकोला येथे आपला मतदानाचा हक्क बजावला. त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी नेत्यांवर निशाणा साधला. सोबतच त्यांनी मतदार नागरिकांवर विश्वास दाखवत तेच आता नेत्यांना शिकवतील, असे म्हणाले.

मुद्दे भटकवण्याचा कितीही प्रयत्न केला तरी, ज्या लोकांनी स्थानिक प्रश्न व स्थानिक मुद्दे निवडणुकीत मांडले, त्यांनाच मतदारांनी प्रतिसाद दिला आहे. असे चित्र सध्या महाराष्ट्रात दिसून येत असल्याचे मत प्रा. अंजली आंबेडकर यांनी व्यक्त केले.

पान १ वरून

### मतदानाची टक्केवारी घसरली....

या प्रकारावरून यंत्रणा टू द पॉइंट काम करत नसल्याचा गंभीर आरोप गणेश नाईक यांनी केला. केवळ नवी मुंबईच नव्हे, तर मीरा-भाईंदरमध्येही मतदानाच्या सुरुवातीपासून गोंधळाचे वातावरण पाहायला मिळाले. मतदानाबाबत पुरेशी जनजागृती न झाल्याने अनेक मतदारांना आपले मतदान केंद्र नेमके कुठे आहे, याचीच माहिती नसल्याचे दिसून आले. परिणामी मतदार केंद्र शोधण्यासाठी इकडून तिकडे फिरताना दिसले.

नागपूरच्या प्रभाग क्रमांक २८ मधील आराधना नगर येथील जीआरके कॉन्व्हेंटमधील मतदान केंद्रावर ईव्हीएम मशीनमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे सुमारे ४० मिनिटे मतदान थांबले होते. मशीन बदलल्यानंतरच मतदान प्रक्रिया सुरू करण्यात आली. राज्यातील मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, छत्रपती संभाजीनगरसह अनेक शहरांमध्ये मतदानाची सुरुवातच बंद किंवा बिघडलेल्या मशीनमुळे झाल्याने, निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर तीव्र टीका होत आहे.

सोलापूरमध्येही अशीच परिस्थिती निर्माण झाली. संगमेश्वर पब्लिक स्कूलमधील मतदान केंद्रावर ईव्हीएम मशीनमध्ये बिघाड झाल्यामुळे सकाळी साडेसातपासून मतदान प्रक्रिया थांबली होती. तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी प्रयत्न सुरू होते, मात्र जवळपास पाऊण तासानंतरच मशीन सुरू होऊ शकली.

छत्रपती संभाजीनगरमध्येही मतदानाच्या सुरुवातीलाच गोंधळ उडाला. गुजराती कन्या विद्यालयातील मतदान केंद्रावर ईव्हीएम मशीन बंद पडल्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली. मशीनमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यानंतर ते दुरुस्त करण्यास जवळपास एक तास लागला. या काळात नागरिकांना मतदान केंद्रावर ताटकळत उभे राहावे लागले. मुंबईतही मतदान केंद्रांवर गोंधळाची दृश्ये दिसून आली. कुर्ला पूर्व येथील कामगार नगरमधील पंत वालावलकर शाळेतील मतदान केंद्रावर मतदारांची नावे, मतदान केंद्र आणि बूथ बदलल्यामुळे प्रचंड गोंधळ झाला.

### भाजपशाही जुलमी...

अडचणीत कोण धावून येते? यावर विचार करून मतदान करावे. तेव्हा तुमच्या मदतीला भाजप किंवा मुख्यमंत्री येत नाहीत. त्यामुळे तुम्ही तुमच्या मतदानाला जागा व मतदान करा, असे ते म्हणालेत. उद्धव ठाकरे यांनी आज आपल्या कुटुंबासह मुंबई महापालिकेसाठी मतदान केले. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी निवडणुका व मतदार याद्यांचा घोळ थांबणार नसेल तर थेट निवडणूक आयुक्तांवर कारवाई करण्याची मागणी केली. उद्धव ठाकरे म्हणाले, निवडणूक आयुक्त पगार कसली घेतात? याचा आता खुलासा झाला पाहिजे. त्यांच्यावर एक बंधन पाहिजे. मुंबई महापालिका निवडणूक ९ वर्षांनी होत आहे. निवडणूक आयोग व त्यांचे कर्मचारी एवढी वर्षे काय करत होते? आता रोज निवडणूक आयुक्तांना सुद्धा त्यांच्या साईटवर आज त्यांनी काय केले हे सांगणे त्यांना बंधनकारक करावे लागेल. उद्धव ठाकरे यांनी मतदानानंतर आपल्या कुटुंबीयांसह हनुमान मंदिरात जाऊन दर्शन घेतले. तिथेही त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर सडकून टीका केली.

### मुख्यमंत्र्यांच्या मित्रावर....

कार्यकर्त्यांनी हा हल्ला केल्याचा आरोप केला आहे. त्यांनी हल्लेखोरांवर तात्काळ कारवाईची मागणी पोलीस आयुक्ताकडे केली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही या घटनेची माहिती दिली. गोरेवाडा भागात पैशाचे वाटप होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर भूषण शिंगणे दोन कार्यकर्त्यांसह त्या भागात गेले होते. शिंगणे यांना बघताच तिथं असलेल्या ४०-५० नागरिकांनी त्यांच्यावर तसेच त्यांच्यासोबत असलेल्या तीन भाजप कार्यकर्त्यांवर जीवघेणा हल्ला केला. यात एक सहकारी खाली पडल्याने शिंगणे त्यांना उचलण्याकरिता खाली वाकले. भूषण शिंगणे यांनाही जमिनीवर पाडले. त्यांच्या चेहऱ्यावर दगडाने मारण्यात आले. चेहऱ्याचा बचाव करताना हात पुढे केले असता हातावर दगडाने मारण्यात आले. त्यांचे ओठ फाटले. त्यांच्या पायावरही मारण्यात आले. शिंगणे यांना मेयो रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्या हाताला व पायाला फ्रॅक्चर असल्याचे एक्स रेमधून निदान झाले. त्यांना खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून उपचार सुरु आहे.

दरम्यान, या घटनेवर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, भूषण शिंगणे यांच्यावर झालेला हल्ला हा केवळ एका उमेदवारावरचा नाही, तर कोणत्याही कार्यकर्त्यावर हल्ला झाला असता तरी मी त्याच्या घरी गेलो असतो. शिंगणे माझे मित्र आहेत, मात्र ही केवळ मैत्रीची बाब नाही. अशा प्रकारची गुंडगिरी अजिबात खपवून घेतली जाणार नाही. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतल्याचे सांगत ठोस कारवाईचे संकेत दिले.